साप्ताहिक

# माणूस

१७ नोव्हेंबर८४/ 2 रुपये



साप्ताहिक

# माणूस

वर्ष : चोविसावे

अंक : पंचविसावा

१७ नोव्हेंबर १९८४

किंमत : दोन रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

वार्षिक वर्गणी

साठ रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ

राजू देशपांडे

# बलसागराकडे....

श्री. ग. मा.

गांधीजी अहिंसेचे उपासक होते नेहरूंना शांततावाद प्रिय होता. इंदिरा गांधी हे एक सामर्थ्यपूजक व्यक्तिमत्त्व होते.

गांधीजींना अहिंसापालन करणारा भारत हवा होता. नेहरूंनी पंचशील तत्त्वांचा, शांततामय सहजीवनाचा पुरस्कार केला. राजा अशोक हा त्यांचा आवडता आदर्श. इंदिरा गांधी मात्र चाणक्य-चंद्रगुप्तांच्या परंपरेतल्या. विजिगिषु व बलसंपन्न भारत हे त्यांचे स्वप्न. शेवटी शेवटी तर हा त्यांचा ध्यासच.

मृत्यूपूर्वीच्या ओरिसा राज्यातील दोन दिवसांच्या कार्यक्रमातही एका अडिचशे कोटी रुपयांच्या लष्करी साहित्यउत्पादनाच्या कारखान्याचा पायाभरणीसमारंभ त्यांच्या हस्ते पार पडला व विमानदलाच्या जवान व अधिकाऱ्यांसमोर त्यांचे एक भाषणही झाले. दुर्दैवाने हा त्यांचा अखेरचा प्रकट कार्यक्रम ठरला. अखेरचे प्रकट भाषण ! या भाषणात त्यांनी भारतीय सैन्यदलांचा फार गौरव केला व एकदा नाही पाच वेळा त्यांनी आपला पराक्रम सिद्ध केला आहे, शत्रूला पाणी पाजले आहे, अशी अगदी वीरपरंपरेतली भाषा त्यांच्या तोंडून बाहेर पडली.

बांगलादेश युद्धातील विजय हा त्यांच्या राजकीय कर्तृत्वाचा परमोत्कर्ष बिंदू. तोवर त्या केवळ भारताच्या पंतप्रधान होत्या. त्यानंतर त्या भारतीय उपखंडाच्या अनभिषिक्त सम्राज्ञी ठरल्या! Empress of the Sub Continent असा त्यांचा पश्चिमी वृत्तपत्रांकडून त्यावेळी गौरव झाला.

Operation Blue Star ही त्यांच्या अंताची दुर्दैवाने सुरुवात ठरली.

पंजाबात लोकशाहीचे मार्ग, सारे उपाय खुंटले होते. सुवर्णमंदिरात लष्कर पाठवण्याशिवाय त्यांच्यासमोर पर्यायच नव्हता.

हा पर्याय त्यांनी स्वीकारला, खलिस्तानवादाचे मूळ उखडून टाकले, यासाठी जीवही धोक्यात घातला, देशाची संभाव्य आणखी एक फाळणी टाळली म्हणून राष्ट्रीय वृत्तीच्या सर्वसाधारण हिंदू मनाला समाधान वाटले.

पण शीखसमाज मात्र विथरला. अतिरेकी प्रवृत्ती वाढल्या, माथेफिरू सूडाच्या भावनेने पेटले. या सूडाच्या ज्वाला थेट त्यांच्या राहत्या घरापर्यंत पोचल्या. दि. ३१ ऑक्टोबरच्या सकाळी शेवटी त्यांचा बळी घेतला गेला. या निर्घृण कृत्याचा धिक्कार करावा तेवढा थोडाच. दिल्याघेतलेल्या लहान-मोठ्या धक्क्यांनी परिपूर्ण असलेल्या जीवनाचा हा धक्कादायक शेवट! सारा देश सुन्न, हतबुद्ध झाला, हादरून गेला. सारे जगच हादरले. केनेडीच्या हत्येनंतर तेवढ्याच तोलामोलाच्या व्यक्तीची ही हत्या! फक्त ती उघड्यावर झाली. ही राहत्या घराच्या आवारात. त्यामुळे आणखीनच चिंताजनक. आपली सुरक्षा व्यवस्था किती

ढिली आहे, आतून किती पोखरली गेली आहे हे यामुळे उघड झाले व प्रचंड दु खात नव्या काळजीची भरच पडली !

¤

संरक्षण, विकास, लोकशाही ही स्वतंत्र भारताची त्रिसूत्री. नेहरूंनी विकास आणि लोकशाही यावर भर दिला. संरक्षणाकडे दुर्लक्ष केले. चीनच्या आक्रमणामुळे हे दुर्लक्ष उघड झाले. इंदिरा गाधींनी हे दुर्लक्ष कमी केले, ही आपली पडती बाजू सावरायचा आटोकाट प्रयत्न केला लष्करातील सर्वसामान्य जवानांना खूप सवलती दिल्या. शिखाप्रमाणेच देशातील इतर प्रातानाही लष्करात वाव करून दिला. हवाईदल, नौदल यात वाढ केली, अत्याधुनिक शस्त्रास्त्रे मिळवली, शक्य तेवढी स्वयपूर्णता या क्षेत्रात गाठण्याचा प्रयत्न केला. ही त्याची सर्वात महत्त्वाची व मोठी कामगरी. त्यामानाने विकास व लोकशाही ही दोन्ही सूत्रे जरा कमकुवत राहिली. आणीबाणी त्यानी सबळ कारण नसताना पुकारली व गरिबी हटाव, वीस कलमी कार्यक्रम या आकर्षक व निवडणुका जिंकणाऱ्या घोषणाच ठरल्या. त्या अनुशासनप्रिय होत्या; पण त्यासाठी आवश्यक असणारी पक्षबांधणी, कार्यकर्त्यांचा संच त्यांना महत्त्वाचा वाटला नाही व सर्व सत्ता त्यानी स्वत च्या हातीच एकवटून ठेवली. खरा भारत खेडचात राहतो हे ध्रुवसत्य गाधीजींनी सागून ठेवले. गरिबी हटवायची तर या खेडचापाडयाच्या पुनर्रचनेपासून सुरुवात व्हायला हवी होती ; पण तसे काही इंदिरा गाधीनी केले नाही व नेहरूंप्रमाणेच त्यांच्याही कारकीर्दीत शहरांची, झोपडपट्टयांची. पंचताराकित औद्योगिक वर्तुळांची, केंद्रिकरणाची वाढच होत राहिली. पंचतारांकित वर्तुळे व झोपडपट्टी ही तशी दोन टोकेच; पण इदिरा गाधींचा हा मतदारवर्ग ठरला. या दोन्ही टोकांना इंदिरा गाधी आपल्याशा वाटत होत्या. त्यांच्या राजकीय शैलीतला जोष आणि झगमगाट या दोन्ही टोकाचे एक झळाळते, उसळते मिश्रण होते. त्यांचे राजकीय पुनरागमन झाले, दिल्लीत, तसाच सर्व राज्यात इदिरा कॉंग्रेसपक्ष पुन्हा भरघोस मतांनी निवडून आला, तेव्हा ‘माणूस’ने लिहिले होते—‘प्रामुख्याने दोन टोकांचे वर्गच इदिरा गांधींच्या मागे आज उभे आहेत. शहरातील अति श्रीमंत, पंचतारांकित वर्तुळात वावरणारा किंवा या वर्तुळांचे आकर्षण असणारा वरिष्ठ श्रीमंतवर्ग—ज्यात सगळे नोकरशहा, वडे भांडवलदार आहेत आणि दुसरा खेडचापाडचातला आणि झोपडपट्टीतला गरीबवर्ग पचतारांकित वर्तुळे आणि झोपडपट्टी ही दोन्ही टोके एकत्र आली, (आणि इंदिरा गाधी पुन्हा सत्तेवर आल्या. )” ( १४ जून १९८०) पण पैसा, झगमगाट, जल्लोश आणि जमाव याची आतषबाजी म्हणजे काही लोकशाही समाजवादी विकास नव्हे स्थिर लोकशाहीसाठी, अनुशासनयुक्त विकासासाठी पक्षबांधणी, विशिष्ट धोरणे—विचारसरणी ही आवश्यक अंगे आहेत. ही अगोपांगे हळूहळू लुळी पडत गेली. लोकशाही सस्थाचे एकेक दीप मदावत गेले. सैन्याला गेल्या काही वर्षांत किती वेळा पाचारण करावे लागले ? जातीय धार्मिक दंगलीही स्थानिक पोलीसदलाना आवरता येईनाशा झाल्या. काश्मिरमध्ये तर पं. नेहरूंच्या काळापासूनच कायम सैन्य ठेवावे लागले. इंदिरा गाधींच्या काळात आसाम आणि पंजाब या राज्यांतही वरचेवर सैन्यबळाचा वापर करावा लागला. विकास कुंठित झाल्याची, लोकशाही प्रक्रिया कमकुवत होत गेल्याची ही लक्षणे होती.

¤

पुनरागमन होऊ घातले होते त्या वेळी मी इंदिरा गांधींना दिल्लीत भेटलो होतो. प्रदीर्घ मुलाखत झाली. ती सर्व त्या वेळच्या ‘ माणूस ’ अंकात प्रसिद्धही झाली आहे.

बोलण्याच्या ओघात मी आपली व चीनची तुलना करून म्हटले की, आपल्यापेक्षा चीन पुढे गेला, निदान चीन आपल्यापेक्षा अधिक स्वयंपूर्ण तरी आहे. त्यांचा भारताभिमान डिवचला गेला असावा. त्यांचा स्वर जरा चढला आणि बरबर चीन पाहून काही तरी उथळ-अवास्तव लिखाण करणाऱ्यांविषयी त्यानी कडवट प्रतिक्रिया व्यक्त केली. दिल्लीतल्या वाढत्या गुंडगिरीविषयी बोलणे निघाले. त्यानी अमेरिकेतून येणाऱ्या Permissive Society वाल्यांना फटकारले व आपण आपली भारतीय सभ्यता-संस्कृती कशी जपली पाहिजे हे सांगितले.त्या वेळी मी दिल्लीतल्या आणखीही काही प्रमुख नेत्यांना भेटलो होतो. मला असा तिखट, प्रखर भारताभिमान क्वचित जाणवला. बरेचसे नुसते राजकारणी, सत्तेच्या खेळात दंग असलेले. तासभर ठरलेली मुलाखत दीड तास चालली. ती सपवून मी बाहेर पडलो तेव्हा या व्यक्तीच्या डोळ्यासमोर एक स्वप्नभूमी आहे, एक मिशन आहे असे मला तीव्रतेने वाटले.

¤

खरं म्हणजे पुनरागमनानतर इंदिरापर्वाचा उत्तरार्ध सुरू झालेला होता. भारतीय इतिहासातील त्यांचे स्थान पूर्वीच निश्चित झालेले होते. उत्तरार्धात त्यांची नजर आंतरराष्ट्रीय

क्षितिजाकडे वळली. त्यांचे परदेश दौरे वाढले व तिसऱ्या जगातील देशाचे नेतृत्व त्यांनी लीलया हस्तगत केले. अलिप्त राष्ट्रांची परिषद त्यांनी दिल्लीत घेतली—यजमान म्हणून त्यांना होणारा आनंद चेहऱ्यावर उठून दिसत होता. त्यांना जगाला जणू दाखवून द्यावेसे वाटले असावे की, भारत जरी तिसऱ्या जगतातला देश असला, गरीब असला तरी पुढारलेल्या श्रीमंत देशांप्रमाणे तोही मोठमोठ्या परिषदा, प्रचंड आंतरराष्ट्रीय संमेलने भरवू शकतो, चोखपणे पार पाडू शकतो, बडयाबडया पाहुण्यांची उत्तम बडदास्त ठेवू शकतो; गरिबीचा शिक्का खरं म्हणजे त्यांना चीडच आणत असला पाहिजे. यातूनही हे श्रीमंतीचे प्रदर्शन अधूनमधून घडत असावे!

कलाकौशल्य, क्रीडा, धर्मजिज्ञासा हे त्याचे पूर्वीही आकर्षणाचे, आस्थेचे विषय होते. हे आकर्षण, ही आस्था या पुनरागमनानंतर वाढली. खरं म्हणजे देशात खेळांची पुरेशी मैदाने नाहीत. क्रीडाशिक्षणाची, क्रीडापटू तयार करण्याची चांगली शास्त्रशुद्ध सोय नाही. कुठलाही अनुशासनप्रिय नेता या सोयी, हे शिक्षण कसे उपलब्ध होईल याची काळजी वाहील आपले खेळाडू अधिकाधिक विक्रमी कसे होतील या दृष्टीने क्रीडाक्षेत्राचे तो नियोजन करील, पण यासाठी विश्वासाची, गुणी माणसे हवीत. त्यांचा स्वाभिमान दुखावला जाणार नाही, त्यांच्या नियोजनात हस्तक्षेप होणार नाही, राजकारण आडवे येणार नाही, अशी परिस्थिती हवी. कारण अशा गोष्टी तडकाफडकी, पी हळद की हो गोरी अशा पद्धतीने साध्य होणाऱ्या नसतात. दीर्घ मुदतीची धोरणे यासाठी आखावी, राबवावी लागतात. केवळ झगमगाट, देखावा उपयोगी नाही. एशियाड भरवून आपण झगमगाट केला; पण इंदिरा गांधींची निराशाच केली. सुरुवातीला त्यांनी उद्‌गार काढल्याचे प्रसिद्ध झाले होते की, मी सर्व टीका सहन करते, या सामन्यांसाठी होणाऱ्या खर्चाला मंजुरी देते; पण आपल्या खेळाडूंनी भारताचे नाक वर राहील अशी काही कामगिरी करून दाखवावी. पण द. कोरिया, जपानसारखे लहान लहान देशसुद्धा आपल्याला भारी ठरले! नंतरच्या ऑलेंपिकमध्ये तर आपला बोऱ्याच वाजला. सर्व क्षेत्रात भारत आघाडीवर राहावा, पुढे यावा असे त्यांना वाटत होते. कपिलदेवच्या नेतृत्वाखाली भारताने विश्वचषक जिंकून आणला तेव्हा इंदिराजींची प्रतिक्रिया काय होती? India can do it. आपण, भारत हे करू शकतो. खेळासाठी खेळ, लाभालाभौ जयाजयौ वगैरे केवळ आध्यात्मिक पातळीवरच खऱ्या असू शकणाऱ्या भावनेपेक्षा ही भावना अगदी वेगळी आहे. खेळायचे ते जिंकण्यासाठीच असा हा विजिगिषु वृत्तीचा रोकडा आविष्कार आहे. पूर्वी खेळांसाठी मंत्रिमंडळात वेगळे खाते नव्हते. इंदिराजींच्या काळातच वेगळे क्रीडाखाते निर्माण झाले. असेच लक्ष त्या कलाकौशल्याकडे पुरवीत होत्या. त्यांना संगीताची कितपत आवड होती, कल्पना नाही; पण शेवटी शेवटी रवीशंकर यांच्यामार्फत याही क्षेत्रात काही करण्याची त्यांची योजना असावी अशा बातम्या अधुनमधून येत होत्या. वस्तुसंग्रहालयाना तर त्या वरचेवर भेटी देत होत्या. ओरिसातील त्यांच्या शेवटच्या दौऱ्यातही तेथल्या वस्तुसंग्रहालयाला त्यांनी भेट दिली होती. भारतीय परंपरा जपण्याचे हे एक महत्त्वाचे साधन त्यांना वाटत होते. त्यांच्या मठमंदिरात जाण्याबद्दल अनेकांनी टीका केली, हे सगळे मते गोळा करण्यासाठी आहे असे म्हटले. नाटक माणूस एकदा करेल, दोनदा करेल; पण सतत जेव्हा माणूस एखादी गोष्ट-कृती करतो त्यावेळी तरी त्यामागील भावना प्रामाणिक असल्याचे मान्य करायला हवे. जे. कृष्णमूर्तींना भेटून इंदिरा गांधींना कोणते राजकारण साधायचे होते? विनोबांच्या आश्रमात वरचेवर जाऊन त्यांना किती मते अधिक मिळणार होती? पण साधुसंतांच्या, आचार्यांच्या भेटी त्या शेवटपर्यंत आवर्जून घेत होत्या. त्यांची धर्मजिज्ञासा, आध्यात्मिकता शेवटपर्यंत जागृत होती. मृत्यूपूर्वी नुकत्याच त्या काश्मीरला अचानक जाऊन आल्या. घाईगर्दीच्या राजकीय भेटीगाठींच्या कार्यक्रमातही त्यांनी मध्येच एक तासभर एका शैवसंप्रदायाच्या आचार्यांची भेट घेतली होती. गेल्या वर्षी दिलेल्या एका मुलाखतीत त्यांना इतिहासातील दोन व्यक्तिमत्त्वाबद्दल विशेष आकर्षण असल्याचे त्यांनी म्हटले होते. एक होते आपले आदी शंकराचार्य. दुसरे नाव होते लिओनार्डो—द—व्हिन्सिचे—युरोपीय नवयुगाचा हा एक निर्माता मानला जातो. लहानपणचे इंदिरा गांधींचे आकर्षण जोन ऑफ आर्क. नंतर टागोरांचे, गांधीजींचे संस्कार! नेहरूंनी पूर्ववयातच घडवलेले पत्ररूप विश्वदर्शन! असे हे राष्ट्रवादी, विजिगिषु पण विश्वात्मकतेकडे वाटचाल करणारे व्यक्तिमत्त्व होते. आकाशात उपग्रह सोडले पण गळ्यातली रुद्राक्षांची माळ काही काढली नाही. अंटार्क्टिकावर मोहीम पाठवली, पण तेथील भूमीचे नामकरण केले गंगोत्री. नेहरूंना गंगा प्रिय होती. इंदिराजी हा यमुनेचा प्रवाह होता. शेवटी दोन्ही प्रवाह अलाहाबाद येथे एक होतात...सागराकडे निघतात. बलसागराकडे...

¤

असे नसते तर शनिवारच्या त्या सचित, उदास संध्याकाळी, यमुनेच्या तीरावरील शांतिवनात, इंदिरा गांधींचा देह अग्निसमर्पित होत असताना वेदमंत्रांचे घोष आणि लष्करी हेलिकॉप्टर्सची घरघर आपल्याला एकाच वेळी का ऐकू आली असती? □

राजधानी दिल्ली

# अनाम, दुःखी छायेत

३० ऑक्टोबरची सध्याकाळ होती. दिल्लीत महिनाभर चालू असलेले 'हॅन्डलूम एक्स्पो ८४' हे प्रदर्शन ३१ ऑक्टोबरला सपणार होते. कदाचित त्याची मुदत आठवडाभर वाढण्याचीही शक्यता होती; परंतु त्याची खात्री नव्हती. म्हणून ते संपण्यापूर्वी एक दिवस आम्ही ते पहायला निघालो. तत्पूर्वी शास्त्रीभवनमधील एक काम उरकून तिथून फिरत आम्ही राजपथावरून जाऊ लागलो. प्रदर्शन 'इंडियागेट'च्या पलीकडील हिरवळीवर भरले होते. राजपथावर उभी असलेली 'इडियागेट' ची भव्य कमान दुरूनही जवळ भासत होती. हवेत सुखद गारवा होता. तथापि बराच वेळ चालत असूनही 'इडियागेट' जवळ येत नव्हते. राजपथावर फर्लांगा – फर्लांगाच्या अंतराने क्वालिटी आइस्क्रीमच्या गाड्या उभ्या होत्या. सहज विरगुळा म्हणून आइस्क्रीमचे कप घेऊन खात खात निघालो. ते कप सपेपर्यंत दुसरी गाडी लागली; पण त्या गाडीजवळच्या हिरवळीवर पाच–सहा कावळे बसले होते. मनाला थोडे कसेसेच झाले, परतु आम्ही हातातले कप फेकताच ते घेऊन उडून जाण्याची त्याच्यात स्पर्धा झाली. रस्त्यावर फारच तुरळक रहदारी होती. रस्त्याच्या दुतर्फा असलेली हिरवळीची मैदाने ओस होती. त्या राजपथावरून चालत असताना मनात सहज विचार आला, 'इंदिरा गांधी २६ जानेवारीला याच रस्त्यावरून जात असतात हिरवळीवर खच्चून भरलेल्या जनसमुदायाला नमस्कार करीत, हात हलवीत जातात.' नतर एक–दोन क्षणानी माझे मन आपण इंदिरा गाधीच्या ठिकाणी आहोत अशी कल्पना करू लागले.... त्याबरोबर पहिल्यादा जो विचार मनात आला तो म्हणजे, 'त्याना अवतीभवती बराच धोका जाणवत असेल. जनसमुदायातून जात असताना त्याचे जितके स्वागत होत असेल, तितकीच तिथे त्याना धोक्याचीही संभाव्यता वाटत असेल.' पाय चालत होते... मनही सैरभैर विचारांनी गतिमान होते. सूर्यास्त होऊन अधार पडला आणि आम्ही दिव्यांनी लखलखणाऱ्या प्रदर्शनाच्या दुनियेत जाऊन पोहोचलो.

भारतातील प्रत्येक राज्यातील हॅन्डलूमच्या सर्व प्रकारच्या उत्पादनाचे प्रत्येकी दोन-तीन स्टॉल्स उभे होते. टॅपेस्ट्री, साड्या, चादरी, ब्लॅंकेट्स, शाली, पिशव्या, गालिचे इत्यादि नाना प्रकार. तिथे गेल्यावर समजले की, प्रदर्शनाची मुदत ५–६ दिवस वाढवली आहे. प्रदर्शन भरभर पहायचे म्हटले तरी तास–दीड तास निघून गेला.

दुसऱ्या दिवशी युनिव्हर्सिटीत जाण्यापूर्वी मॅच लागली का हे पहायला टी. व्ही. सुरू केला. तेव्हा विशेष समाचार लागले होते. त्या समाचारात इदिरा गाधीवर गोळ्या झाडल्याची बातमी सागितली गेली. त्याना 'ऑल इडिया मेडिकल इन्स्टिटयूट' मध्ये नेण्यात आल्याचे सांगितले क्षणभर त्या बातमीवर विश्वासच बसेना. नतर वाटले की, कुणी तरी त्याना मारण्याचा प्रयत्न केला असेल; पण तो प्रयत्न फसला असेल. कारण त्याची कुठलीही भेट अथवा भाषण सिक्युरिटीच्या कडेकोट बदोबस्तात असते, हे आम्ही प्रत्यक्ष पाहिले होते. लौकरच त्याची प्रकृती सुधारत असल्याची बातमी ऐकायला मिळेल.

युनिव्हर्सिटीत पोहोचल्यावर विद्यार्थ्यांनी आपापल्या मिनी ट्रांझिस्टरवर ऐकलेल्या ताज्या बातम्या सागायला सुरुवात केली... 'सिक्युरिटीके लोगोंनेही उन्हे गोलियाँ मारी है'... 'Most probably she is dead' ...'It is not yet clearly announced' ...'कहते है सुबह ९। बजेही उनके घरपर उन्हे किसी सरदारने मार दिया है।'

तास सपवून घरी येत होतो. रस्त्यात सर्वत्र दैनदिन व्यवहार सुरळीत चालू होते. राणी झाँसी मार्गावरील सरदारजीची सर्व टायरची दुकाने उघडी होती. दुरुस्तीच्या कोपऱ्यावरील विभागात शिखाची कामे सुरळीत चालू होती. वाटले, अजून खरी बातमी बाहेर पडली नाही म्हणून सर्व सुरळीत चालू आहे किंवा दिल्लीत नेहमीच काही तरी एक्साईटिंग घडत असते, म्हणूनही कुणाला त्याचे काही वाटले नसेल. घरी येऊन सध्याकाळी सहाच्या बातम्या ऐकल्या. 'इदिरा गाधी मरण पावल्या. आज सकाळी त्याच्या निवासस्थानी त्यांची हत्या करण्यात आली त्याच्याच सिक्युरिटी गार्डांनी त्याच्यावर गोळ्या झाडल्या... शनिवार दिनाक ३ नोव्हेंबरला सायकाळी ४ वाजता शांतिवनमध्ये त्याची अत्यक्रिया करण्यात येईल गुरुवारी सकाळी ७ पासून त्यांचा मृतदेह अतदर्शनासाठी 'तीन मूर्ती भवन' मध्ये ठेवण्यात येईल.'

दैवगती किती विपरीत होती. ज्यानी तिच्या सरक्षणाची जबाबदारी स्वीकारली, त्यानीच तिची हत्या केली ! परीक्षितराजाने समुद्रात सुरक्षित महाल बांधला. तथापि तक्षकाने बोरातील अळीच्या रूपाने तिथे येऊन त्याला दंश केलाच ! इदिरा गाधीच्या सिक्युरिटीतही असाच तक्षक दडलेला होता. त्याना भोवताली असलेला धोका आदल्याच दिवशी राजपथावरून जाताना आपल्याला कसा जाणवला, त्याची एक तरल सवेदना कशी सूक्ष्मपणे आपल्या प्रत्ययास आली, हे आठवून मन शहारले.

सपूर्ण दिल्लीवर त्या दिवशी एक उदास अवकळा पसरली सर्वत्र सुटी जाहीर करण्यात आली. 'तीन मूर्ती भवन' मध्ये ठेवलेल्या इंदिरा गाधीच्या मृतदेहाच्या दर्शनासाठी सामान्य जनतेची रीघ लागली. गुरुवार, शुक्रवार आणि शनिवारी पहाटेपर्यंत ही राग अखड चालू होती. विविध देशाच्या प्रतिनिधीनीही अत्यदर्शन घेतले !

टी. व्ही. वर नतर इदिरा गाधीविषयक अनेक कार्यक्रम सादर केले जात होते. त्यात हत्येच्या आदल्याच दिवशी त्यानी केलेल्या ओरिसाच्या दौऱ्याचे वृत्त मी पहात होते. दौऱ्यावरील कार्यक्रम आटपून त्या परतत होत्या, तेव्हा लोकाचा निरोप घेताना त्यानी जमलेल्या हजारो लोकावर फुलाचे असंख्य हार उधळले; पण काळाची खूण काही वेगळीच होती... अकल्पित होती. दौऱ्यावरून परतल्याच्या दुसऱ्याच दिवशी त्याची हत्या झाली आणि... आता हजारो लोक त्याच्यावर फुलाचा वर्षाव करीत होते !

गुरुवारी सकाळी एकीकडे शोकाकुल जमाव त्याच्या अंत्यदर्शनासाठी व्याकुळ झाला होता, तर दुसरीकडे दिल्लीत संतप्त

जमावाने हिंसाचाराला प्रारंभ केला.

बरसातीत बाहेर येऊन पाहिले तर चारी दिशांनी ठिकठिकाणी आगीच्या धुराचे लोळ आकाशात उठताना दिसत होते. गुरुद्वारा, बँका आणि शीख लोकाची दुकाने व घरेदारे जाळण्याचे आणि लुटण्याचे सत्र सुरू झाले. सकाळपासून सध्याकाळपर्यंत आगीच्या बंबाचे आवाज सतत कानी पडत होते. अनेक शिखानी सुरक्षित स्थळी पळून जाण्याचा शहाणपणा केला. अनेकाना या सतप्त जमावाच्या हिंसाचाराला बळी पडावे लागले. चिडून काही शिखानीही त्याचा प्रतिकार केला. पोलिसाची यत्रणा अपुरी पडू लागली. त्रिलोकपुरी, सुलतानपुरी वगैरे विभागातील निम्न-स्तरातील लोकांनी आणि गुडानी हिंसाचाराचे थैमान घातले. वरच्या वर्गातील सुशिक्षित लोकानी शिखाचे सर्वतोपरी सरक्षण केले. सुशिक्षितवर्गातील वस्तीमध्ये कसलीही कटु घटना घडली नाही. उलट या सर्व हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर येथील लोकानी काठ्या घेऊन रात्री अकरानतर गस्त घालण्याचे काम स्वयंस्फूर्तपणे केले. 'जागते रहो, होशिय्याऽर' अशा आरोळ्यांनी त्यानी त्या विभागातील पोलिसानाही इशारा आणि स्फूर्ती दिली. तथापि पतप्रधानाच्या हत्येच्या गभीर घटनेवर दिल्लीतील हिंसात्मक, विघातक घटनानी काळीकुट्ट छाया पसरली. दिल्लीतील कायदा आणि सुव्यवस्थेची सूत्रे मिलिट्रीच्या हाती सोपवण्यात आली. कर्फ्यूमुळे दिल्लीभर उदास, गभीर आणि भयावह वातावरण पसरून राहिले. दोन दिवस सर्व दुकाने बद असल्यामुळे दैनदिन गरजेच्या वस्तूविना लोक हवालदील झाले. दूध, भाजी, अडी, ब्रेड यासाठी लोकांची पहाटे धावाधाव सुरू झाली. भीतभीत, दबकत लोक घराबाहेर पडले होते; परंतु त्यांना रिकाम्या हातांनी परतावे लागले. मदर डेअरी आणि डी. एम्. एस्. च्या बूथवर थोड्याच लोकाना दूध मिळू शकले. गवळ्यानी ६ ते १० रु. लिटरने दूध विकून जोरात धदा करून घेतला तर भाजीवाल्यांनी फक्त शिलकीत असलेले कादे, बटाटे विकून दामदुपटीने कमाई केली. बसेस, दुकाने, मार्केट्स् बद असल्यामुळे एक अनामिक शांतता सर्वत्र पसरून राहिली होती. स्वत.चे बोलणेही वातावरणात घुमत राहिल्यासारखे वाटत होते. एका अनाम, उदास, दु खी छायेने दिल्लीला ग्रासून टाकले होते. नवनिर्मित पंतप्रधान श्री. राजीव गांधी जातिविद्वेषक हिंसाचार न करण्याविषयी लोकाना दूरदर्शनवरून सूचना देत होते. दिल्लीत अनेक ठिकाणी रिलीफ कॅम्प्स काढण्यात आले. तिथे अनेक शीख कुटुबानी आश्रय घेतला. तथापी पुरेशा अन्न-पाघरुणाविना त्याची अवस्था दयनीय झाली. त्याना मदत करण्यासाठी अनेक मदतसंस्थाही स्थापन झाल्या. फड, कपडे, अथरूण-पाघरूण गोळा करण्यात आले. मदतकार्य लगेच सुरू झाले.

शनिवारी पहाटे 'तीनमूर्तीभवन' चे दरवाजे बद करण्यात आले. त्यानंतर अत्ययात्रेची तयारी झाली. दुपारी १२॥ वाजता ही अत्ययात्रा राष्ट्रीय सन्मानाने सुरू झाली. तीनमूर्तीमार्ग, राजाजीमार्ग डुप्लेरोड, विजयचौक, राजपथ, इडिया-गेट, तिलकमार्ग, बहादुरशहा जफरमार्ग, जवाहरलाल नेहरूमार्ग आणि राजघाटावरून ती शातिवनमध्ये पोहोचली. सध्याकाळी चारच्या सुमारास राजीव गाधींनी चितेला अग्नी दिला. एक राजकीय पर्व भडकत्या ज्वाळामध्ये संपून गेले !

काही ठिकाणी हिंसात्मक घटना घडत राहिल्या, तरी एकूण दिल्लीतील वातावरण हळूहळू शात होऊ लागले. पहाटे ५ ते रात्री ९ पर्यंत कर्फ्यूत ढील दिली गेल्याने दैनदिन जीवन बरेचसे सुरळीत सुरू झाले. बसेस काही प्रमाणात सुरू झाल्या. तथापी सर्व शैक्षणिक संस्थाना शनिवार दि. १० पर्यंत सुटी जाहीर करण्यात आली. परिस्थिती अगदी हळूहळू सुधारत असल्यामुळे ही सुटी वाढविण्यात आली होती.

हिंदु आणि शीख समाजाने एकीने, सलोख्याने राहण्यातच मजा आहे हे जाणून अनेक हिंदू-शिखानी मिळून ठिकठिकाणी शातिमोर्चे काढले. 'हिंदु-मुस्लिम-सीख-इसाई, आपसमें है भाई भाई' किंवा 'एक देश भारत देश, एक धर्म मानवता' अशासारख्या घोषणानी आणि फलकानी मोर्चे निघत होते शिखाना वाचवणाऱ्या हिंदूंची प्रशसा करणारे उद्गार आणि पत्रके अनेक शीख लोकाकडून आणि सस्थांकडून ऐकायला, वाचायला मिळत होते. लोकांच्या दु खाचा, सूडाचा, अग्नी पेटून उठला आणि हळूहळू शात होऊ लागला. तरी सावधगिरी म्हणून रात्री कर्फ्यु चालूच आहे. आता रिलीफ कॅंपमधील लोकही घरी परतत आहेत तरीही रात्रीच्या वेळी ते झोपण्यासाठी पुन्हा कॅंपमध्येच येत आहेत.

रात्रीचे ९ वाजले की दिल्लीतील रस्ते झपाट्याने निर्मनुष्य झालेले दिसतात. मिलिट्रीव्हॅनसचे भोगे शांत, नि शब्द वातावरणाला चिरत रस्त्यावरून वेगाने टेहेळणी करीत जातात. वातावरण गभीर, भारलेले बनते. अजून कर्फ्यू किती दिवस राहील, सांगता येत नाही. तथापी लोकाचा शहाणपणा आणि मिलिट्रीचे वास्तव्य याचे व्यस्त प्रमाण बनलेले आहे...असते हे मात्र अशा वेळी लक्षात येते

—ललिता मिरजकर

---

स्वातंत्र्योत्तर काळात
निर्माण झालेली
भारतीय राजकीय संस्कृती
कशी आहे ?

**पैसा, जात, सत्ताग्रहण,**
**गुंडगिरी व पक्षांतर**

या वाईट गोष्टींनाच जास्त
महत्त्व आलेले आहे.
त्यांचा विपरीत परिणाम
संपूर्ण व्यवस्थेवरच कसा
झाला आहे ?—

ते 'माणूस' पुढील अंकात...

# इमीग्रमन

# Immigration

# देशान्तरवास

## १ : नवे घर आणि कुटुंब

सुरुवात कोणी तरी कोठून तरी करावयालाच हवी. खूप दिवसांनी दिल्लीहून सातारला गेलो होतो. आम्ही सर्व भावाबहिणींनी मिळून सातारला आईसाठी एक टुमदार घर बांधलंय. सहज सुचले म्हणून सांगतो. त्यातही एक मजा आहे. आम्ही आईसाठी घर बांधलंय या माझ्या वाक्याचे माझ्या महाराष्ट्रियन मित्रांना काही वाटणार नाही. उलट ते आम्हाला शाबासकीच देणार! पण मी हेच विधान दिल्लीला केले होते त्या वेळी माझे झाडून सारे-दिल्लीकर मित्र त्यावर चिडले होते. त्यांनी सुनावले होते, 'आपण आईवडिलांसाठी काही करतोय असे कधी मनातही आणावयाचे नसते. म्हणावयाचे तर नसतेच नसते. जे काही सारे घडते ते त्यांच्या कृपेने घडते आहे, आपण त्यांच्या आशीर्वादाने त्यात सहभागी झालोय याची जाणीव क्षणभरही पुसू द्यावयाची नसते!'

दिल्लीला दिवसाला किमान चार-पाच सुना जळतात. हे दररोज मुळी वर्तमानपत्रातच येते. हे जळणे हुंड्यापायी होते की एकत्र कुटुंबपद्धतीच्या तणावातून होते हे मला माहीत नाही; पण दिल्लीत आणि उत्तरेत अजूनही एकत्र कुटुंबपद्धती आहे. मोठ्यांना घरात मान देत, त्यांच्या पायाला हात लावणे हा रिवाज आहे. माझ्या दिल्लीतील साऱ्या मित्रांनी मला सांगितले होते, तू जे म्हणतोस त्यामुळे आईला खूप वाईट वाटत असणार. मी मुळी आईलाच हे विचारावयाचे ठरवले होते. आई तशी माझी जवळची मैत्रीण आहे!


या वेळी माझी ८०-८२ वर्षांची वृद्ध आई भलतीच खुशीत आणि उत्साहात होती. मला आवडतो म्हणून रव्याच्या लाडवांचा डबा घेऊन माझी वाट पहात होती. लाडू खाता खाता आमच्या गप्पा रंगत होत्या. मी म्हटले, 'आई, मला खरे खरे उत्तर हवंय. आम्ही भाऊ या नव्या घराबद्दल जे म्हणतो त्यामुळे तुला वाईट वाटते का?', आई स्मरणाला पक्की आहे. त्यातून तिचे वडील, मामा, काका नवरा, दीर सारे वकीलच होते. त्यामुळे कोणता प्रश्न टाळावा कोणत्या प्रश्नाला बगल द्यावी, कोणत्या प्रश्नाला उत्तर द्यावे हे सारे काही जाणते. आई क्षणभर थबकते. मग म्हणते, 'एक वर्षापूर्वी तू आला होतास. त्या वेळी सरदारांच्यावर खूप संतापलेला होतास. भिंद्रनवाल्यापासून गिल्लीतल्या सरदारजीपर्यंत सारे जण आम्ही भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात सर्वांत अधिक त्याग केला असे म्हणतात म्हणून त्यांच्यावर रागावला होतास. त्या वेळी तुला मी जे सांगितले होते तेच पुन्हा सांगते बघ. भारताचा इतिहास गौरवशाली व्हावा म्हणून सरदारांनी खूप काही केलंय हे कोणीच नाकारत नाही. त्यांचा त्याग महाराष्ट्र-बंगालपेक्षा कमी होता असे म्हणणारे पण नेमके तेच करताहेत. अरे, माणसाची भाषा आणि अहंभाव यावरून माणसाचा चांगुलपणा आणि मन कधी तपासू नये. खरे सांगते तुम्ही मुले जे म्हणता त्याचे मला काही वाटत नाही!

□

आई माझी फिरकी ताणते आहे का हे मला समजत नाही. मधेच म्हणते, 'मला वाटते तुला सरदारांच्या प्रश्नातील बरेच काही माहीत असावे. परवा लक्ष्मण माने आला होता. तुझ्या चाणाक्षपणाचे खूप कौतुक करीत होता!'

खरे पाहता लक्ष्मण माझा धाकटा भाऊ नरेंद्रचा मित्र. त्याची माझी नुसती तोंडओळख. आई काय म्हणते आहे हे मला लक्षातच येत नाही. मी म्हणतो, 'आई, मित्रांनी आपणाला चांगले म्हणावे, आपले कौतुक करावे म्हणून तर आपण त्यांना घरी चहाला बोलावतो. मी दिल्लीला म्हणजे राजधानीत असतो. एकमेकांना दावत का देतात आणि कौतुक का होते हे मला पुरते माहीत आहे. चीनने 'पिंगपाँग डिप्लोमसी' केली. भारतात अनादिकालापासून आजपर्यंत फक्त 'डिनर डिप्लोमसी' चालते! तू सातारला म्हणजे तशी

**हा लेख दिवाळी अंकासाठी योजलेला होता. जागेअभावी तो दिवाळी अंकात जाऊ शकला नाही.**




डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर

खेड्यात राहतेस ! त्यातून साताराचे आपले घरही फारसे कधी सोडत नाहीस. तुला यातील काही कळणार नाही !'

आम्ही दहा भावंडे. सात भाऊ तीन बहिणी. आम्ही सारे जण फक्त बोलण्यात पटाईत ! हे पण आईच नेहमी म्हणते; पण आई आम्हा दहा मुलांचे बारसे जेऊन राहिलेली आहे. नुसते जेऊन राहिलेली नाही. बाळंतपणातून उठून तिनेच बारशाचे जेवण करून सर्वांना वाढलंय ! आई थोडीच हरणार ! ती म्हणते, 'खरी राजधानी सातारलाच. त्यातून दिल्लीला; पण सारा कारभार फक्त एका घरातूनच चालतो ! मी तुझ्यापेक्षा खूप चांगली माणसांना ओळखते. ए. बी. शहा, ग. प्र. प्रधान, वसंतराव पळशीकर, मे. पु. रेगे अशा अनेक मंडळींच्या कुंडल्या मी त्यांच्या पहिल्या भेटीतच मांडल्या होत्या. लक्ष्मण माने असे वरवरचे बोलणाऱ्यांपैकी नाही. तो आहे एक साधाभोळा माणूस !' मी म्हटले, 'कोणताच साधाभोळा माणूस या देशात आज यशस्वी होत नाही हे १०–१२ वर्षे दिल्लीला राहून मी नक्की शिकलोय. प्रत्येक यशस्वी माणूस आज कळत–नकळत समोरच्या माणसांना एक टोपी घालून मोकळा होत असतो !'

आई रागावते. म्हणते, 'स्वत:वरून जगाची परीक्षा करू नकोस. लक्ष्मण तुझ्याबद्दल काय म्हणत होता ते ऐक. तू गेल्या वर्षी येथे आला होतास त्या वेळी लक्ष्मण आला होता. त्याच्याशी बोलताना पंजाबमध्ये सैन्य घुसवावेच लागेल आणि सैन्य घुसवले तरच पंजाबचा प्रश्न सुटेल असे म्हणाला होतास. तुझे म्हणणे अगदी बरोबर निघाले म्हणून तो तुझ्या चाणाक्षपणाचे कौतुक करीत होता.

— मी फक्त खिन्नपणाने हसलो. आज या विषयावर मला आईला किती वेगळे विचार सांगावयाचे होते.

## दोन : अगतिक म्हणून अतिरेकी

एक वर्षापूर्वी मी आग्रहाने असे म्हणालो असणार हे तर खरेच. कारण त्या वेळी सुवर्णमंदिरात जाऊन मी भिंड्रनवाल्यांना भेटून आलो होतो. त्या दोन डोळ्यांच्या मी प्रेमात पडलो होतो. कोणावरही मोहिनी करू शकणाऱ्या या डोळ्यांनी मला झपाटले होते. त्यांना भेटणाऱ्या प्रत्येक माणसाचे हेच झाले. त्यातून त्या डोळ्यांतील वेदना आणि द्वेष किती बोलके होते. समर्पणाची, हौतात्म्याची केवढी विलक्षण ओढ त्या डोळ्यांत होती. त्यातून ते डोळे हट्टी लहान मुलाचे होते. आपणावर अन्याय झालाय, आपली सारी श्रद्धास्थाने छिन्नभिन्न झालीत आणि आपण त्या सर्वांचा सूड घेणार आहो अशा भावनेने ते डोळे पेटलेले होते.

— आपण जे करतो आहोत त्याचे परिणाम काय होतील याचा अजिबात विचार न करणारे डोळे होते ते. का कोण जाणे, नथुराम, वासुदेव बळवंत, माओ त्से तुंग यांचे डोळे काही वेळा असेच दिसले असणार असे मला राहून राहून वाटले होते— जगातील कोणताही युक्तिवाद आणि तर्कसंगत विचार या डोळ्यांनी पुढे मांडलेल्या प्रश्नांशी सामना करू शकत नाही. हे सारे झपाटलेले पतंग असतात.

मी भिंड्रनवाल्यांना भेटावयास गेलो यालाही दोन–तीन कारणे होती. माझे खूप सरदार मित्र आहेत. ते मागे लागले होते. सरदारांचा प्रश्न उग्र होणार हे आशियाड झाले त्याच वेळी नक्की झाले होते. आशियाडच्या वेळी मी खूप भटकलो होतो. त्या वेळी 'माणूस'मध्ये 'सात आंधळे आणि एक अप्पू' हा एक प्रदीर्घ लेख मी लिहिला होता. त्यात 'सरदारजी आशियाडचे तरी बारा वाजवतील नाही तर स्वत:चे तरी' म्हणून मी एक विधान केलंय. प्रचंड किंमत मोजून जगमोहन यांनी आशियाड फत्ते करून दाखवले. त्या वेळी अतिरेकी नव्हते असे नव्हे. सरदार आपणावर अन्याय होतो म्हणून चिडलेले नव्हते असेही नव्हे; पण काटयाचा नायटा झालेला नव्हता. जगमोहन यांनी हे सहजपणे करून दाखवले. सरदार मुळातच खेळप्रेमी आणि उत्सवप्रेमी. ट्रक्स आणि बसेस भरभरून खेडयापाडयांतून खेळ पाहण्यासाठी सरदार येत होते आणि हरियाणाच्या सीमेवरून ते फक्त सरदार आहेत म्हणून त्यांना परत पाठवले जात होते. प्रत्येक स्टेडिअमवर कडक तपासणी होत नव्हती असे नव्हे; पण चुकूनसुद्धा एकही सरदार या तपासणीतून सुटत नव्हता. तो केवळ सरदार आहे म्हणून पागोटयापासून सारे काही सोडून तपासले जात होते ! हे

सरक्षण व सुरक्षिततेच्या दृष्टीने बरोबर पण असेल; पण प्रत्येक सरदार फक्त सरदार आहे म्हणून त्याच्या देशात सशयित गुन्हेगार ठरत होता ! पूर्वी गावात रामोशी ठरत असत तसे !

सरदाराना त्या वेळी काय यातना झाल्या असतील हे दलितानासुद्धा समजणार नाही. ते समजावेसे वाटत असेल तर अमेरिकेत जा. न्यूयॉर्कमधील निग्रोबरोबर भटका. न्यूयॉर्कच्या त्या अती उच भव्य बिल्डिंगच्या खालील भुयारी रेल्वेत शिरा थिजलेल्या भयाण डोळ्याचे निग्रो त्यात खच्चून भरलेले असतात.

– दलित तोंडावर आपण दलित आहोत असा शिक्का मारून हिंडत नाहीत मी महाराष्ट्रीयन आहे; पण मी बसमधून हिंडताना मी मराठी आहे हे काही बाकीच्याना ओळखता येत नाही समजा उद्या शिवसेनेने मुंबईत काही गडबड केली आणि दिल्लीत म्हणून मराठी माणसावर लोक चिडले तरी मी मराठीच आहे याची जाहिरात नेहमी माझ्याबरोबर नसते मी दिल्लीमधून त्या वेळी सुद्धा निर्धास्तपणे हिंडू शकतो शीख आणि निग्रो याच्याबाबत हे सभवत नाही. बाकी समाजाच्या नजरा आपणाकडे सशयाने, उपेक्षेने पाहताहेत असे त्याना दरक्षणी जाणवत राहते. अधिक अगतिक आणि म्हणून अतिरेकी बनत ते इतराच्यापासून दूर दूर जातात आणि एकमेकाच्या अधिक जवळ येतात. सरदाराचे आजचे आक्रस्ताळी, आततायी वागणे हे असहाय्यतेतून, अगतिकतेतून निर्माण झालेले आहे.

## तीन : देश आपल्याला कधी समजेल ?

मी असा काही विचारात होतो, आई आपल्या काही कामात. सातारला गेलो की दिवसभर मी आता घरीच असतो. माझे सारे बालपण सातारला गेलय; पण त्या वेळचे माझे कोणीच मित्र तेथे नाहीत. असले तरी तो पहिला ओलावा आता कमी झालाय. मला सातारला गेल्या दोन वर्षांत तीन–चार नवे मित्र मिळालेत अजिक्य प्रकाशनचे वाळिंबे, डॉ. महाजनी, सर्जन मत्री वगैरे ‘माणूस’मधील माझे गोंडा, आशियाड, किसानमेळावा असे काही लेख वाचून ओळख काढीत ते घरी आले. आधी आम्ही एकमेकाना अजिबात ओळखायचो नाही. थोडक्यात काय मी दिवसभर घरी असतो. माझे आणि आईचे सभाषण तुटक तुटक दिवसभर सुरू राहते; पण आई स्मरणाला पक्की आहे. मला कौतुकाने विचारते, तू लक्ष्मणला खरेच असे काही म्हणाला होतास. कसल्या विचारात गुतला आहेस एवढा ?

मी म्हटले, ‘आई, विचार करतोय तुझा ! तू देवाची पूजा करीत नाहीस. उपासतापास करीत नाहीस. वडील असताना मगळसूत्र घातले नाहीस शिवाशिव कधी मानली नाहीस. मग तुला सोन्यासारखी अशी मुले कशी मिळाली ? एवढे भरलेले एकत्र कुटुब तुला कसे मिळाले ? कोणता मत्र तू जपायचीस ? कोणता वसा तू घेतला होतास?’

आई एकदम चिडते. म्हणते तुझ्या पायाला घाण लागली बघ ! अरे, स्वत बद्दल असे काही बोलायचे नसते. स्वत चीच स्वतःला नजर लागणे हे अगदी खरे आहे. तुझे तोंड तेवढे जप बाबा आणि पुन्हा एकदा विषय बदलीत कौतुकाने विचारते, तू लक्ष्मणाला खरेच असे काही म्हणाला होतास ?

मी म्हटले, आई, ही तुला न समजणारी माझी चलाखी आहे. लहानपणी क्रिकेटचा कसोटी सामना सुरू झाला की, मी तीन मित्राना तीन वेगळी भविष्ये सागावयाचो. सामना आपण जिंकणार, आपण हरणार व सामना अनिर्णित राहणार म्हणून. त्यापैकी एक जण मला नतर भलताच मानायचा. परीक्षेच्या वेळी आपले भविष्य विचारावयाससुद्धा माझ्याकडे यायचा ! पण खरे सागतो, एक वर्षापूर्वी मी लक्ष्मणला तसे म्हणाले होतो. वाळिंबे, डॉ. मंत्री, डॉ. महाजनी या सर्वांना आग्रहाने माझे हे मत ऐकवले होते; पण हे माझे वर्षापूर्वीचे मत होते. त्या वेळी मी फक्त भिंड्रनवाल्याना भेटून आलो होतो. त्यानंतर मी सरदार मित्राच्याबरोबर पजाबच्या खेड्यातून खूप फिरलो आणि माझे मत बदलले. सुवर्णमदिरात आपले सैन्य गेले त्याच्या आधी चार-पाच दिवस आपण सैन्य तेथे पाठवणार हे दिल्लीत अनेक जण जाणून होते. सैन्य पाठवले नसते तर भिंड्रनवाले लाखो शिखांना तेथे बोलवून खलिस्तानची घोषणा करणार आणि पाकिस्तान त्यांना मान्यता देणार येथवर वातावरण होते; पण अगदी त्या वेळीही सुवर्णमदिरात फौजा घुसवणे चुकीचे आहे असे माझे मत होते. त्यानंतर फौजा सुवर्णमदिरात घुसल्या अनेक गोष्टी बाहेर आल्या. आपण केले ते अगदी बरोबर केले असे मला वाटले त्यानतर आता पुन्हा एकदा करसेवा सरबत खालसा याच्या निमित्ताने मी पजाबमधून भटकून आलोय आणि पुन्हा एकदा गोंधळात पडलोय मला फक्त भटकायला, बघायला जमत, विचार करावयास अजिबात जमत नाही हे तुझे म्हणणे मला अगदी मान्य आहे ! पण माझी गोष्ट सोड. या पजाबने भल्याभल्याना झटके दिलेत. देशातील कोणतेही मोठे वर्तमानपत्र काढून बघ. दर पधरवड्याला त्याची मते पूर्णपणे बदलत गेलीत. आपला सुब्रह्मण्यम स्वामी भिंड्रनवाल्याना भेटून आला· सुवर्णमदिरात अजिबात काही लष्करी तयारी नाही आणि तेथे फौजा पाठवल्यात तर भारताचे तुकडे झालेच म्हणून समजा. म्हणून त्याने लेख लिहिला. हा लेख लिहिताना ‘ऑपरेशन ब्ल्यू स्टार’ ची त्याला माहिती नव्हती यावर माझा विश्वास नाही. त्याची गोष्ट सोड. टाइम्स म्हणजे मराठी माणसाच्या दृष्टीने केवढे दादा वर्तमानपत्र ! कोलाट्या उड्या वाटाव्यात अशा त्यानी भूमिका बदलल्या आहेत ! मजा म्हणजे आपल्या प्रत्येक भूमिकेचे छान समर्थन केलंय !

तुला एक मजा सागतो. आम्हा अधून-मधून लिहिणाऱ्या भावात अजिबात न लिहिणारा तुझा मुलगा दिनू तुला फार आवडतो. तो आम्हा सर्वांत अधिक शहाणा आहे असे तुझे अगदी प्रामाणिक मत आहे. माझ्या इतर भावात मलाही तो आवडतो कारण माझ्यासारखाच तो पण भरपूर हिंडतो. भरपूर बघतो. नोकरी, स्थिरता वगैरे फारसे मनावर घेत नाही. त्याने पाच-एक वर्षे पंजाबात नोकरी केली. तुझी आठवण यावयास लागली. त्याने ती नोकरी सोडली. भोरला येऊन त्याने भोर इंडस्ट्रीत नोकरी धरली, आठवड्यातून दोनदा तुझ्याकडे यावयास मिळावे म्हणून. आता काल-परवा ती नोकरी सोडून अंमळनेरला प्रताप मिल्समध्ये प्रोसेसिंग मॅनेजर म्हणून निघून गेलाय. अजून तेथेच असले का हे मला व तुला दोघांनाही सांगता

येणार नाही. या देशात भरपूर नोकऱ्या आहेत. प्रचंड संधी सर्वत्र भरून उरलीये. हा सारा देश आपला आहे. सगळीकडे एक वेगळी वेगळी गंमत भरून उरलीये. स्थिरतेची, सुरक्षिततेची एक वेड्यासारखं मनात धरलेली भावना मनातून झटकून टाकली की, या देशात सर्वत्र आनंदीआनंदच भरलाय हे माझ्यासारखे त्याने पण ओळखलय.

मी तुला सांगत होतो वेगळेच. अमळनेरला जाण्यापूर्वी गेल्या आठवड्यात तो गंमत म्हणून एक आठवडा दिल्लीला आला होता. हा देश आपण आपला मानतो; पण गंमत म्हणून असे देशभर हिंडत नाही. आपल्या घरात बसून हा देश व या देशातील प्रश्न आपण समजावून घेण्याचा प्रयत्न करतो. गंमत म्हणून आपण ते पैसे चहापार्टी, सिनेमा, कपडे, दूरदर्शन अशा अनेक गोष्टींवर उडवतो. पूर्वीच्या काळी पायी चार धामाची यात्रा करताना हा देश आयुष्यात एकदा तरी माणसांना दिसत होता आणि जाणवत होता. आज तसे काहीच नाही. आज घरी बसून प्रत्येक विचारवंत या देशाचे प्रश्न सोडवतोय !

ते असो. तो दिल्लीला आला त्या वेळी त्याने बोलता बोलता धमाल केली. या वेळी त्याने चक्क गिरीलाल जैन यांना धोबीपछाड घातली. त्याने एक नवाच मुद्दा उपस्थित केला. 'या देशातील कोणत्याही विचारवंताने कोणतीच गोष्ट घडण्यापूर्वी हेरली नाही स्वातंत्र्यानंतर निर्माण झालेले या देशातील शिवसेना, आसाम, खलिस्तान, लोकसंख्या कोणतेही प्रश्न विचारवंतांनी आधी सांगितले नाहीत. आणखी पाच वर्षांनी या देशासमोरचा महत्त्वाचा प्रश्न कोणता असेल हे छातीठोकपणे सांगणारा विचारवंत वा संपादक आपण पाहिलेला नाही. पाच वर्षांची गोष्ट विसरा. आणखी दोन वर्षांनी त्या वेळी या देशासमोर सर्वांत महत्त्वाची समस्या कोणती असेल हे कोणीच सांगू शकणार नाही. घटना घडते त्या वेळी पुस्तके उघडून तुम्ही उत्तरे शोधता. हा देश समजावयास गांधीजींची प्रतिभा हवी, सानेगुरुजींचे हृदय हवे. सावरकर, राजाजींची बुद्धिमत्ता हवी हे तर खरेच. हे आज कोणाजवळ नाही हे पण खरे. पण घरी बसून हा देश आपणाला समजणार आहे असे आपण का समजतो ?

यावर कोणीच काही बोलू शकत नाहीत. मध्येच कोणी तरी एक उर्दू शेर सुनावतो. ही आपली उत्तरेची एक खास आदब. शायर सूर्याला म्हणतोय, 'तुमसे न तो ये उम्मीद थी'–अरे, तू सुद्धा या वेळी एवढा थोडा प्रकाश वाटणार असे नव्हते रे वाटले ! उर्दू शायरीनंतर होणारी वाहवा वगैरे होते. मी मनात म्हणालो, उजेडाचा कसला हिशोब मांडताय. आमचा सुरेश भट वाचा. 'इथे सूर्य अंधाराच्या वाहतो पखाली'– भरभरून बोलणारे विचारवंत, संपादक, नेते अधीमधी लिहिणारे आमच्यासारखे अलवते-गलबते आज दुसरे काय करताहेत ?

## चार : भिंड्रनवालेंची मुलाखत

पण आईने ८० उन्हाळे–पावसाळे पदरात बांधलेत. समोरचा माणूस बोलतो त्यातला भुसा किती आणि धान्य किती हे ती बरोबर हेरते. माझ्या इतर अवांतर आलतूफालतू बोलण्याकडे ती दुर्लक्ष करते. म्हणते, 'तुम्हा सर्वांत माझा दिनू आहेच खरा हिरा; पण काय रे तू खरेच भिंड्रनवाल्याला भेटला होतास का ?' आईच्या या प्रश्नाने मी चमकतोच. म्हणतो, 'आई, मी खोटे बोलतो; पण इतके खोटे बोलत नाही; पण तुलाही माझ्याबद्दल असा संशय यावयास लागला असेल तर मी आता प्रस्थापितातच सामील झालोय असे म्हणावयास हवे !'

त्या वेळचा माझा 'माणूस' कचेरीतील पत्रव्यवहार याला साक्षी आहे. डॉ. मत्री, डॉ. महाजनी, वाळिंबे या सर्वांशी मी त्या वेळी याबाबत सविस्तर बोललोय. मी भरपूर भटकतो. खूप पाहतो; पण प्रत्येक वेळी आपण लिहिलेच पाहिजे असा हट्ट धरून लिहीत नाही. सध्याच्या भाषेत स्वत:ला स्वत:च्या लिहिण्याची 'यत्ता' माहीत असली की किती बरे असते ! तुला सांगतो. मला नानाजींचा गोंडाप्रकल्प पहावयाचा होता. माणूस कचेरीतून पाचशे रुपये उचलले नानाजींच्याचबरोबर गोंडाप्रकल्प भरपूर भटकलो. त्याच्यावर एक लेखमालाच लिहिली त्यानंतर सर्वोदयवादी प्रेमभाईंना उत्कृष्ट नवनिर्माणाबाबत एक लाखाचे जमनालाल पारितोषिक मिळाले. पुन्हा माणूस कचेरीतूनच पैसे उचलले त्यांच्या मिर्झापूरच्या आदिवासी प्रकल्पातून भरपूर भटकलो. प्रेमभाई आणि रागिणीताई यांच्याशी खूप वादविवाद केला त्या दांपत्याचा खूप प्रेमळ पाहुणचार घेतला. अजून त्यावर मी एक छदाम शब्द लिहिलेला नाही. आपण लिहिलेच पाहिजे या हट्टातून माणूस मोकळा झालेला असला की किती बरे असते !

ते असो. मी भिंड्रनवाल्यांना भेटायला गेलो त्या वेळी खलिस्तानची चळवळ आकार घेत होती. डॉ. बलकारसिंग, डॉ. प्रकाशसिंग, श्री. अमरजीत हे माझे सहकारी शास्त्रज्ञ मित्र माझ्याबरोबर होते. संघ, मुस्लीमलीग, साम्यवाद, शेतकरी संघटना, खलिस्तान या साऱ्या चळवळी एका वर्गासाठी उभ्या राहतात या वर्गाची समाजात झालेली दुर्दशा त्यांना सुधारावयाची असते. स्वत:ची अस्मिता त्यांना जोपासायची असते. स्वत:वर अन्याय करणाऱ्या वर्गाची खिल्ली उडवीत त्याचे मर्मस्थान शोधावयाचे असते. अनुयायांना हे पटवून देण्यासाठी त्यांची बौद्धिके आणि त्यांचे 'कॅपिटल' त्यांच्याबरोबर असते शीख तरुणांच्या हातात फार मोठ्या प्रमाणावर दिसणारी अशी काही पुस्तके माझ्या मित्रांनी मला वाचावयास दिली होती. या पुस्तकांची पण कमाल आहे ही पुस्तके देशविदेशात मिळण्याची ठिकाणे त्या पुस्तकात दिलीत. भारतात ती चंदीगड, अमृतसर, दिल्ली अशी फक्त मिळतात. भारताबाहेर मात्र जपान, थायलंड, हाँगकाँग, सिंगापूर अशा अनेक ठिकाणी मिळतात. एका छोट्या पुस्तिकेचे नाव आहे 'सर्वोत्तम धर्मग्रंथ आदि श्रीगुरुग्रंथसाहिब' श्री स्वामी रामतीर्थजी दण्डी सन्यासी यांनी ती लिहिली आहे. वेद, पुराण, मनुस्मृती यातील दाखले देऊन हिंदू धर्मात किती वाईट गोष्टी आहेत याचे एकांगी दर्शन आहे ब्राह्मण लाखो गायींचे मांस कसे खात, शिव आणि विष्णू यांनी ऋषि-पत्नींशी कोणते चाळे केले, मनुस्मृतीने कोणते अत्याचार सांगितलेत या सर्व गोष्टी या पुस्तिकेत चवीने सांगितल्यात. या सर्वांमुळे भ्रमनिरास होऊन आपण हिंदू धर्म सोडून श्रीगुरुग्रंथसाहेबच्या पायाशी येऊन शीख का बनलोय हे स्वामी रामतीर्थजी दण्डी सन्यासी यांनी पटवून दिलय. मी मित्रांना

म्हटले यातील सारे काही मला मान्य आहे. पाहिजे तर या पुस्तिकेत भरण्यासाठी मी स्वामीजीना आणखी मणावारी मालमसाला देईन; पण यामुळे मी हिंदू धर्म का सोडावा हे मला समजत नाही. जगातील साऱ्या प्राचीन धर्मात अशा गोष्टी असणारच बालपणात या गोष्टीमुळे किती बरे वाटते मुलाच्या हातात तुम्हाला हनुमान पाताळविजय तरी द्यावा लागतो, नाही तर जेम्स बॉंड तरी ! या पुस्तकातील सारे काही मला मान्य आहे असे म्हटल्याने भिड्रनवाले माझ्यावर भलतेच खुश झाले ! मी त्याना म्हटले, 'दौलत राय की दृष्टिसे साहिब्रे कमाल गुरुगोविंदसिंह' या दुसऱ्या पुस्तकामुळे मी थोडा भाबावलोय. या पुस्तकात ठिकठिकाणी कारण नसताना शिवाजीवर हल्ला केलाय. श्रीगुरु गोविंदसिंगाना मोठे ठरवण्यासाठी शिवाजीला छोटा ठरवायचा प्रयत्न केलाय. पुस्तकात पान १७१ वर म्हटलय, 'गुरु गोविंदसिंगके जीवन-काल में उन के उद्देश के पूर्ण न हो सकने का पहला कारण यह था की शिवाजी की भान्ति वे चालबाज न थे और न ही ऐसा करना उन्होने गौरव के अनुकूल समझा.' पृष्ठ २१९ वर तर हे पुस्तक आणखी पुढे गेलय 'शिवाजी जो काम करता था उसमे राष्ट्रीय भलाई तो शामिल थी, पर उसकी सारी शक्ति तथा यत्न के पीछे स्वार्थ और निजी प्राप्ति की भावनाही समाई हुई थी, गुरुगोविंदसिंगजी र्हुका उद्देश्य निरोल निश्काम था। अपने लिए, राजसत्ता और शक्ति प्राप्त करने के लिये जिहाद करना अलग बात है और इस नीयत से आंदोलन करना और क्रान्ति लाना कि हिंदुस्तान, हिंदू जाति और सारे राष्ट्र को ही आजाद करवाया जाये और देश के शत्रुओको देश मे से निकाल दिया जाये बिलकुल ही अलग बात है।' मी म्हटले, 'शिवाजीची नालस्ती करत असतानाच ह्या देशाचे नाव काय, या देशाचे शत्रू कोण, आपल्यासमोरचे कार्य काय हे तुम्ही सहजपणे या पुस्तकात सागून गेलाय. आजही किमान दोन-तीन वर्षांपूर्वीपर्यंत, तुम्हा सर्वांचे असेच म्हणणे होते; पण मला एका गोष्टीचे फार वाईट वाटत भिड्रनवाले. शिवाजी आणि श्रीगुरुगोविंदसिंग हे दोघेही हिमालयासारखे मोठे आहेत. तुमच्या-माझ्यासारख्या लिलिपुटियन्सनी त्याची उंची मोजायचा प्रयत्न करू नये.' भिड्रनवाले मला बोलावयासच देत नाहीत. मध्येच एकदम सतापतात. एखाद्या हट्टी जिद्दी मुलासारखे. माझ्या प्रश्नाला उत्तर पण देत नाहीत. मध्येच मला प्रतिप्रश्न विचारतात. ही भिड्रनवाल्याची खास पद्धत होती. त्यानी कोणालाच कधी उत्तरे दिली नाहीत. फक्त चिडलेले, दुखावणारे प्रतिप्रश्न विचारले. भिड्रनवाले म्हणतात, 'शिवाजीला थोडा कमी मान दिला तर तुम्ही एवढे चिडता. श्रीगुरुगोविंदसिंगाची साऱ्या देशभर एवढी अवहेलना चालली आहे, त्याची आठवण तरी आहे कोणाला ? त्याचे एक तरी मोठे स्मारक आहे तुमच्या भारतात ? शीख तुम्हाला फक्त चेष्टा करण्यासाठी आणि मारण्यासाठी हवे आहेत !' —मी भाबावलो. चटकन म्हणालो, 'मी लहानपणी सघात जायचो. शिवाजी, राणा प्रताप, गुरुगोविंदसिंग तिघाच्या तसबिरीना वंदन करीत आमची सचलने आणि बौद्धिके व्हायची. त्याच्या प्रात स्मरणात शिखाचा गौरवपूर्ण उल्लेख आहे.' भाबावलेल्या अवस्थेत मी एक फार मोठी चूक केलेली आहे हे मला नतर समजते. आमची मुलाखत तेथेच सपते. मी संघाचे नाव काढलय आणि भिड्रनवाले बिथरलेत. मुलाखत तेथेच सपते. —या सघीयाची पण कमाल आहे याना शिखांच्याबद्दल प्रेम आहे. दलिताच्याबद्दल कळवळा आहे. त्याचे चागले होऊन हा देश एकसध व्हावा असे वाटते— पण स्वत-बद्दल गैरसमज कसे पसरवावेत आणि वाढवावेत हे या सघीयापासून शिकावे. नाही तर सघाचे नुसते नाव काढल्यावर, आम्हालाच अस्पृश्य समजून दलित आणि शीख आम्हाला रामराम का करतात ? संघ तसा महाराष्ट्रियनाचा असल्यामुळे स्वत बद्दल गैरसमज निर्माण करणे आणि वाढवणे त्याना सहजपणे जमत असावे का ?

—मी भिड्रनवाल्याना भेटणारा पहिला महाराष्ट्रीय असेन. त्याना भेटणारा शेवटचा माणूस पण महाराष्ट्रियनच होता. दिल्लीचा टाइम्स ऑफ इंडियाचा सुभाष किरपेकर. त्याच्या अधीमधी एस्. एम., ना. ग गोरे, सुब्रह्मण्यम स्वामी वगैरे अनेक मडळी त्याला भेटून आली; पण मला वाटते हा कुणालाच समजला नाही. याला खलिस्तान हवय की नकोय हे सुद्धा समजले नाही. याला भेटून आला त्या वेळी स्वामी भलताच भारावलेला होता. तो म्हणाला, हा माणूस बोलताना अजिबात कात्रीत सापडत नाही. मी म्हटले, स्वामी उगाच खोटे बोलू नकोस. अरे बोलणे, लिहिणे या आणि फक्त याच मर्यादित भाडवलावर तू आणि मी दिल्लीतील आपापल्या क्षेत्रातील आपापली दुकाने साभाळून आहोत. दिल्लीत इतर सर्वांजवळही आज फक्त एवढेच भाडवल आहे अरे, 'आमने सामने' बोलताना तुला कोणी हरवेल असे मला अजिबात वाटत नाही. तू हरलास कारण तुझा बोलविता धनी वेगळा आहे ! या देशाच्या इतिहासातील एक निर्णायक अगतिक क्षण आपल्या समोर उभा आहे आणि या क्षणी या देशातील बहुतेक सारे प्रस्थापित आणि विचारवत विकाबू आहेत. काही जण विकाबू नाहीत कारण त्याच्या केव्हाच कठपुतळ्या बनल्यात ! पण ते असो. तुला, मला व इतर कोणालाच भिड्रनवाले समजला नाही हे तर खरेच. खरे सागू 'गांधीहत्या आणि मी' व 'लाल किल्यातील अभियोगाची कहाणी' ही पुस्तके वाचताना गोपाळ गोडसे आणि इनामदार या दोघानाही नथुराम समजला नव्हता असे मला वाटले होते. मला तर अजूनही तो समजलेला नाही. कारण ही माणसे समजण्याच्या पलीकडची असतात. इतिहासात काही तरी गोची करून जाण्यासाठी ही माणसे जन्माला आलेली असतात किंवा इतिहास आणि वर्तमान याच्या विचित्र सकरातून त्याचा त्या क्षणी अपरिहार्यपणे जन्म झालेला असतो !

## पाच : पंजाबचा प्रश्न : भाषा–शेती

पण भिड्रनवाले ही पजाबच्या प्रश्नाची सुरुवात नव्हे. तो पजाबच्या प्रश्नाचा शेवटही नव्हे. हे फक्त मधले एक महत्त्वाचे प्रकरण आहे– खरे पाहता पंजाबचा प्रश्न निर्माण झाला त्या वेळी सारेचजण तसे सहजपणे घेत होते– तसे पाहिले तर पहिलवान आणि सरदार या मंडळींबद्दल आपल्या सर्वांच्याच मनात नेहमीच आदर असतो. ही मडळी मनाची सरळ असतात. दिलदार असतात. त्याना थोडा




मान दिला की, त्यांना फार बरे वाटते. मित्र म्हणून ही मंडळी हवी-हवीशी वाटतात. अगदी निरागस मनाने यांची थोडी फिरकी ताणायला बरे वाटते; पण या मंडळींशी तात्त्विक वादविवाद वगैरे करावयाचा नसतो. मंडळी विथरली असे वाटले तर त्यांच्या अजिबात वाटेला न जाता साळसूदपणे बाजूला व्हावयाचे असते. सरदार आणि पहिलवान यात असे खूप साम्य आहे. तुम्हाला पहिलवानांची एक गोष्ट सांगतो. युवराज–सतपाल कुस्तीच्या वेळी मी हजर होतो. नंतर दिल्लीला गेल्यावर गुरु हनुमानांच्या आखाड्यात जाऊन सतपालवर काही अन्याय झालेला नाही. युवराज छानपणे कुस्ती जिंकलाय म्हणून मी सांगितले. त्यानंतर वर्षभर गुरु हनुमानांच्या आखाड्याकडे फिरकण्याची माझी हिंमत झाली नाही ! पण ऑलिंपिकच्या वेळी हे दिल्लीचे सारे कुस्तीगीर मित्र मला भेटले आणि सारंग आणि युवराज यांच्यावर अन्याय होतोय म्हणून त्यांनी संतापून सांगितले ! त्यांना खरोखरच वाईट वाटले होते. सारंगच्या कुस्त्या त्यांच्यासमोर झालेल्या होत्या आणि सारंगवर अन्याय झालाय म्हणून दिल्लीचे कुस्तीगीर स्वतःचा आखाडा विसरून अस्वस्थ झाले होते. कारण या मंडळींची स्वतःची अशी एक सरळ धोपट विचार करण्याची पद्धत असते आणि ती पद्धत फार ताकदवान असते. स्वतःसमोर घडलेल्या घटनांत ही माणसे सर्वसामान्यपणे फसवली जात नाहीत. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे स्वतःच्या छोट्यामोठ्या स्वार्थासाठी बनियासारखे जे घडले ते घडलेच नाही असे सांगत नाहीत. त्यांना स्वार्थ नसतो असे नव्हे; पण यांचे प्रेम, त्याग, स्वार्थ, व्यवहार कसे रोखठोक असते.

पंजाबचा प्रश्न २–३ वर्षांपूर्वी पुढे आला त्या वेळी इतरांचे विसरा खुद्द माझे सरदार मित्रसुद्धा अगदी सहजपणे घेत होते. एका प्रख्यात शीख लेखकाने त्या वेळी कॉफीहाउसमध्ये एक किस्सा सुनावला होता. दोन शेजारी होते. एक शीख एक मद्रासी. एके दिवशी सकाळी शीख माणूस मद्रासी शेजाऱ्याकडे गेला आणि म्हणाला, तुझ्या गाईने माझी सारी बाग उध्वस्त केली आहे. तुला काही वाटते की नाही ? मद्रासी माणूस बिचारा भांबावून गेला. तो म्हणाला, अरे, मी कधी गायच पाळली नव्हती. सरदारजी म्हणाला, अरे, मी तरी बाग कुठे लावली होती ? पण आपण जवळ राहतो. बोलायला, भांडायला, भेटायला काही विषय पाहिजे की नाही !

पण दिवस पुढे जात होते. पंजाबचा प्रश्न चिघळू लागला होता. अगदी त्या वेळीही भिंड्रनवाले, लोंगोवाले यांनी एक बालिश अव्यावहारिक सूचना पुढे मांडली होती. भिंड्रनवाले, लोंगोवाल, बाई, राजीव, विरोधी पक्षांचे नेते या सर्वांची आमने–सामने चर्चा व्हावी. ही सारी चर्चा रेडिओ व दूरदर्शनवरून क्रिकेटसामना दाखवतो तशी सविस्तर सर्वांना दाखवावी. शिखांची वेदना सर्वांना समजावून द्यावी व शिखांना काय देणार आहोत, काय देऊ शकणार नाही ते इतरांनी पटवून द्यावे. त्या वेळी या मार्गाने हा प्रश्न कदाचित सुटला असता. काही जाणकारांच्या मते लोंगोवाल अजूनही या मताचे आहेत. या मार्गाने हा प्रश्न कदाचित अजूनही सुटेल. कारण सरदारांना खरेच मनापासून खलिस्तान नको आहे आणि साऱ्या भारतभर शिखांच्याबद्दल आदर आणि प्रेम आहे. त्यामुळे सरदारांना हवे आहे ते सारे द्यावयास अगदी हरियाणासुद्धा खळखळ करणार नाही. फक्त शिखांची मागणी ही उद्या खलिस्तानकडे घेऊन जाणारी गोष्ट (Precursor of khalisthan) ठरणार नाही याची इतरांना खात्री पटली पाहिजे; पण त्या वेळी हे झाले नाही याला एक साधे कारण होते. कोणत्याच राजकीय पुढाऱ्याला हे नको होते. शरू रांगणेकरांनी राजकारणी पुरुष आणि नोकरशाही यांच्या संदर्भात होळकरांची एक गोष्ट सांगितली आहे. पानिपतच्या लढाईत पेशव्यांना मदत करण्यासाठी होळकरांच्या फौजा जात असताना युद्धावर निघालेल्या आपल्या मुलाला वृद्ध मल्हाररावांनी सांगितले होते– कोणत्याही परिस्थितीत अबदालीचा कायमचा पराभव होणार नाही याची काळजी घे ! त्याचा पराभव झाला तर पेशव्यांना नंतर आपल्या मदतीची काही जरुरीच उरणार नाही. म्हणजे मग आपले महत्त्व संपलेच की !

पंजाबचा प्रश्न चिघळत असताना गुरुमुखीमधील साऱ्या वृत्तपत्रांनी एक गोष्ट पुन्हा पुन्हा सांगितली होती. बाई शिखांच्या साध्या रास्त मागण्या मान्य करणार नाही. हा प्रश्न चिघळू देईल आणि नंतर निवडणुकीच्या पूर्वी शिखांना चिरडेल. या एका कामगिरीसाठी

त्याना उत्तर हिंदुस्तानातील हिंदूची सारी मते सहजपणे मिळतील. माझ्या सरदार मित्राचे ते म्हणणे मला त्या वेळी पटले नव्हते. आजही केवळ यासाठीच बाईंनी सुवर्णमंदिरात खुले आम कत्तल केली हे त्याचे म्हणणे मला पटत नाही; पण आम्ही हे आधीच सांगितले होते असे सारे सरदार आज म्हणतात आणि कोणी सांगावे, राजकारणी लोक ही आपणाला न समजणारी गोष्ट आहे. ते केवळ प्रेताच्या टाळूवरचे लोणीच चाटत नसतील तर हे असे लोणी चाटावयास मिळावे म्हणून जित्या माणसाना प्रथम प्रेत पण बनवत असतील !

□

पण राजकीय पुढारी हे या देशातील खरे खलनायक नव्हेत. एक तर बाई सोडून साऱ्या राजकीय पुढाऱ्यांचे एकूण कर्तृत्व फारच तोटके आहे या देशात खरी जबरदस्त आहे ती नोकरशाही बी. बी. सी. वरील 'येस मिनिस्टर' वाल्यानी याच्या पायाशी बसून याच्या पायाचे तीर्थ घेत यांच्याकडून श्रीगणेशा घ्यावा असे याचे कर्तृत्व आहे हे लोक सारे काही करतात. हे लोक आकडे बदलतात वा आकड्यांच्या जादू करतात. कायदेकानू बनविताना त्यात मुद्दाम पुढे उपयोगी येतील अशा पळवाटा ठेवतात. हवे जेव्हा सहजपणे खोटे बोलतात. महत्त्वाचे म्हणजे माजराने उदराशी खेळावे तसं भोवतालच्या लोकाशी खेळतात आपला विश्वासही बसणार नाही, अशा गोष्टी हे लोक अगदी सहजपणे करतात.

खरे पाहता भाषा आणि शेती हे या देशातील दोन महत्त्वाचे प्रश्न आहेत स्वातंत्र्यानतरचे या देशातील बहुतेक सारे प्रश्न प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे या दोन केंद्राच्या भोवती फिरत राहिलेत, पण या दोन गोष्टीशीसुद्धा हे लोक कारण नसताना हवे तसे खेळतात. तुम्हाला पटणार नाहीत अशी दोन उदाहरणे देतो गेल्या वर्षी नेहरू-जयतीच्या वेळी प्रियदर्शनीच्या मनात एक चागला विचार आला. असामी, मराठी, तामीळ अशा सहा भारतीय भाषातील सहा चागल्या कविता निवडण्यात आल्या. दिल्लीच्या शाळेतील दहा हजार मुलांकडून त्या छानपणे बसवून घेण्यात आल्या. नेहरू स्टेडियमवर दहा हजार मुलांचे छान समूहगान झाले. सारा कार्यक्रम इतका छान होता की चिनी आक्रमणाच्या वेळी पु ल. देशपांडेंनी बसवलेल्या 'युद्ध आमचे सुरू' या समूहगानाची आठवण होत होती विश्वास बसणार नाही इतक्या सहजपणे मुले मराठी भाषेतील कविता म्हणत होती मराठीतील कविता होती सानेगुरुजींची 'आता उठवू सारे रान' ही कविता येथवर सारे छानच होते; पण या कार्यक्रमाच्या वेळी एक सुदर रंगीत पुस्तक सर्वांना मोफत वाटले पुस्तकाचे नाव होते 'आओ मिलकर गए' पुस्तकाची छपाई, माडणी सारे अप्रतिम होते. सुदर चित्रे काढून निरनिराळ्या भाषातील त्या दिवशी म्हटलेल्या कविता तेथे दिलेल्या होत्या आणि त्या कवितांच्या शेजारीच त्या कवितांचा गद्यात हिंदीमध्ये अनुवाद दिला होता. – आता सानेगुरुजींच्या कवितेचा अनुवाद काय दिला होता सांगू तुम्हाला

आता उठवू सारे रान
आता पेटवू सारे रान

या ओळींचा हिंदीत अर्थ दिला होता–

आओ हम वनसंपदा को जगाये !

मला माणसांना भेटायला आवडते म्हणून पत्ता शोधीत मी या भाषांतर करणाऱ्या महापुरुषाला जाऊन भेटलो. तो म्हणाला, 'अहो, सानेगुरुजी माझे आवडते कवी आहेत. त्यांचे नाव भारतभर माहीत व्हावे म्हणून मी त्यांची ही कविता निवडली, पण या कवितेचा सरळ खरा अनुवाद सांगितला असता तर ही कविता नाकारली गेली असती. अहो, माझ्या आवडत्या कवीचे नाव भारतभर माहीत व्हावे म्हणून मला हे करावे लागले !' मी मनात म्हटले, भल्या माणसा, आज गुरुजी जिवत नाहीत हे तुझे सर्वांत मोठे भाग्य आहे. पढरपूरच्या बडव्याना आपण नमवले; पण त्या बडव्यांची अधिक ताकदवान जमात आज दिल्लीत जाऊन स्थायिक झाली आहे हे समजल्यावर त्यानी पुन्हा एकदा विठोबाला मुक्त करण्यासाठी आमरण उपोषण केले असते. गुरुजींचे विसर. आचार्य अत्रे जरी जिवत असते ना तरी 'ज्ञानेश्वराचा रेडा' किंवा अशा काही मथळ्याखाली तुझ्यावर अग्रलेख आला असता; पण तुम्ही सारेजण आज सुखात आहात कारण हे लोक आज भोवताली नाहीत. तुमच्या समोरच्या माणसाची कळ कोणाच्या ताब्यात आहे हे तुम्ही पुरते ओळखता तुम्हाला त्रास देऊ शकणारे आम्ही सारे जण कुठल्या तरी कुबेराच्या घरी इमानेइतबारे पाणी भरतो ! अरुण शोरीला मागे माझ्या एका मित्राने विचारले होते, गोएंका आणि बिर्ला यांच्या आर्थिक भानगडीचा पुरावा माझ्याकडे आहे तुम्ही तो छापून त्यावर अग्रलेख लिहाल का ?

हे राहू देत. शेतीचा प्रश्न घ्या. हे लोक वाटेल ती आकडेवारी देतात. पाहिजे ती गोष्ट सिद्ध करतात आपल्या शेतीमत्रालयाने जूनमध्ये एक अभिमानास्पद बातमी सांगितली. गव्हाच्या प्रतीहेक्टर उत्पादनात पंजाबचा क्रमांक जगात दुसरा आहे. पजाब प्रतीहेक्टर तीन हजार किलो गहू पिकवतो. फ्रान्सचा क्रमांक पहिला आहे. फ्रान्स प्रतीहेक्टर ४७९३ किलो गहू पिकवतो. भारतातील साऱ्या वृत्तपत्रानी ही बातमी अभिमानाने छापली. जगातील बहुतेक सर्व कृषीसशोधनकेंद्रांना भेट देऊन आलेला माझा मित्र सकरम ही बातमी ऐकून भलताच सतापला ही बातमी म्हणजे एक अस्सल खोटे विधान होते. त्याने नतर त्याच्या मताच्या पुष्टीसाठी जगभर मानले जाणारे 'प्रॉडक्शन इयर बुक' हे एफ. ए. ओ. रोम याचे पुस्तक दाखवले. त्यात दिलेल्या आकडेवारीप्रमाणे फ्रान्स प्रतीहेक्टर गव्हाच्या उत्पादनात पजाबचा क्रमांक जगात बारावा आहे. फ्रान्सचा पाचवा आहे. जगभर मानल्या जाणाऱ्या या आकडेवारीप्रमाणे निरनिराळ्या देशात किलोमध्ये प्रतीहेक्टर होणारे गव्हाचे उत्पन्न खालीलप्रमाणे आहे–

(१) नेदरलँड–५७३०, (२) ब्रिटन–५६७७, (३) बेल्जिअम–५२६८, (४) जर्मनी–५०९६, (५) फ्रान्स– ४७९३, (६) बल्गेरिआ–४४२९, (७) झेकोस्लोव्हेकिआ–३९११, (८) ऑस्ट्रिया–३७३७, (९) अमेरिका–३७०४, (१०) युगोस्लाव्हाकिया–३०८१, (११) जपान– ३०६०, (१२) पजाब ( भारतातील एक प्रात )–३००७, असो ! या यादीत चीनचा नबर सोळावा आणि भारताचा सतरावा येतो. ही माहिती बरोबर घेऊन माझ्या या मित्राने कृषीमत्रालयात चकरा मारल्या त्याला हवा तो अधिकारी कधी भेटलाच नाही ! त्याने भारतातील प्रमुख वृत्तपत्रांना पत्रे पाठवली. माझ्या माहितीप्रमाणे कोणीच ते अजून छापलेले नाही !

असो. हे विषयांतर नव्हे. केवळ मजा म्हणूनही आपण ही माहिती पाहिली नाही. या देशातील नोकरशाहीला, तुम्हाला व मला हा आपला देश अजिबात समजलेला नाही; पण या देशातील आजच्या घडीचे सारे प्रश्न आपण निर्माण केलेले आहेत. हे प्रश्न मुख्यत्वेकरून खेड्यापाड्यातील लोकांचे प्रश्न आहेत अगतिक होऊन हे लोक कधी काठावर येतात किंवा त्यांना कोणी काठावर आणले म्हणजे मग आपण जागे होतो. अशा वेळी या लोकांच्यात जाऊन भटकल्याने सारे काही समजतेच असे नव्हे; पण थोडेफार समजण्याची शक्यता असते. पंजाबमधून भटकताना मी आकडेवारी बरोबर ठेवली नव्हती असे नव्हे; पण केवळ आकडेवारीच वापरली तर सत्य सोडून इतर सारे काही समजते व इतर सारे काही सिद्ध करता येते याचे पण भान ठेवले होते !

खेड्यापाड्यातील सारे शीख चिडलेले, दुखावलेले, संतापलेले आहेत हे तर खरेच, पण त्यांचे प्रश्न साधे आणि सोपे आहेत त्यांच्या अडचणी खऱ्या आहेत त्यांचे रागावणे खरे आहे. पंजाबचा प्रश्न हा तसा भाषेच्या प्रश्नातून निर्माण होतो आणि शेतीमालाच्या प्रश्नाजवळ किंवा शहरे विरुद्ध खेडी या प्रश्नाजवळ जाऊन संपतो. याच रिंगणात तो प्रश्न फिरतो आहे. मग त्याचे आज बाहेर दिसणारे रूप कोणतेही असो या देशातील भाषेचा प्रश्न स्वातंत्र्यानंतर निर्माण झाला किंवा आपण तो निर्माण केला. फाळणीपूर्वी विशाल पंजाबमधील हिंदूंची भाषा पंजाबीच होती. हिंदु शीख फार जवळ होते. एकाच घरात एक भाऊ हिंदू आणि एक शीख ही सर्वसामान्य गोष्ट होती. ज्या हरमंदिरचा आपण अनेक वेळ उल्लेख करतो ते हरमंदर १९२५ सालापर्यंत हरीचे मंदिर होते. हिंदु देवदेवतांच्या मूर्ती आदराने सुवर्णमंदिरात ठेवलेल्या होत्या आणि हा व्यवहार एकतर्फी नव्हता. खेड्यापाड्यात साऱ्या मंदिरांना लागून त्याच आवारात एका खोलीत श्रीगुरुग्रंथसाहेब सन्मानाने ठेवलेला असे. भांडण धर्मांचे नव्हतेच. ते भाषांचे भांडण म्हणून सुरू झाले त्याचे चिघळलेले विपरीत स्वरूप म्हणून आज ते धर्मांच्या जवळ उभे आहे. पंजाबमधील हिंदूंची भाषा पंजाबी होती, आजही आहे. खरे पाहता ज्याची भाषा पंजाबी त्या साऱ्यांना आपण पंजाबी समजतो. पंजाबी ही भाषा हिंदीला फार जवळ आहे म्हणजे काही पंजाबी ही हिंदीची बोलीभाषा होऊ शकत नाही. तशी मराठी पण हिंदीला तेवढीच जवळची आहे. त्यातून दोन्ही भाषांची लिपी देवनागरी आहे. पंजाबी आणि हिंदी म्हणजे काही कोंकणी आणि मराठी नव्हेत पंजाबीला गुरुमुखी ही लिपी आहे किंवा पंजाबीला गुरुमुखी सुद्धा म्हणतात. शिखांचा पवित्र ग्रंथसाहेब या गुरुमुखीत आहे आणि आपण प्रथमच पाहिल्याप्रमाणे हा काही शिखांचा धर्मग्रंथ नाही. पंजाबमधील हिंदूंचा पण हा धर्मग्रंथ होता, आहेही. तुमच्या कोणत्याही पंजाबी हिंदु मित्राला विचारा त्याची आई, वडील, आजोबा कोणी तरी ग्रंथसाहेब हिंदु असूनही आदराने दररोज वाचत असत. त्यांना तो तोंडपाठ येत असे म्हणून तो तुम्हाला सांगेल !

पंजाबमधील हिंदूंनी हिंदी भाषा म्हणून का स्वीकारली हा वादाचा मुद्दा आपण बाजूला ठेऊ. तसे पाहिले तर या राष्ट्रातील बहुसंख्य लोकांची भाषा हिंदी असावी आणि मग या देशाची हिंदी ही एकमेव सरकारी भाषा करणे सोपे जावे या हिंदी अतिरेकवाद्यांच्या कारवाईमुळे राजस्थानने पण हाडौती वा स्वतःच्या इतर भाषा बाजूला सारून हिंदी स्वीकारली. खरे पाहता आपण सारेच जण थोर लोक आहोत. फाळणीपूर्वी पंजाबची भाषा उर्दू होती. कोर्टाचे कामकाज उर्दूत चाले. शेतीचे कागदपत्र उर्दूत होते शाळेतील माध्यम उर्दू होते. हिंदू शिखांनी हे बिनतक्रार स्वीकारले होते. पंजाबचे विसरा, हैद्राबादच्या निजामाची भाषा उर्दू होती. इंजिनिअरिंग आणि वैद्यकीय महाविद्यालयातून उत्तरपत्रिका उर्दूत लिहाव्या लागत या भाषेतून शिकून प्रख्यात, प्रसिद्ध, एम. बी. बी. एस हैद्राबादेत तयार झाले ! तेलगूमधून विज्ञान शिकविता येईल की नाही हा वाद हैद्राबादमधील शिक्षणतज्ज्ञांनी स्वातंत्र्यानंतर सुरू केला !

पंजाबी हिंदूंनी पंजाबीऐवजी हिंदी ही आपली मातृभाषा म्हणून स्वीकारली आणि खेड्यापाड्यातील शिखांना मनापासून वाईट वाटले. गुरुमुखी त्यांना वाचता आणि बोलता येत होती. गुरुमुखीऐवजी हिंदी आल्याने त्यांची व्यवहारात अडचण होणार होती. त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे आपला धर्मग्रंथ यात आहे म्हणून हिंदूंनी ही भाषा नाकारली असे त्यांना वाटले. किमान हितसंबंधी मतलबी लोक सहजपणे तसा विचार करू शकले. या देशातील हिंदु तुला, तुझ्या भाषेला, तुझ्या या धर्मग्रंथाला अजिबात किंमत देत नाहीत. हे त्यांना पटविण्याचा प्रयत्न झाला. ' हिंदी, हिंदु, हिंदुस्थान ' ही घोषणा त्याच वेळी प्रथम खेड्यात पसरली. आजही ती सहजपणे ऐकू येते

पण आज तर पंजाबची भाषा गुरुमुखी आहे. मग हा प्रश्न पुन्हा कसा निर्माण होतो ? अधिकतर शीख खेड्यात राहतात. हिंदू शहरात राहतात. त्यामुळे शहरे विरुद्ध खेडी या वादाला पंजाबात हिंदु विरुद्ध शीख हे स्वरूप अनेक प्रकारे येते शहरात राहणारे हिंदु आपल्या मुलांना हिंदी वा इंग्रजीत शिकवतात गुरुमुखीमधे नाही ही शीख किसानाची तक्रार आहे. मी त्यांना म्हटले हे पंजाबमध्ये नव्हे तर साऱ्या भारतभर घडतय माझ्या महाराष्ट्रात पण शहरातील मराठी मुले इंग्रजीत शिकून कृतार्थ होताहेत. हा इंडिया विरुद्ध भारत असा प्रश्न आहे. फक्त एक भाषा बऱ्यापैकी येते म्हणून या देशावर कायमचे राज्य करता येईल हे इंडियावाल्यांनी ओळखलय. हिंदी आणि इंग्रजी या दोन भाषा सोडून इतर साऱ्या भाषा काही दिवसांनी दस्यूंच्या भाषा म्हणून बाकी उरणार आहेत ! चलाख, हुशार हिंदु मुले आपणाला चिडवतात ही छोट्या शीख मुलांची दुसरी तक्रार आहे ' सरदारजीने बारा बजे हन ' हे तर तसे साऱ्या भारतभरच चालते. ही मुले केसांची छोटी जुडी डोक्यावर बांधतात तेव्हा ' सिरते गंडा रख्या होया है।' म्हणून त्यांची चेष्टा होते. गंडा म्हणजे कांदा. ' सरदारना बच्चा ते गधेदा बच्चा छोटा अच्छा लगदा है। असेही म्हटले जाते. या अशा पंजाबमध्ये व तसे भारतभर होणाऱ्या चेष्टेमुळे लहान मुलांना आता केस वाढवू नयेत, आपण सरदार दिसू नये असे वाटते असे मोठ्या माणसांचे मत आहे. मी

म्हटले ही चेष्टा फक्त सरदाराचीच होते असे नव्हे. साऱ्या भारतभर अल्पसख्याकाची अशीच चेष्टा होते. शाळेत बामणाचा पोर भटुरडा, महारडा, पाटलाचा पोर, आनीपानीवाला असे शब्द त्या वेळी त्या ठिकाणी अल्पसख्याक असलेल्या मुलाना महाराष्ट्रातही ऐकावे लागतात– किमान आमच्या वेळी ऐकावे लागत शहरातील शाळेत हे कदाचित कमी होत असेल; पण शहरातील शाळेतून खेड्यामधील मुलाची चेष्टा होते, त्याना 'गाववाला' समजले जाते. त्यातून खेड्यात राहणाऱ्या माणसाच्या मनात कळत-नकळत काही प्रमाणात बुजरेपणा, न्यूनगंड आलेला असतो. त्यातून तो इतर काही कारणानी चिडलेला, वैतागलेला, कातावलेला असला की या वरवर पाहताना साध्या वाटणाऱ्या गोष्टीही त्याला टोचत राहतात कधी कधी भडका करून उठतात.

पण शिखाचा प्रश्न हा मुख्यत्वेकरून शेतीचा प्रश्न आहे. पाण्याचा प्रश्न आहे. त्याना लागणाऱ्या विजेचा प्रश्न आहे. शेतीमालांना मिळणाऱ्या कमी किमतीचा प्रश्न आहे. चागली यशस्वी शेती केल्यावर शहरे आणि खेडी याना मिळणारी असमान वागणूक त्याना अस्वस्थ करते शहरातील माणूस कमी कष्टात अधिक आरामात राहतो हे त्याना दरक्षणी जाणवते त्यातून त्याच्या ज्या मागण्या आहेत त्यात शहरातील माणसाना म्हणजे पर्यायाने हिंदूना फारसा रस नसल्याने पजाबमधील आणि भारतातील सारे हिंदु त्याच्या पिळवणुकीत सामील आहेत असे त्याना वाटते. या देशाच्या झालेल्या असमतोल विकासात फारच थोडे मोठे सरकारी उद्योगधदे पंजाबच्या वाटणीला आल्याने हिंदूचे राष्ट्र पजाबच्या म्हणजे शिखाच्या विरुद्ध आहे असे त्याना वाटते. साऱ्या राज्यात अमृतसर ( ५ लाख ) लुधियाना ( ६ लाख ) जालदर ( ४ लाख ) व बटाला भटिंडा सुमारे एक लाख यापेक्षा मोठी शहरे नसल्याने चदिगड आपल्याला पूर्णपणे मिळणार नाही म्हटल्यावर तो अस्वस्थ होतो. हरियानाला मोठे शहर नसेल, पण दिल्ली त्याना लागून आहे वा त्याच्यासाठी दुसरे शहर का उभारत नाही असा युक्तिवाद त्याना सहजपणे सुचतो.

–छोट्या उद्योगधद्यानी गजबजलेल्या जालदर, लुधियाना, फगवाडा, गोराया, बटाला, मडी, गोविंदगड या शहरातून व त्याना लागून असलेल्या खेड्यातून हिंडताना वीज आणि पाणी याचा प्रश्न काय आहे हे थोडेफार समजते– पजाबला पाणी कमी मिळते असा खेड्यात सार्वत्रिक समज आहे मी त्याना म्हटले, आकडेवारी तर असे सागत नाही. या देशातील काही प्रातामधील जमीन, शेतीखालील जमीन व बागाईत जमीन यांची आकडेवारी अशी आहे

( आकडे ००० हेक्टरमध्ये )


| विभाग | एकूण जमीन | लागवडीखालील जमीन | बागायती जमीन | बागायत जमिनीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| पजाब | ५,०३३ | ४,१७१ | ३,२८६ | ७८·८% |
| महाराष्ट्र | ३०,७५८ | १८,२४५ | २,३०६ | १०·७% |
| उत्तरप्रदेश | १२,९९९ | ६,२९५ | ३,७७२ | ४५·१% |
| भारत | ३,०४,८९५ | १,४२,६०६ | ४५,९१० | २५·८% |

पण याचा अर्थ पंजाबला जास्ती पाणी सरकार देते हे या लोकाना मान्य होते असे नव्हे· पजाबच्या ३·२८६ दशलक्ष हेक्टर जमिनीपैकी जवळजवळ २·० दशलक्ष हेक्टर जमिन ट्यूबवेलनी ओली केली जाते. म्हणजे हे पाणी सरकारच्या नव्हे तर छोट्या छोट्या शेतकऱ्यानी घेतलेल्या धाडसी पावलामुळे, दाखवलेल्या कल्पकतेमुळे मिळते आहे; पण या ट्यूबवेल्स खणून आपण चूक केली आहे असे उन्हाळ्यात शेतकऱ्याना वाटते. यापैकी जवळजवळ पन्नास टक्के विहिरी डिझेलवर चालतात. डिझेल काळ्या बाजारातच विकत घ्यावे लागते. भारतात सर्वत्रच विजेचा तुटवडा आहे; पण पजाबमधून उन्हाळ्यात हिंडताना विजेचा तुटवडा, चुकीच्या वेळी होणारा पुरवठा, माणसाला कसा संताप आणत असेल ते मला समजले. उत्तरेत आणि पजाबात आपण महाराष्ट्रात कल्पना करू शकणार नाही असा उन्हाळा असतो. अक्षरश भट्टी पेटलेली असते धुळीची वादळे उठतात आणि घरात वीज आणून वीज गेलेली असते. दिवसातून ४–५ तासाहून अधिक वीज कोणत्याच विभागात देता येत नाही दिल्लीत, भारतातील मोठ्या शहरात वीज एवढी कमी देत नाहीत· प्रत्येक शेतकरी मी दिल्लीकर बाबू आहे म्हटल्यावर संतापून विचारायचा–

'दिल्ली दे बाबूनु आराम देणा जरुरी है जाँ
पजाबदे किसाननु रोटी ? जो सारे देषणु खवौंदा है ?'

–आम्ही साऱ्या भारताला अन्न पुरवतो. आम्हाला शेतीसाठी वीज हवी ती मिळत नाही. दिल्लीतील शीतघरे मात्र छानपणे चालू आहेत साहेब ! हे त्याचे म्हणणे असते. या विजेमुळे पुन्हा एकदा पंजाबातील शहरे आणि खेडी यातील तणाव पण वाढतो. एखाद्या विभागातील विजेचा पुरवठा दिवसातून आठ तास असेल तर शहराना ही वीज दिवसा मिळते. खेड्यांना ती नेहमी रात्री मिळते. मी बटाल्याला होतो. गाव लेथ, फौन्ड्री मटेरिअल, शेपर, कृषीअवजारे बनवणाऱ्या छोट्या छोट्या कारखान्यानी गजबजलेला आहे. या छोट्या कारखान्याचे मालक बहुताशी हिंदू आहेत. बटाला विभागाला दिवसातून नऊ तास वीज मिळणार होती, पण बटाला शहरात ती दिवसा मिळणार होती खेड्यातून वीज रात्री मिळणार होती. शेतकरी त्यामुळे सतापले होते खेड्यात वीज दिवसा द्यावयास हवी त्याचे म्हणणे होते. कारण शेतावर रात्री काम करणे त्रासाचे असते. पाणी देताना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी अधारातून जावे लागते. शेतात अडथळे असतात. साप, विंचू असतात. शहराना रात्री वीज दिली तर कारागिराना रात्री किंवा दिवसा कारखान्यात काम करून काही फारसा फरक पडत नाही असे त्याचे म्हणणे होते. मलाही ते तसे रास्त वाटले; पण मी बरोबरच्या शहरी सरदार मित्राना म्हटले यात पुन्हा शहरे आणि खेडी हाच वाद आहे त्यातून पजाबला वीज कमी मिळते असे मला वाटत नाही. आपल्या देशातील प्रमुख विभागाना मिळणारी वीज खालीलप्रमाणे आहे,

| विभाग | मिळणारी वीज (दशलक्ष किलो वॅटमध्ये) |
|---|---|
| पंजाब | ५७७६ |
| उत्तरप्रदेश | ११,७८१ |
| महाराष्ट्र | १८,२४३ |
| भारत | ६७,४०६ |



म्हणज एकूण भारतात सुमारे ६७००० दशलक्ष किलोवॅट वीज उपलब्ध आहे. भारताचा एकूण आकार ३२ लाख वर्ग किलोमीटर्स आहे. लोकसंख्या सत्तर कोटी आहे. पंजाबला ५७०० दशलक्ष किलो वॅट वीज मिळते. पंजाबचे क्षेत्रफळ ५० हजार किलोमीटर्स वर्ग आहे. लोकसंख्या एक कोटी सत्तर लाख आहे. म्हणजे पंजाबचे क्षेत्रफळ भारताच्या फक्त दीड टक्का येवढे येते. पंजाबची एकूण लोकसंख्या भारताच्या लोकसंख्येच्या फक्त सुमारे अडीच टक्का येवढी होते. मात्र भारतात निर्माण होणाऱ्या विजेपैकी साडेआठ टक्के वीज पंजाबला मिळते आहे; पण तसे पाहिले तर महाराष्ट्राला पण खूप जास्त वीज मिळते आहे. त्यातून महाराष्ट्राला नव्हे तर मुंबईला जास्त वीज मिळते. मुंबईत कारखाने आहेत म्हणून मुंबईला वीज द्यावी लागते; पण मुंबईत कारखाने फार आहेत म्हणून मुंबईला आपण जास्त वीज देतो मग पंजाब फार चांगली शेती करतो वा खूप अन्नधान्य पिकवतो म्हणून पंजाबला जास्त पाणी आणि वीज द्यावयास नको का? आपल्या देशात होणाऱ्या शेतीउत्पादनातील आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| (आकडे हजार टनात) | | | |
|---|---|---|---|
| विभाग | कडधान्ये | गळिताची धान्ये | अन्नधान्य |
| | (Cereals) | (Pulses) | |
| पंजाब | ११,७७२ | २४५ | ११,९६६ |
| महाराष्ट्र | ८,९०० | ८३१ | ९,७३१ |
| उत्तरप्रदेश | २२,०३० | २,४९१ | २४,५२१ |
| सारा भारत | ११८,७०२ | ११,१६५ | १२९,८६७ |

म्हणजे नुसते अन्नधान्य घेतले तर सुमारे नऊ-साडेनऊ टक्के अन्नधान्य पंजाब निर्माण करतो. त्यातून पुन्हा प्रश्न निर्माण होतात. पंजाब जास्ती अन्नधान्य निर्माण करतो म्हणजे पंजाबला प्रथमच पाणी आणि वीज जास्त मिळत असणार! किमानपक्षी बिहार, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश येथील अर्धनग्न, अर्धपोटी, भूमिहीन शेतमजूर पंजाबला काम करावयास मिळतात. द्याल ते वेतन घेणारे, सांगाल ते काम विनबोभाटपणे करणारे, दिवसरात्र खपणारे, थ्रेशरमध्ये आपल्या हातांचे पंजे सहजपणे चिरडून घेणारे हे मजूर पंजाबच्या शेतकऱ्यांना सुख मिळवून देताहेत. म्हणजे शेतीमालाचे, शेतकऱ्यांचे, खेड्यांचे प्रश्न हेही काही खरे प्रश्न नव्हेत. या गोष्टी पुढे करतो तेव्हा आपण आणखी थोडे खोलात उतरतो; पण प्रश्नाच्या मूळ गाभ्याला अजिबात हात लावत नाही. भूमिहीन शेतमजूर, असंघटित कामगार, ठेकेदारांकडे बांधकामावर काम करणारे मजूर यांचे प्रश्न हे या देशातील कदाचित खरे प्रश्न असतील. या लोकांच्या जवळ जाऊन, त्यांना एकत्रित करून बाहेर काढणारा एखादा गांधी वा माओ ज्या वेळी निर्माण होईल त्या वेळी या देशात काय होईल याचा नुसता विचार केला तरी आपली झोप उडते. हे उद्या घडेल. कदाचित दहा वर्षांनी घडेल; पण हे ज्या वेळी घडेल त्या वेळी इंडियावाले आणि भारतवाले या दोघांना एकत्र बसून त्यांच्याशी लढण्याची व्यूहरचना करावी लागेल आणि तरीही या युद्धात इंडियावाले आणि भारतवाले सहजपणे या हिंदुस्तानवाल्या लोकांकडून पराभूत होतील. कारण हेच हिंदुस्तानवाले खऱ्या अर्थाने मार्क्सला अभिप्रेत असलेले कामगार आहेत. माओला अभिप्रेत असलेले शेतकरी आहेत. गांधीजींना याच हिंदुस्तानवाल्यातील एका बाईला राष्ट्रपती झालेले पहावयाचे होते. हे हिंदुस्तानवाले एकत्र येऊन युद्धाला बाहेर पडतील त्याच क्षणी त्यांचा विजय निश्चित आहे!

मी पंजाबमधून हिंडताना माझ्या सरदार मित्रांशी व भेटलेल्या शेतकऱ्यांशी असे वाद केले नाहीत असे नव्हे; पण हे सारे वाद पंजाबच्या संदर्भात या घडीला वांझोटे आहेत हे क्षणभरही विसरलो नाही. त्यातून हे वाद मारुतीच्या शेपटाप्रमाणे पाहिजे तेवढे वाढविता येतात. पंजाबमधून जे बाहेरचे शेतमजूर येतात ते मोठ्या शेतकऱ्यांना लागतात. हे शेतकरी हिंदू आहेत. शहरात आपले दुकान वा कारखाना सांभाळून खेड्यात आपली शेती करणाऱ्या शहरी शेतकऱ्यांना हे शेतमजूर लागतात. हे शहरी शेतकरी पण हिंदूच आहेत. खेड्यांत राहून एकत्र कुटुंबपद्धतीला आपली शेती करणाऱ्या छोट्या शेतकऱ्यांना किंवा शीख शेतकऱ्यांना हे शेतमजूर नको असतात.

सारी ' आकडेवारी, सारे वादविवाद बाजूला ठेवून पंजाबमधील खेड्यामधून हिंडताना जाणवत होते ते एवढेच की हा सरदार शेतकरी दिलदार आहे. तो खूप कष्टाळू आणि मेहनती आहे. त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे तो खूप कल्पक आहे. तो यंत्रांना वा विज्ञानाला घाबरत नाही. तो त्यांच्याशी खेळतो. यंत्र मोडणे, तोडणे, पाहिजे तसे वाकवणे हे तो कॅनडा वा जर्मनीमधील शेतकऱ्याप्रमाणे सहज करतो. मागे गोंडघामधून हिंडताना बैलजोडीवर चालणारी टयूबवेल मी पाहिली होती; पण ही गोष्ट आपण वीस वर्षांपूर्वीच करत होतो म्हणून मला सरदार शेतकऱ्याने सहजपणे सांगितले आज ते खूप पुढे गेलेत. वीज गेली तर ट्रॅक्टरवर तो शेतकरी टयूबवेल चालवतो. म्हणजे तो डिझेलपासून वीज तयार करत नाही तर त्यातून निर्माण झालेली यांत्रिकशक्ती पाणी उपसावयास वापरतो. यासाठी ट्रॅक्टरच्या मागे एक जादा चाक लावलेले असते. ट्रॅक्टर चालू करून तो एका जागी उभा करण्यात येतो. हे मागचे एक चाक फक्त फिरत राहते. ते चाक पुलीने टयूबवेलला जोडले जाते टयूबवेलला लावलेल्या नळाचा इंचात असलेला व्यास आणि ट्रॅक्टरची अश्वशक्ती याचे आपपसातील गणित त्याला आता अवगत आहे. याच ट्रॅक्टरच्या चाकावर थ्रेशर पण चालवले जातात. टयूबवेलमध्ये आत जाणारा लांब नळ लोखंडाचा असावा की बाबूंचा असल्या वादातून तो केव्हाच बाहेर पडलाय. स्वस्त पडणारे पी व्ही. सी. प्लॅस्टिकचे नळ त्यासाठी वापरावययास त्याने सुरुवात केली आहे. पंजाबमधील शेतकरी खरोखरच कल्पक आहे; पण पंजाबची कृषिक्रांती हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे.

पंजाबमधून निघण्यापूर्वी मी माझ्या मित्रांना म्हटले, आठ-दहा दिवस. भटकून आणि गप्पा मारून काही समजते असा माझा मुळीच समज नाही. या देशातून अनेकवार अनेक ठिकाणी मन मानेल तसे भटकताना मला पुन्हापुन्हा खिन्न होत फक्त एकच गोष्ट जाणवली आहे. हा देश माझा आहे, पण माझा हा देश मला अजिबात समजलेला नाही. माझ्याच देशाला मी परका आहे. या देशातील प्रश्नच मला समजलेले नाहीत तर उत्तरे कोठून समजणार? पण या क्षणी मला जे प्रामाणिकपणे वाटले आहे ते सांगतो. मी कदाचित पूर्णपणे चुकत असेन याची जाणीव ठेवून सांगतो. ' मंडळी, तुम्ही म्हणताय ते मला पटलय. तुमचे प्रश्न साधे आणि सरळ आहेत. तुमचा प्रश्न भाषेचा आहे. त्यामुळे दुखावलेल्या भावनांचा आहे, तुम्हाला एखादे अलिशान मोठे शहर राजधानी म्हणून पाहिजे आहे. तुम्हाला वीज आणि पाणी हवे आहे या देशाच्या झालेल्या असमान विकासात पंजाबच्या वाटयाला फारच थोडे मोठे कारखाने आलेत याचे शल्य तुमच्याबरोबर आहे. सुरत ट्रॅक्टर, नानगलचा खतकारखाना असल्या दोन-तीन गोष्टी सोडून मोठे उद्योगधंदे तुमच्या वाटयालाच आलेले नाहीत. त्यातून हे कारखाने पण विश्वास बसणार नाहीत एवढे छोटे आहेत. नानगलच्या कारखान्यात फॉस्फरस देणारी खते अजिबात बनत नाहीत. तेथे बनतात फक्त नत्र देणारी खते. नत्र देण्याची क्षमता विचारात घेतली तर भारतात खाजगी आणि सरकारी विभागात मिळून आपण सत्तेचाळीस लाख तेवीस हजार टन अशी क्षमता असलेली नत्रगटातील खते बनवतो. त्यापैकी नानगलच्या कारखान्याची क्षमता आहे फक्त दीड लाख टन. आपणाला हवे असलेले रासायनिक खतसुद्धा सरकार आपल्या पंजाबात बनवीत नाही याचा राग तुमच्या मनात आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे शहरे आणि खेडी यातील असमानता, शहरांना मिळणाऱ्या सुखसोयी, समृद्ध खेडी निर्माण केल्यावर तुम्हाला अधिक तीव्रतेने जाणवताहेत! शेतीमालाना काहीही भाव मिळत नाही. शेतकऱ्याची प्रचंड पिळवणूक होते आहे हे शेती फार चांगल्याप्रकारे केल्यावर तुम्हाला चांगले समजलय.

तुम्ही मनाने सरळ आहात आणि तुमचा प्रश्न हा या देशातील साध्या-भोळ्या पिळवणूक होणाऱ्या शेतकऱ्याचा प्रश्न आहे त्यामुळेच पंजाबमध्ये आग पेटली असताना मानाचे मुजरे घेत शरद जोशी आणि त्याचे साथीदार पंजाबमधून हिंडलेत शेतकरी आंदोलनाच्या नेत्याच्या मनाविरुद्ध काही करावयाची अकाली दलाचीच काय पण भिंड्रनवालेंचीसुद्धा इच्छा नव्हती किंवा हिंमत नव्हती म्हणा हवे तर– पण सहज गंमत म्हणून सांगतो मंडळी तुम्ही एकूणच ग्रेट आहात. तुमचा मान. अभिमान, स्वतःचा सन्मान या साऱ्या गोष्टी खास पहिलवानीथाटाच्या आहेत मोठे ते फक्त आपणच असे तुम्हाला वाटते. स्वत च स्वत चे केलेले कौतुक तुम्हाला फार आवडते म्हणूनच शरद जोशींना पाहूनसुद्धा तुम्हाला भगतसिंगाच्या मदतीला आलेल्या राजगुरूची आठवण होते! किमान या वेळी तर भगतसिंग मराठी माणसाला मानावे आणि राजगुरूची भूमिका आपण निभावावी असे तुम्हाला वाटत नाही, पण यात मतलब व स्वार्थ नसतो– छोटया मुलाने आपणच चांगले, आपणच मोठे असे समजावे आणि इतरांना सांगावे ना, तसे तुमचे हे साधे निरागस निष्पाप वागणे असते!

मित्रांनो, तुमच्यापैकी कोणालाच खलिस्तान नको आहे. तुम्ही साधेसुधे शेतकरी आणि शिपाईगडी आहात तोंडावर एक आणि पाठीमागे दुसरे बोलणे तुम्हाला जमत असेल असे मला खरेच वाटत नाही तुम्ही माझ्याशी सारी चर्चा रोखठोकपणे केलीत आणि एकानेही खलिस्तान हवे म्हणून मला सांगितले नाही. मी असे काही विचारले तेव्हा तुम्ही मला हसण्यावारी नेलेत – पण तरीही तुम्हाला नकळत तुम्ही खलिस्तानच्या उंबरठयावर उभे आहात असे मला वाटते. कारण तुमच्या मागण्या साध्या, सरळ न्याय्य आहेत आणि केवळ तुम्ही शीख आहात. म्हणून हिंदूच्या देशात त्या कधीच मान्य होणार नाहीत, हे तुम्हाला पटवून देण्यात आलय!

## सात : पहिल्या फाळणीनंतरची कठीण परिस्थिती

वर सांगितलेले सारे जुने संदर्भ आज निरर्थक आणि अर्थहीन आहेत.

– दुसरा पर्यायच नव्हता असे म्हणून आपण केलेल्या कृत्याचे समर्थन करता येते का?

– सुवर्णमंदिरात सैन्य घुसवणे ही या देशातील गांधीवधाइतकीच वाईट आणि भयंकर गोष्ट आहे! या एका कृत्यामुळे हे प्रश्न सोडविण्याचे पहिले समीकरण साफ बदलले आहे कल्पना करता

येणार नाही एवढे नवे प्रश्न समोर उभे राहिले आहेत.

हे प्रश्न समर्थपणे सोडविण्याची प्रतिभा आणि ताकद भारतीय नेते आणि जनता दाखवीत आहेत का ? का बुडत्याचा पाय अधिक खोलात या न्यायाने आपण दुसरेच काही करीत आहोत ?

सुवर्णमंदिराचा प्रचंड विध्वंस करीत आणि फार मोठी किंमत मोजत आपल्या जवानानी सुवर्णमंदिरात प्रवेश केला. आतंकवाद्याचा तात्पुरता तरी बीमोड झाला. शूर आज्ञाधारक जवानानी जे केले त्याबद्दल राष्ट्र त्याचे ऋणी राहील; पण शेवटी आज्ञेनुसार मरणे आणि मारणे हा व्यवसाय ( Profession ) म्हणून त्या जवानानी स्वीकारलेला होता. जवानापेक्षा खूप अधिक किंमत कोवळ्या] शीख तरुणानी मोजली भिंड्रनवाल्याचा दहा वर्षांचा मुलगा बाळराजासारखा मृत्यूला सामोरा गेला ! गोळ्यानी चाळणी झालेला त्याचा देह त्याच्या काकानी ओळखला हातात स्टेनगन घेऊन मृत्यूला सामोरे गेलेल्या वीरांगनांचे देह आत मिळाले मरण पावलेल्या *या शीख तरुण–तरुणीवर प्रथम मानसिक तणाव आणून ते शरण* येतात का हे आपल्या सेनापतीनी प्रथम पाहिले होते. त्याना हा रक्तपात टाळावयाचा होता आणि या मानसिक तणावाखाली हे तरुण येतील याची त्याना प्रथम खात्री होती; पण नतर आपल्याच सेनापतीनी सागितल्याप्रमाणे हे सारे त्यागी आणि समर्पित (Highly dedicated and motivated) तरुण होते.

– सर्वसामान्य माणसानी सुटकेचा निश्वास सोडला आणखी एक घडले आतकवाद्याचा वर सागितल्याप्रमाणे तात्पुरता बीमोड झाला, पण मानसिक तणावाखाली प्रत्येक सरदार आतकवादी बनला. तो फार धार्मिक आहे, सुवर्णमदिराला फार मानतो हा मुद्दा दुय्यम आहे या देशात आपण नगण्य आहोत. बाकीचे लोक आपल्यावर, आपल्या श्रद्धास्थानावर वाटेल तसे आघात करतात असे अगदी अजिबात धार्मिक नसलेल्या खुशवतसिगानासुद्धा वाटले. माझ्या हिंदू मित्राना याच्याशी काय वाद घालावा हेच कळेनासे झाले ते म्हणाले, ' हे कमाल लोक आहेत. बाहेर कत्तल होत होती. नव्या नव्या याद्या बनत होत्या. मृत्युदडाची फर्माने सुवर्णमदिरातून बाहेर पडत होती. त्या वेळी हे लोक शात होते आणि आत झाडून सारे सरदार अगदी खुशवतसिग, स्वर्णसिग मेजर जनरल अरोरानी स्वर्णमदिरात सैन्य घुसवले हे फार वाईट झाले म्हणून खिन्न झाले अहित, सतापले आहेत. या सरदाराचे खरेच आश्चर्य वाटते !

मी माझ्या मित्राना म्हटले माझ्यावरही रागवाल; पण खरे सागू मला आश्चर्य वाटते शिखाना या प्रश्नावर मते विचारण्याच्या आणि त्यानी विरुद्ध मत दिले म्हणून त्याच्यावर चिडण्याच्या आपल्या हिंमतीची. कृष्णा देसाई वा गोदरेज याचा खून झाला त्या वेळी हे कृत्य चुकीचे आहे म्हणून परळच्या कामगारमैदानावर वा विक्रोळीच्या कारखान्यात जाऊन सागण्याची *आपल्यापैकी किती* जणाची हिमत होती ? कृष्णा देसाईंच्या वेळी तर मराठी माणसावर अन्याय होतो आहे आणि त्या अन्यायाला उत्तर देण्याचा हा एवढाच मार्ग आहे असे तुमच्यापैकी अनेकाना वाटले होते. त्याचमुळे तर त्या वेळी कृष्णा देसाईंच्या खुनाची जबाबदारी ज्याच्यावर लोक अप्रत्यक्षपणे टाकत होते ते लोक निवडणूक जिंकून आले होते.

आणखी थोडे मागे चला ' हुतात्म्याच्या रक्ताची शपथ तुम्हाला ' म्हणून १०५ हुतात्म्याच्या नावाने समितीने मते मागितली. या हुतात्म्यानी आपल्या रक्ताचा सडा मुबईच्या रस्त्यावर घातला होता. नतर आपण त्याचे हुतात्माचौकात भव्य स्मारक पण उभारले. कोण होते हे तरुण ? –हे तरुण त्यागी, निष्ठावान आणि महाराष्ट्रावर अन्याय होतो म्हणून संतापलेले होते; पण अखेर रस्त्यात कायदा हातात घेतला गेला होता. कोणताही समर्थ प्रशासक गोळीबार करण्याखेरीज आणखी काय करू शकणार होता ? पण हे हुतात्मे नाहीत तर गुड आहेत आणि मरण पावलेल्या आणि जखमी झालेल्या पोलीसअधिकाऱ्यानी खूप शौर्य आणि कर्तव्यनिष्ठा दाखवली आहे. त्यांचा सन्मान करा म्हणून मराठी माणसाला त्या वेळी–वा अगदी आजही–कोणी सागितले ना तर तो धड हातापायानी घरी जाणार नाही. मुरारजीचे प्रशासकीय गुण वगैरे राहू देत. महाराष्ट्राने या नरराक्षसाला अजूनही क्षमा केलेली नाही. *मुरारजीनी त्या वेळी अश्रुधूर सोडावयास पाहिजे होता हे सेवा*निवृत्त पोलीसअधिकाऱ्याचे मत होते सुवर्णमदिराला वेढा घालून त्याची नाकेबदी करून हा प्रश्न सुटला असता असे अनेक युद्धे यशस्वीरीतीने लढलेल्या शीख सेनापतीना वाटते.

या वेळी झालेल्या घावाना हळुवार ममतेने जपावयाची जरुरी आहे असे आपण म्हणत होतो आणि चोळल्याने जखम चिघळते हे लक्षात न घेता मर्मावर झालेला घाव चोळत होतो. हे तुम्ही आणि मी केले त्याहीपेक्षा मोठ्या प्रमाणावर 'हिलिंग-टच' या नारा देणाऱ्या नेत्याच्याकडून घडले आहे.– तुम्हाला सरकारी खर्चाने मोकळ्या अलिशान ' व्ही. डी. ओ कोच ' मधून दिल्ली – अमृतसर प्रवास हवा असेल तर सतासिगच्या सरकारसेवेत सामील होण्यासाठी अमृतसरला चला. आज बाईंनी सतासिगला उभा केलाय. मोहरमचे वाघ किंवा कागदी वाघ तयार करून खरे वाघ सपवता येत नाहीत हे आपणा सर्वांना माहीत असून उभा केलाय. बक्षी गुलाम अहमदला आपण खूप काळ नाचवला. शेरेकाश्मीरना तुरुंगात टाकले त्याची लोकप्रियता कमी झाली नाही, उलट वाढली. आज आपण फरुकला बाजूला करून शहांना आणलय. शहाची गती इराणच्या शहापेक्षा भयकर आहे हे अनेकानी ओळखलय. काश्मिरमधील मुसलमानाचे राहू देत तेथील हिंदू तरुण तडफदार फरुकच्या प्रेमात पडलेत. माझा स्वरूप म्हणून एक श्रीनगरमधील मित्र आहे. तो दिल्लीला माझ्याच हाताखाली नोकरी करतोय. ती नोकरी साभाळून माझ्याच हाताखाली तो आय आय. टी दिल्लीत डॉक्टरेटसाठी प्रबंध सादर करतोय. तो मनापासून हिंदू आहे. म्हणजे आपण हिंदू आहोत हे सागावयास त्याला लाज वाटत नाही, पण फरुकला काढला त्या दिवशी तो त्याचा भाऊ सारेजण कमालीचे अस्वस्थ झाले होते. चिडले होते. तो, त्याचा भाऊ सारेजण फरुकवर मना*पासून प्रेम करतात. आम्ही कॉलेजात असताना शाहीर अमरशेख,* नौशेर भरूचा याच्यावर केले होते तसे ! खरी गोष्ट अशी आहे की, भारत हे सघराज्य आहे. जेव्हा आपल्या भाषेचा, प्राताचा प्रश्न येतो तेव्हा माणूस गदगदतो, अस्वस्थ होतो, व्याकुळ होतो ज्या ज्या क्षणी आपण हे विसरलोय त्या त्या क्षणी प्रश्न निर्माण झालेत --

पण काश्मिरात काय होते आहे हे आपण विसरून जाऊ. एक वेळ,

संचित ठेव योजना :

**काळ चालला**
**पुढे, पुढे . . .**

**म्हणून "उद्या"चा विचार करा**
**अनोख्या ठेव्यात त्याचे रूपांतर करा.**

उद्याचा विचार आजच नको का करायला ?
नंतर पश्चात्ताप करून काय उपयोग !

उद्याचे स्वप्न साकार करण्यासाठी
आमच्या संचित ठेव योजनेचा फायदा घ्या.

आज बँकेत २५,००० रुपये ठेवा व दहा वर्षांनी
त्याचे ७४,००० रुपये बँकेकडून घ्या.

अधिक माहितीसाठी
नजीकच्या शाखेला भेट द्या !

**बँक ऑफ महाराष्ट्र**
(भारत सरकारचा उपक्रम)
मुख्य कचेरी :
"लोकमंगल" १५०१ शिवाजीनगर,
पुणे ४११ ००५

सेवानिवृत्त झालेले शीख जवान, काश्मिरात कायमचे स्थायिक करून हा प्रश्न सोडवावा असा एक अफलातून विचार आपल्या मनात होता आणि आज कायम सैन्यदल तेथे ठेवूनच आपला काश्मिर आपल्या ताब्यात ठेवू शकतो हे आपण मान्य केलय; पण पजाबचा काश्मिर करता येणार नाही आणि असे किती काश्मिर आपण तयार करणार आहोत ? त्यातून बाई या वेळी फक्त कागदी वाघ तयार करत नाहीत. सतासिग हा निहगप्रमुख आहे.– गावच्या पाटलाने वा जमीनदाराने आखाड्यातील पहिलवानाची खोड मोडण्यासाठी गावातील रामोशाना हाताशी धरावे असा हा प्रकार आहे ! निहाग हा प्रकारच एकूण वेगळा आहे त्याचे स्वतःचे कायदेकानून आहेत भोवतालच्या कोणत्याही चौकटीत न बसणारे असे हे जिद्दी लोक आहेत. रेल्वे वा बसमध्ये तिकीट काढून बसणारा निहग अजून कोणाला भेटलेला नाही. त्याला कोणी तिकिट वगैरे विचारले तर 'ये ले टिकस' म्हणून आपला भाला तो त्याच्यासमोर उलटा आपटतो ! त्यातून संतासिगने आता आपली आयुधे बाहेर काढलीत आपण जाट नाही आणि जाटानी पजाबचे वाटोळे केले आहे, म्हणून तो सागतो. पजाबमधील रामगडीया, मजवी, ब्राह्मण, खत्री या साऱ्या शीख जाती जाटाच्या वर्चस्वावर चिडलेल्या आहेत हे तर खरेच; पण या क्षणी याचा छदाम उपयोग होणार नाही महाराष्ट्रातील बहुजनसमाजही ५७ साली उच्चवर्णीयांच्यावर चिडलेला होता, पण सयुक्त महाराष्ट्राचे अत्रे, जोशी, डागे, नरवणे हे पचप्राण ब्राह्मण आहेत असे सागून समिती काही मोडता आली नाही समिती साहेबाना जातीचे प्यादे पुढे करून मोडता आली सयुक्त महाराष्ट्र झाल्यावर म्हणजे लोकाचे प्रश्न लोकाच्या इच्छेप्रमाणे सुटल्यावर !

सतासिग आज जी करतो आहे ती कारसेवा नाही, सरकार सेवा नाही तर भिकार सेवा आहे. तुमचा विश्वास बघणार नाही येवढे थोडे लोक या कारसेवेत सामील होतात त्यातील फारच थोडे सरदार असतात. गल्लीबोळातील पोरेसुद्धा साध्या वेशातील जवान आणि सेनेच्या बाधकामविभागाचे लोकच फक्त यात आहेत म्हणून सागतात. 'सरबत खालसा' त्यामानाने खूपच चागले झाले, –पण यापेक्षा अधिक मोठी आणि अधिक चागली गर्दी, ट्रक्स आणि बसमधून प्रतापगडावर शिवाजीमहाराजाच्या पुतळ्याचे अनावरण नेहरूंच्या हस्ते करण्यासाठी जमवलेली मी पाहिलेली होती ! त्या मानाने सरबत खालसा मामुलीच होते. पण प्रतापगडावरचा मेळावा सेना न बोलावता न ठेवता जमवता आला होता. या क्षणी सर्वात महत्त्वाची गोष्ट अशी आहे की, फक्त सैन्य तेथे असतानाच आपण कारसेवा चालू ठेवू शकतो आणि सरबत खालसा करवू शकतो. आपण पंजाबमधून सैन्य कधी मागे घेऊ हे ज्योतिषीसुद्धा सागू शकणार नाही आणि ज्या क्षणी सेना तेथून मागे घेतली जाईल त्या वेळी तेथे काय होईल हे सागावयास ज्योतिषी नको. सुवर्णमंदिरावर मनापासून प्रेम करणारे खेड्यापाड्यातील सरदार सधी मिळेल त्या क्षणी कारसेवेत उभारलेला भाग आपण उध्वस्त करणार म्हणून सांगतात. सारा सन्नाटा आहे. या वेळी मी भिंड्रनवाल्याचे ७३ वर्षांचे वृद्ध वडील जथेदार जोगीदरसिग याना कोथेगावला भेटलो. आपला मुलगा गेला असे ते समजत नाहीत. स्वत चा दहा वर्षांचा नातू गेला तरी आपल्या डोळ्यातून टिपूस आलेला नाही म्हणून हा शेलारमामा

सागतो. आपल्या मुलाप्रमाणे तो पण प्रश्नाना उत्तरे देत नाही. खरे पाहता प्रश्न विचारण्यासारखे काही नव्हतेही. त्याचे 'दर्शन' घ्याव-यास मी शीख मित्राच्या बरोबर गेलो होतो आणि भिंद्रनवाल्यां-सारखा हा प्रतिप्रश्न विचारत होता '–डमडमसाहेब, दुखनिवारण, मुक्तद्वारसाहेब साऱ्यावर तुम्ही गोळया मारल्यात त्याच्याआत तर भिंद्रनवाले नव्हते ना?' आसाममध्ये एकाही हिंदुमदिरावर हल्ला का केला नाहीत? दरबारसाहेबाच्या आत बंदुकीच्या गोळयाचे निशाण आहेत आणि ते माझ्याच नाही तर प्रत्येक शिखाच्या छातीत झालेय.

– अरे, औरगजेबानेसुद्धा असे अत्याचार केलेले नाहीत. तुम्ही तोकखाना लुटलात! महंमद गझनीनेसुद्धा अशी लूट पचवलेली नव्हती' तशा परिस्थितीही मी क्षणभर थरारलो. तुमचे माझे शत्रू एक होते. त्याग आणि कुरबानी एक आहे शौर्य आणि श्रद्धास्थाने एक आहेत. न तोडता येणाऱ्या इतिहासाच्या आणि परंपरेच्या धाग्यानी आपणाला एकमेकात गुफलय. याही क्षणी तुम्हा महमंद गझनी आणि औरंगझेब यांचीच आठवण होते आहे! आणि आणखी थोडे मागे गेले तर हाच प्रकार पाकिस्तानातही आहे लाल किल्ला आणि जामा मसज्जीद यात त्याचे अजून मन गुतलंय. बगाल आणि पाकिस्तानच्या प्रमुखांना भारतात आल्यावर अजमेरच्या दग्याच्या दर्शनाला जावेसे वाटते. ही त्याची पुण्यभूमी बनलीये.

– आपण सारेच जण काही तर विसरलोय किंवा आपल्याला ते विसरावयास लावलय. एखाद्याने स्वतःच्या जवळचा एक हरवावा आणि उरलेली शून्याची भेंडोळीं बरोबर घेऊन आपण भिकारी आहोत असे समजून अगतिकपणे हिंडावे तसे आपण हिंडत आहोत का?

– दिल्लीकडे परत यावयास निघालो त्या वेळी मनात अशी न समजणाऱ्या विचाराची भेंडोळी उलगडत होतो. – एक वेळ गजबज-णाऱ्या जी. टी. रोडला पंजाबात अजूनही भयाण कळा येते. सध्या-काळ झाली की हा रस्ता अजूनही निरमनुष्य नव्हे तर निरवाहन होतो. मला खूप जवळचे सरदार मित्र आहेत. त्याशिवाय अनेक थरा-तील अनेक सरदाराशी मी पजाबमध्ये बोललो. त्यात प्राध्यापक आहेत, किसान आहेत, जवान आहेत, कारागीर आहेत, डॉक्टर्स आहेत. आपण आज ना उद्या खलिस्तान मिळवणारच म्हणून मला प्रत्येकाने सांगितले. एकही अपवाद न करता सांगितले. खलिस्तान उद्या मिळेल की आणखी शभर वर्षांनी मिळेल हे त्याना माहीत नाही; पण शीख समाजाची प्रत्येक दिवसाची वाटचाल त्या मार्गाने होईल असा त्याना विश्वास आहे. आपणाला या देशात अवमानित केलय असे समजून ते सारे जण भयकर चिडलेले आहेत. सुवर्णमदि-रात विध्वस करीत फौज घुसली त्याच क्षणी खलिस्तान प्रश्न काय-मचा बदललाय. सरदाराची मने आज अकालीच्या बरोबर नाहीत. आतकवाद्याच्या बरोबर नाहीत. ती डॉ. जगजीतसिंग चौहानच्या बरोबर आहेत आणि डॉ. चौहान ही एक शेवटी कळसूत्री बाहुली आहे. – देशाच्या पहिल्या फाळणीपेक्षा व आजची परिस्थिती अनेक अर्थांनी कठीण आहे!

## आठ : देशान्तरवास : याची नोंद आपण घेणार का ?

या देशाची पहिली फाळणी टाळण्याचे दोन प्रमुख प्रयत्न झाले. दुसरा प्रयत्न महात्मा गाधीनी केला. या देशाची फाळणी करण्या-ऐवजी जिनाच्या हातात हा देश सोपवून चालते व्हा म्हणून त्यानी मौंटबॅटनला सांगितले. पहिला प्रयत्न शेवटच्या पेशव्यानी आणि त्याच्या रणशूर सेनापतीनी केला. १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धाची तयारी स्वत: करूनसुद्धा नानासाहेब पेशवे आणि तात्या टोपे मागे राहिले. त्यानी द्वाही वृद्ध बहादूरशहाच्या नावाने दिली. रणरागिणी राणी 'खुल्फखुदाका, मुल्क बादशाहका, अंमल राणी लक्ष्मीबाईका' म्हणून सागत बादशहाची सेनानी म्हणून लढली! १८५७ च्या या महान प्रयत्नाचा शोध घेताना वीर सावरकरांनी आपल्या १८५७ चे स्वातंत्र्ययुद्ध या अमर पुस्तकात म्हटलय–

'हिंदुमुसलमानातील परकेपणा जाऊन त्याच्यामधील जिते-जेतृत्वभाव नामशेष होऊन त्याचे भावाभावाचे नाते ह्या दिवशी जगजाहीर झाले! भारतमातेने 'या उपर तुम्ही सयसमान व सहोदारी आहात व मी तुम्हा दोघांची जन्मदात्री आहे' हा दिव्य मत्र या दिवसात उच्चारला! हिंदुस्थान हा आपला स्वदेश आहे व आपण सारे सख्खे भाऊ आहोत अशी गर्जना करीत हिंदु व मुसल-मानानी समसमानतेने व एकमताने दिल्लीचे तक्तावर स्वराज्याचे उभय स्तंभ व निशाण त्या दिवशी उभारले!'

अगदी मार्क्स एंजल्स याच्या पत्राचा हवाला देऊन सागावयाचे तरी ब्रिटिश फक्त नशिबानेच १८५७ चे युद्ध जिंकले; पण त्यानतर मात्र देशाचा कारभार करताना त्यानी दोन गोष्टी फार हुशारीने आणि सहजपणे केल्या. १८५७ ची स्मृती हा देश कायमचा विसरून जाईल याची काळजी घेतली. दुसरे म्हणजे 'तब तो लडन तक चलेगी तेग हिंदुस्थानकी' ही बहादुरशहाची शापवाणी ते कधीच विसरले नाहीत! ही तलवार लडनपर्यंत कधीच पोचू शकणार नाही. केवळ आपापसातच लढत राहील याची काळजी घेत त्यानी या देशाची फाळणी या देशाच्या सहजपणे गळयात मारली! १८५७ ते १९४७ या नव्वद वर्षांतील प्रत्येक पाऊल याच दिशेने टाकले.

या पहिल्या फाळणीच्या वेळी फक्त दोन नेते मुळापासून हादरून अस्वस्थ झालेले होते एक गाधी, एक सावरकर; पण हे दोघेही त्या अगतिक क्षणी नेमके निकामी होते. एक जनसमुदायापासून तर दुसरा आपल्या अनुयायापासून असे कसे दूर फेकले गेलेले होते. बाकीचे उरलेले नेते आजच्या नेत्यासारखे मामुली नव्हते. अलवते-गलबते नव्हते. खुर्च्यांचा हिशेब माडणारे बनिये तर नव्हतेच नव्हते; पण अगदी सहजपणे फसवले गेले. आंतरराष्ट्रीय राजकारणातील गाठी-निरगाठी मारणारे याच्यापेक्षा भलतेच बेरके निघाले. एक मात्र खरे. हे नेते आपणाला फसविणार नाहीत, हे नेते विकले जाणार नाहीत याची सर्वसामान्य जनतेला खात्री होती. याच्या अनुयायाच्या आणि विरोधकाच्या मनातही हे कोणाचे दलाल आहेत असा विचार चुकूनही आला नाही. आज खरे पाहता सारेच वेगळे आहे. खाजगीत बोल-ताना आपला नेता फसलाच, नव्हे तर विकला जाणार नाही याची

सुद्धा खात्री त्याचे अनुयायीच देऊ शकत नाहीत. त्यांची उंची पाहून ज्याची कीव यावी असे सारे लिलिपुटियन्स आहेत !

आपण बांगलादेश निर्माण केला त्या वेळी पाकिस्तानने खलिस्तान निर्माण करण्याचा निर्णय घेतला हे खरे असेल का ? की ज्या वेळी अफगाणिस्तान रशियाने घेतला त्याच वेळी रशियाच्या शत्रुराष्ट्रांच्या दृष्टीने सिलोन, आसाम, तामिळनाडू, खलिस्तान या आवश्यक गोष्टी बनल्या ? भारत, पाकिस्तान, बांगलादेश, सिलोन, खलिस्तान यांना विचारतो कोण ? बहादुरशहाचे हे शूर वंशज गाड्याबरोबर नळ्याची यात्रा तसे कोणाबरोबर तरी भटकत असतात, नाही तर त्यांच्या इच्छेनुसार आपापसात भांडत तरी राहतात !

समझनेवालेको इशारा काफी है; पण असे अनेक इशारे कनवटीला लावून शिळोप्याच्या गप्पा मारीत आपण सारेच जण हिंडतोय ! खरे सांगावयाचे तर हे आता नुसते इशारे पण नाहीत. येथे तर चक्क डोळे मारले जाताहेत डोळ्यावर कातडे पांघरलेल्यांनी पण अस्वस्थ व्हावे अशा अभद्र शिळा वातावरणात घुमताहेत. डॉ जगजीतसिंग चौहान पाहिजे तसा जगभर भटकू शकतोय. वाटेल ते 'बी.बी सी.'वरून बरळू शकतोय. आशियाडच्या सामन्यात आम्ही दिल्लीत सुव्यवस्था राखू शकतो; पण लॉस एंजल्सच्या ऑलिंपिकमध्ये आमचा राष्ट्रध्वज जळत असताना अमेरिकन पोलीस मजेत नुसते पाहताहेत फार मोठी कार्यक्षम सरकारी यंत्रणा असलेल्या पश्चिम जर्मनीत आतंकवादी सहजपणे मोकळे होताहेत. ब्रिटिश कोलंबियांनी खलिस्तानला –अस्तित्वात नसलेल्या खलिस्तानला–मान्यता दिली आहे; पण दूर कशाला जावयाचे ? आपण डोळसपणे पाहिले तर आपल्या भोवतालीं दिल्लीतसुद्धा हेच घडतंय !

गेल्या आठवड्यातील गोष्ट सांगतो. पुण्याहून थोरल्या वहिनी दिल्लीला आल्या होत्या त्या कॅनडाला कुठल्या तरी परिसंवादाला चालल्या होत्या म्हणून त्यांचा व्हिसा काढावयाचा होता कॅनडाच्या वकिलातीत त्यांचा व्हिसा काढावयास गेलो. माझा माझ्या डोळ्यावर विश्वास बसत नव्हता. शीख जनसमुदायाने तो आसमंत फुलून गेलेला होता. तरुण, वृद्ध, शहरी, गावरान शीख स्त्री-पुरुषांनी तो हॉल भरून गेला होता. त्या हॉलमध्ये खरी २०–२५ लोकांचीच बसण्याची सोय आहे नेहमी त्यापेक्षा अधिक गर्दी तेथे नसतेही. तो हॉल नुसता शीख जनसमुदायाने भरलेला नव्हता. आणखी एक विश्वास बसणार नाही अशी गोष्ट होती. सार्‍या पाट्या गुरुमुखी, इंग्रजी आणि हिंदीत लावलेल्या होत्या. सारे सूचनाफलक तर फक्त गुरुमुखी आणि इंग्रजीत होते. कॅनडाची भाषा इंग्रजी आणि फ्रेंच सगळ्या देशांच्या वकिलातीत पण पाट्या यापूर्वी इंग्रजी आणि त्यांची 'राष्ट्रभाषा यातच लावलेल्या असत. गेल्या वर्षी मी गेलो त्या वेळी कॅनडाच्या वकिलातीत पण असे नव्हते; पण या वेळी एका खिडकीवर पाटी होती प्टमीगग्मल, Immigration, देशांतरवास आणि शीख तरुणांची तेथे झुंबड होती !

माझे पंजाबी हिंदू मित्र घरात आणि आपापसात पंजाबीत, गुरुमुखीत बोलतात; पण हिंदी आपली मातृभाषा आहे म्हणून सांगतात. वीस वर्षांपूर्वी दिल्लीत सत्तेवर असताना जनसंघाने ठराव करूनही दिल्लीत पाट्या आम्ही अजून गुरुमुखीत लावलेल्या नाहीत आणि पूतनामावशीचे प्रेम दाखवीत इतर देश माझ्या सरदाराच्या भावना जपताहेत. या घटनांपासून काही शिकणे तर दूरच; पण याची साधी नोंदसुद्धा कोणत्याही वृत्तपत्राने अजून केलेली नाही. हिंदू आणि हिंदुस्तान सोडून सारे जण शिखांना आज जवळचे वाटताहेत. भावनात्मकदृष्ट्या त्यांचा प्टमीगग्मल– देशांतरवास कधीच पुरा झालाय !

## नऊ : आधीच खूप उशीर झालाय

सुवर्णमंदिरातील सैनिकी कारवाईनंतर बाईंनी मध्यम मार्गीय अकाली नेत्यांना अटक केली. त्या वेळी सर्वांचीच कल्पना थोडी वेगळी होती. या अटकेमुळे या नेत्यांची डागाळलेली प्रतिमा पंजाबात पुन्हा उजळ होणार होती ते फार जरुरीचे होते. तो उद्देश केव्हाच सफल झालाय, आज पंजाबात निवडणुका घेतल्या तर दंगल होईल की नाही हे तुमच्या प्रशासकीय कौशल्यावर अवलंबून राहील; पण या निवडणुका अकाली प्रचंड बहुमतांनी जिंकतील ही एक अगदी उघड गोष्ट आहे; पण फरुक आणि रामाराव यांच्या नावाने गळा काढणारे विरोधी पक्ष याबाबत काहीसुद्धा बोलत नाहीत

किमानपक्षी आज या नेत्यांची सुटका करून त्यांच्याशी खुले मैदान वाटाघाटी झाल्या पाहिजेत सरकारच्या श्वेतपत्रिकेबरोबरच अकाली नेत्यांनाही त्यांची श्वेतपत्रिका त्यांच्या इच्छेप्रमाणे प्रसिद्ध करावयास द्यावयास हवी त्या श्वेतपत्रिकेला भरपूर प्रसिद्धी द्यावयास हवी. त्यानंतर वाटाघाटीत होणाऱ्या सर्व गोष्टी सर्वसामान्य जनतेला कळावयास हव्यात. खलिस्तान वा खलिस्तानचा अग्रदूत (Pricurior) ठरणाऱ्या त्यांच्या मागण्या सोडून बाकी सर्व मागण्या दिलदार मनाने सरदाराच्या पदरात झुकते माप टाकून मान्य केल्या पाहिजेत. त्यांना अमृतसर पवित्र शहर म्हणून मान्य करून पाहिजे आहे. दूरदर्शन आणि आकाशवाणीवरून पवित्र ग्रंथसाहेबाचा पाठ हवा आहे, या मागण्या मान्य करण्यात कोणत्याच अडचणी नसाव्यात. अमेरिकेतही काही शहरात दारू मिळत नाही. हरिद्वारमध्ये हॉटेलात मास-मासळी मिळत नाही. अमृतसरमध्ये तंबाखू व त्याच्या वस्तू विकावयास बंदी घालण्यात काहीच हरकत नाही. त्यांना चंदीगड एकट्याचे म्हणून हवे आहे. ते त्यांना द्यावयास आज हरियानासुद्धा तयार होईल. हरियानाला नवे शहर हवे असेल तर आशियाड करणाऱ्यांना नवे शहर उभारणे मुळीच कठीण नाही खरे पाहता आशियाडच्या वेळीच सारे आशियाड दिल्लीत भरवण्याऐवजी ते हरियानात राईला भरवावे. त्या वेळीच राईला अनेक नव्या इमारती उभारून राईची हरियाणाची राजधानी म्हणून मुहूर्तमेढ करावी आणि चंदीगड पंजाबला द्यावे अशी हरियाणातील काही लोकांनीच मागणी केली होती. पंजाबला अधिक पाणी आणि वीज हवी आहे महाराष्ट्रात कारखाने खूप आहेत म्हणून आपण महाराष्ट्राला प्रचंड वीज पुरवतो. पंजाब शेती चांगली करतो म्हणून त्याला अधिक पाणी आणि वीज देता येईल का हे पहावे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे हा प्रश्न मुळात शहरे विरुद्ध खेडी किंवा शेतीमालाच्या रास्त भावाचा आहे पंजाब केवढाही पेटला तरी शेतकरी आंदोलनाचे नेते हिंदु असूनही मानाने हिंडत होते. पंजाबच्या निमित्ताने शेतीमालाचे रास्त भाव ठरविण्याची हिंमत नेतृत्वाने दाख-

वरी पाहिजे. अकालींना याचे श्रेय देत शेतीमालाचे भाव आपण ठरवले पाहिजेत

पंजाबच्या रास्त मागण्या मान्य करीत शिखांशी सन्माननीय तडजोड करीत त्याचे श्रेय अकालींना दिले पाहिजे. अकाली राज्यावर आल्यावर सैन्य हलवून फक्त समर्थ कार्यक्षम गुप्तहेरयंत्रणा केंद्राने तेथे ठेवली पाहिजे. अतिरेकी छोट्या प्रमाणावर अर्थातच उपद्रव देतील, पण सत्तेवर असलेले अकाली त्यांचा बीमोड करू शकतील वा या अकाली नेत्यांनी बोलावले म्हणून तात्पुरते सैन्य पंजाबात पाठवता येईल. यात काही धोके आहेत; पण ते मर्यादित स्वरूपाचे आहेत. बाईंना या गोष्टी झपाट्याने कराव्या लागतील. आज आतंकवाद्यांचा तात्पुरता बीमोड झाला आहे; पण बसलेल्या मानसिक धक्क्यातून व विस्कळित झालेल्या संघटनेतून सावरावयास त्यांना ४-६ महिन्याहून अधिक काळ लागणार नाही. आज सैन्य असतानाही शाळा जाळणे, रूळ उडवणे, खून करणे, हायजॅकिंग वगैरे सुरू झालेले आहे. एका रात्रीत पंजाबभर पत्रके चिकटवली जातात आणि ती पत्रके काढण्यापूर्वीच पुन्हा पत्रके उगवतात. या पत्रकांतसुद्धा एकसूत्रता आहे. त्यातील अगदी सौम्य पत्रके घेतली तरी त्यातून 'आज प्रत्येक घर सुवर्णमंदिर बनले आहे' आणि 'हर बच्चा भिंद्रनवाले है' म्हणून सांगितलेले असते आणि या सर्वाला सरदारांची सार्वत्रिक सहानुभूती आहे हे सहजपणे लक्षात येते. असलेला सैन्याचा दबाव कायम ठेवला वा वाढवला तरीही त्यांना आटोक्यात ठेवणे सहा महिन्यांनी कठीण नव्हे तर पुन्हा अशक्य होईल! पुन्हा धरणे फुटतील. साऱ्या भारतभर खुनाची नवी फर्माने सुटतील. एका रात्रीत पुन्हा एकाच वेळी अनेक शाळा वा रेल्वेस्टेशन्स जाळली जातील. त्या वेळी बोलणी केली तर त्याचे श्रेय अकालींच्याकडे न जाता अतिरेक्यांकडेच जाईल.

पण या वेळी बाई बोलणी करतील असे अकालीनेत्यांना वाटत नाही. अकाली नसलेल्या माझ्या सरदार मित्रांना पण वाटत नाही. कारण बाईंनी जनमानसात निर्माण केलेली स्वतःची प्रतिमा आहे महिषासुरमर्दिनीची. शत्रूचा संहार करणाऱ्या दुर्गाभवानीची. ती प्रतिमा मुलांना समजावून घेऊन मायेने थोपटणाऱ्या आईची नाही. सुवर्णमंदिरातील कारवाईनंतर महिषासुरमर्दिनीची ही प्रतिमा हिंदी भाषिक विभागात पुन्हा उजळ झालेली आहे. लोकसभेच्या निवडणुकांच्या पूर्वी या प्रतिमेला धक्का लागेल असे बाई काही अजिबात करणार नाहीत आणि बाईंना तरी कशाला दोष द्यावयाचा? सारेच विरोधी पक्ष आज लोकसभेच्या निवडणुकांच्या चिंतेत मग्न आहेत. म्हातारे अजून सेवानिवृत्त झालेले नाहीत आणि स्वयंवरापूर्वीच पंतप्रधानपदाला पाचाली बनवून पाच पांडव तिला भोगू शकतील का याच्या उघड चर्चा सुरू आहेत. दिल्लीत आज पंजाब कोणाच्याच लक्षात नाही. दिल्लीच्या श्वासाश्वासात फक्त सार्वत्रिक निवडणुका भरून उरल्यात.

थोडेफार वाचून, भटकून बोलून काही समजले असे मला अजिबात वाटत नाही हे मी प्रथमच सांगितलंय. समजले असे वाटते ते सारे चुकीचेही असेल; पण आईवडिलांनी मामुली स्वार्थासाठी घटस्फोट घ्यावयाचे नक्की करावे आणि चार अजाण निष्पाप भावाबहिणींना घराच्या चार कोपऱ्यात अस्वस्थ होऊन हताशपणे अगतिकपणे बसावे लागावे तसे आपण बसलोय. केरळ, आसाम, पंजाब, महाराष्ट्र कोठूनही हिंडा. रेल्वेत, बाजारात, रस्त्यात कोठेही, कोणाशीही बोला. ही असहाय्य अस्वस्थता सर्वत्र भरभरून वाहते आहे. या देशाची दुसरी फाळणी कोणालाच नको आहे; पण ती टाळताच येणार नाही असे प्रत्येकाला वाटतय.

— या देशाच्या इतिहासातील एक अगतिक निर्णायक क्षण आपल्या समोर उभा आहे.

— सुरुवात कोणी तरी कोठून तरी करावयासच हवी.

— जे वाटते ते दुसऱ्यांना सांगावयाला, त्यांचे विचार समजून घ्यावयाला, जे काही जमण्यासारखे आहे ते सारे काही करावयाला आपण सुरुवात करावयास हवी.

— मताचा आणि खुर्चीचा हिशेब मांडणारे या देशातील बनिये आणि दलाल काही करणार नाहीत. सुरुवात तुमच्या–माझ्यापासूनच करावयास हवी.

सरदार साऱ्या भारतभर पसरलेत. या क्षणी त्यांच्यावर भेटतील त्या ठिकाणी स्नेहाचा आणि आदराचा वर्षाव करायचाय. भिंद्रनवालेपासून सर्वांबद्दल आदराने बोलून त्यांचा गौरव करायचाय–किमान त्या विषयावर बोलायचे टाळायचे. त्यांचे प्रश्न त्यांच्याच शब्दात त्यांच्याकडून समजावून घेऊन ते बरोबर कसे आहेत हे त्यांनाच पटवून द्यावयाचे आहे काम खूप कठीण आहे; पण आपण हे करावयास हवे. दलितांना समजावून घेणे जेवढे जरुरीचे असते ना तेवढेच किंवा त्याहून अधिक या क्षणी हे जरुरीचे आहे राज ढालेच्या भाषेचे आपण एक वेळ समर्थन केले ना तेवढेच हे महत्त्वाचे आहे.

सुरुवात तशी अनेक ठिकाणी करता येईल. सेवानिवृत्त होऊन जाणाऱ्या हवाईदलप्रमुख दिलबागसिंग यांचे नाव त्रिवेंद्रमच्या एका रस्त्याला देऊन केरळने तर ही सुरुवात केली सुद्धा आहे. आपणही पुण्याला वा इतर शहरात एखाद्या मोठ्या उद्यानाला वा रस्त्याला श्रीगुरु गोविंदसिंग यांचे नाव देऊ शकू. कॅनेडियन वकिलातीत पाट्या गुरुमुखीमध्ये आहेत. खडकीला सरदार जवान आहेत तर आपण गुरुमुखीत काही पाट्या लावू. सत्यनारायणाच्या पूजेप्रमाणेच श्रीगुरुग्रंथसाहेबचे पाठ पण आपण करू शकू. करण्याची इच्छा असलेल्यांना अनेक नवे मार्ग सुचतील.

साताऱ्याहून निघण्यापूर्वी माझ्या आईने मला सांगितले होते 'माझ्या एकत्र नांदत्या कुटुंबाचा अनेकांना हेवा वाटतो. अगदी तुला सुद्धा! मी कोणता वसा घेतला होता, कोणता मंत्र जपला होतास म्हणून तू विचारतोस. तुला सांगू. तुम्ही सारे जण एकत्र आहात कारण प्रत्येक जण स्वतंत्र आहात पायात पाय अडकवून तीन पायांची शर्यत केल्यासारखे धावत नाही. तुम्ही दहाही जण मला फार जपता; पण प्रत्येक वेळी तुम्ही हे करा तुम्ही ते करा म्हणून मी तुम्हाला सांगत नाही. –पण एक सांगते. तुम्ही दहाही जण फार चांगले आहात. मला व एकमेकांना फार जपता. तुमच्यापैकी एखाद्याने जास्ती त्यागसुद्धा घरासाठी केला असेल. जरुरी म्हणून वा त्याची आवड म्हणून! – पण सांगते ते नीट ऐक, तुमच्या दहा जणांपैकी प्रत्येकाच्या डोक्यात एकदा केव्हा तरी भूत स्वार झाले होते, तुम्हा भावाबहिणींचेच काय पण प्रत्येक माणसाच्या डोक्यात ते कधी तरी येते. त्या क्षणी इतर सारे काही विसरून त्याला आपले मानणाऱ्या जवळच्यांनी त्याच्यावर हळुवारपणे प्रेम करीत त्याला फक्त समजून घ्यावयाचे असते. एकत्र मोठे कुटुंब त्याशिवाय कधी टिकत नाही रे!' ☐

पुस्तके

# महात्माजींच्या जीवनकार्याचे सुरेख मूल्यमापन !

महाराष्ट्रात गांधींच्या विचारांबद्दल नुसती अनास्था नव्हे, तर काही अपसमजही आढळून येतात. म्हणून गांधींच्या धार्मिक, राजकीय, सामाजिक व आर्थिक विषयांवरील विचारांचा परामर्श घ्यावा, त्यांच्यामागे जो मूलगामी व सर्वंकष दृष्टिकोन आहे तो लोकांसमोर मांडावा आणि आजच्या परिस्थितीच्या संदर्भात त्यांचे मूल्यमापन करावे ह्या हेतूने नलिनी पंडित यांनी सिद्ध केलेला एक चिकित्सक ग्रंथ, असे 'गांधी' या पुस्तकाचे स्वरूप आहे. प्रबंधलेखनाची शिस्त पाळून आणि शेरेबाजीचा मोह आवरून पण यथायोग्य मतप्रदर्शन करून गांधीजींच्या जीवन-कार्याचा आढावा घेणे, हे येरा गबाळाचे काम नव्हे. विषयाविषयी जिव्हाळा आणि तटस्थवृत्तीचा वस्तुनिष्ठ दृष्टिकोन असल्यामुळे हा ग्रंथ केवळ प्राध्यापकी पी. एच. डी. कलेच्या वळणावर गेला नाही, हे नमूद केलेच पाहिजे !

अंतःसूत्राचा शोध, व्यक्तित्वाची घडण, सत्यनिष्ठा आणि विश्वधर्म, गांधी आणि भारतीय राजकारण, सत्याग्रह-तत्त्वज्ञान आणि कार्यपद्धती, राष्ट्रीय ऐक्य आणि सामाजिक न्याय, विकेंद्रित अर्थव्यवस्था, उपसंहार अशी फक्त आठ प्रकरणे या ग्रंथात आहेत. त्या प्रत्येक शीर्षकाचा गांधी आणि त्यांच्या कार्यकर्तृत्वाशी समन्वय साधून 'गांधी' हे व्यक्तिमत्त्व वाचकापुढे साकारत जावे, अशी खुबी लेखिकेने अभ्यासूवृत्तीने साधलेली पानोपानी आढळते. या आठ प्रकरणांसाठी लेखिकेने सुमारे २२५ संदर्भांचा सढळपणे उचित उपयोग केलेला आहे. त्यातही डी. जी. तेंडुलकरांच्या 'महात्मा' ग्रंथाचा प्रभाव जास्त आहे. सुमारे ४३ संदर्भ त्यातलेच आहेत. खुद्द महात्मा गांधींनाही रुचलेले व जगन्मान्यता पावलेले असे 'महात्मा' हे डी. जी. तेंडुलकरलिखित गांधीचरित्र सर्वच दृष्टीनी सरस समजले जाते. तेंडुकर हे 'एक अवलिया' होते. मला वाटते की, तत्कालीन भारतीय नेत्यांमध्ये महात्मा गांधी हेही एक अवलिया वाटावेत, असेच त्यांचे ( पक्षी-गांधीजींचे ) जीवन-कार्य होते. त्यामुळेही असेल; पण तेंडुलकरांना गांधीजींची नस अचूक कळली. म्हणून गांधीजींना समजून घेण्यासाठी 'महात्मा' चे खंड जास्त उपयुक्त ठरावेत हे ओघानेच आले. गांधींची आत्मकथा आणि 'इन सर्च' या ग्रंथांचा 'महात्मा' खालोखाल लेखिकेने डोळसपणे उपयोग केलेला आहे.

## सत्यशोधण्याचा अखंड हव्यास

पाश्चात्य आणि भारतीय अशा दोन्ही संस्कृतींतील ग्राह्यांश आत्मसात करून त्यांनी स्वतःचे असे एक सुसंगत तत्त्वज्ञान बनविले होते. त्यांच्या तत्त्वप्रतिपादनात आणि जीवनसरणीत धर्माला सर्वोच्च स्थान होते; परंतु त्यांचा धर्म हा वस्तुतः नीतिधर्मच होता. ३) आफ्रिकेतून भारतात परतल्यावर नामदार गोखले यांच्या सल्ल्यावरून त्यांनी एक वर्ष प्रत्यक्ष राजकारणात भाग न घेता केवळ राजकीय परिस्थितीचे निरीक्षण करण्यात घालविले. भारतात येण्यापूर्वीच गांधींचे धार्मिक तत्त्वज्ञान, राजकीय कार्यपद्धती आणि संघर्षतंत्र बऱ्याच प्रमाणात विकसित झालेले होते. राजकीय चळवळ जशी देशाच्या निरनिराळ्या भागांत पसरत गेली तसा गांधींचा विविध सामाजिक थरांतील लोकांशी घनिष्ट संबंध येऊ लागला. आपल्या समाजव्यवस्थेतील उच्चनीच भाव, संकुचितपणा, स्त्रियांची परवशता यांचा त्यांना अधिक तीव्रतेने प्रत्यय आला. म्हणून त्यांनी खरे राष्ट्रीय ऐक्य निर्माण होण्यासाठी सामाजिक सुधारणेच्या कार्यक्रमांचा राष्ट्रबांधणीच्या विधायक कार्यात समावेश केला. सामाजिक विषयांवरील त्यांचे विचार पुढे परिणत होत गेले. सत्याचा शोध घेण्याच्या अखंड हव्यासामुळे आयुष्याच्या अखेरपर्यंत त्यांचे व्यक्तिमत्त्व आणि विचार सतत परिवर्तनशील राहिले. (४६)

'भौतिक आणि नैतिक यांच्या परस्परसंबंधाबाबत गांधीजींच्या विचारात सैलपणा आहे.' (१) असे मत नोंदवून लेखिकेने गांधीजींच्या धर्मकल्पनेचे विवेचन निरूपणासारखे सजविले आहे. धर्मसुधारणावादाच्या मर्यादा स्पष्ट करून गांधीजींच्या लोकप्रियतेचे मर्म अचूक सांगितले आहे.

आत्मोन्नतीला उपकारक म्हणून प्रार्थना, उपवास, मौन या पारंपारिक साधनांची तरफदारी करणारे गांधीजी 'संतश्रेष्ठाला साजेसे' राहात. राहाणी व जीवनक्रम सत्त्वसंपन्न व समदर्शी. त्यामुळे भारतातील लक्षावधी धर्मशील भाविक लोकांमध्ये त्यांच्याबद्दल नितांत आदराची भावना होती. त्यामुळे त्यांना उघडपणे विरोध करणे सनातनी शास्त्री-पंडितांनाही अवघड वाटले. भारतातील जनमानसावर गांधींचा जो इतका असाधारण प्रभाव पडला त्याचे कारण भारतातील राजकीय आंदोलनाचे नेतृत्व करताना परंपरागत धर्मकल्पनांची आधुनिक उदारमतवादी मूल्यांशी सांगड घालण्याचे त्यांचे हे कौशल्य होय. ( ७८ ) गांधींना बुद्धीचे वावडे नव्हते; परंतु त्यांचा भर अंतःप्रेरणेवर होता. तरीही नैतिक व्यवहाराचा भौतिक सृष्टीवर होणारा परिणाम कार्यकारणभावाने त्यांना सिद्ध करता आलेला नाही. ( ७९ ) गांधींना गूढवादाचा आश्रय घ्यावा लागे त्याचे हेच कारण !

## सत्तालोभी कार्यकर्ते

समर्थ रामदासांच्या तत्त्वज्ञानाचा पराभव त्यांच्याच सांप्रदायिक भक्तगणांनी केला अशा आशयाचा एक मार्मिक, वस्तुनिष्ठदर्शक विचार प्रा. माटे यांनी मांडला होता. त्याची आठवण व्हावी असे प्रस्तुत ग्रंथातील प्रकरण म्हणजे 'गांधी आणि भारतीय राजकारण' हे होय.

वल्लभभाई पटेल, राजेंद्रप्रसाद, राज-

गोपालाचारी व मौलाना आझाद हे कॉंग्रेसमधील वजनदार गटाचे पुढारी १९२० ते १९३९ पर्यंत सतत निष्ठेने गांधींच्या पाठीशी उभे होते, परंतु सत्यअहिंसेच्या गांधीप्रणीत तत्त्वज्ञानावर त्यांची निरपवाद श्रद्धा नव्हती. भारतातील स्वातंत्र्यलढ्यासाठी दुसरा पर्याय उपलब्ध नसल्याने केवळ धोरण म्हणून त्यांनी अहिंसेचा स्वीकार केला होता. (१२३) युद्ध संपल्यावर इंग्लंडमध्ये मजूर-पक्ष सत्तेवर आला. सत्तांतराच्या दृष्टीने त्या पक्षाने कॉंग्रेस व लीग यांच्या पुढाऱ्यांशी वाटाघाटी सुरू केल्या. त्यात गांधींच्या मताला पुरेसा मान राहिला नाही...आणि 'फाळणीचा निर्णय तर गांधींना डावलूनच घेण्यात आला.' (१२४) कॉंग्रेसमधील डाव्या गटाचाही फाळणीस विरोध होता; परंतु त्यांना बरोबर घेऊन फाळणीच्या विरोधात एखादा देशव्यापी लढा उभारता येईल असे गांधींना वाटत नव्हते. म्हणून पाकिस्तानच्या निर्मितीला त्यांनी आपली मान्यता दिली. (१२४) या अगतिकतेचे अधिक ऐतिहासिक दृष्टिकोनातून वस्तुनिष्ठ विवेचन व्हायला हवे होते असे हे वाचताना जाणवते.

विधायक कामाच्या परिपूर्तीसाठी गांधीजींच्या प्रेरणेने अनेक संस्था निर्माण झाल्या. त्यातील कार्यकर्ते सामुदायिक प्रतिकाराची चळवळ सुरू झाली की आपल्या संस्थांचा प्रपंच गुंडाळून चळवळीत उडी घेत. सामुदायिक चळवळीचे नेतृत्व व नियंत्रण ते स्वयंस्फूर्तीने करीत त्यांची ध्येयनिष्ठा, कार्यतत्परता, स्वार्थत्याग यांच्यामुळे सामान्य कार्यकर्त्यांवर त्यांचा नैतिक दरारा राही. या निर्भय, निःस्वार्थी, कणखर कार्यकर्त्यांची निष्ठा हेच गांधींचे खरे सामर्थ्य होते. त्यांच्या स्वयंस्फूर्त सहभागामुळेच सामुदायिक चळवळींवरील गांधींची पकड शेवटपर्यंत कायम राहिली पंडित नेहरू कॉंग्रेसचे अध्यक्ष असतानाही पहिला सत्याग्रही होण्याचा मान गांधींनी विनोबांना दिला ही घटना गांधींच्या या कार्यकर्त्यांवरील विश्वासाचे द्योतक आहे गांधीजींच्या अराज्यवादी विचारसरणीमुळे सत्याग्रहाला राजकीय सत्तेचे वावडे होते सेवाभावी समाजाभिमुख कार्यकर्ते खेड्यातील विधायक कार्यक्रमात गुंतून राहिल्यामुळे कॉंग्रेससंघटनेची सूत्रे सत्ताकांक्षी, व्यवहारकुशल अशा शहरी कॉंग्रेसजनांच्या हाती राहिली. कुठल्याही मूलगामी सामाजिक तत्त्वप्रणालीशी त्यांची बांधिलकी नव्हती. त्यामुळे संसदीय राजकारणाची परंपरागत चाकोरी आणि प्रस्थापित हितसंबंध यांच्या अनुरोधाने त्यांनी आपले राजकारण चालविले. संघटनेतील सत्ताकांक्षी नेते आणि विधायक क्षेत्रातील सत्तापराङमुख कार्यकर्ते यांच्यातील दरी रुंदावली. कॉंग्रेसमधील भ्रष्टाचारास आळा घालण्यास गांधीवादी कार्यकर्ते असमर्थ ठरले....'मला जर कोणी राष्ट्रपिता म्हटले असेल तर त्याचा अर्थ हा की, १९१५ साली दक्षिण आफ्रिकेतून परत आल्यानंतर कॉंग्रेसला आजचे स्वरूप प्राप्त करून देण्यात माझा मोठा हात होता आता मात्र कॉंग्रेसवर माझा असा प्रभाव आहे असे मी म्हणू शकत नाही.' (१२४) आयुष्याच्या अखेरीस गांधींना असे हताश उद्गार काढण्याची वेळ यावी, यावर वेगळे भाष्य करण्याची गरज नाही.

## कालाचा विरोधी प्रवाह

'आपले कुणी ऐकत नाहीत' असा आक्रोश करण्याची पाळी 'युगान्ती' खुद्द व्यासावर आली होती. गांधींच्या बाबतीतही काहीसे किंवा बरेचसे असेच घडले का? खरे तर असा प्रश्न मनात यावा यातच ह्याचे उत्तरही दडलेले आहे. 'गांधीवाद' ह्या संकल्पनेचेही असेच घडत गेले. तरीही गांधींच्या विशाल आणि मानवतावादी दृष्टिकोनाचे किंवा त्यांच्या विचाराचे मूल्य कमी प्रतीचे ठरत नाही. 'राष्ट्रीय ऐक्य आणि सामाजिक न्याय' आणि 'विकेंद्रित अर्थव्यवस्था' ही प्रकरणे याही दृष्टीने मनन करण्याजोगी आहेत.

गांधींच्या आर्थिक संकल्पना जनताभिमुख व सुमतावादी असल्या तरी ऐतिहासिक दृष्टिकोनाच्या व शास्त्रशुद्ध विश्लेषणाच्या अभावामुळे भारतातील सामाजिक वास्तवाचे त्यांना यथार्थ आकलन झाले नाही. कालाचा प्रवाह त्यांच्या अगदी विरुद्ध दिशेने चालला होता.' (२४०) स्वातंत्र्यचळवळीत फूट पडू नये या उद्देशाने भांडवलदारांच्या संघटित शक्तीला शह देऊ शकतील अशा कामगारांच्या व शेतकऱ्यांच्या संघटना उभारण्यास गांधींनी उत्तेजन दिले नाही, म्हणून गांधींच्या नेतृत्वाखाली चाललेल्या राजकीय चळवळीची परिणती अपरिहार्यपणे भारतात भांडवलशाही शासनाच्या स्थापनेत झाली. (२४१) सातप्रकरणी गांधीचिकित्सेचा हा सफळ संपूर्ण लेखनप्रवास एका दृष्टीने वाचकाला अस्वस्थ करून सोडतो.

'विश्वेदेवासभासदइति' असा तारस्वरातील देवांचा घोष संपला की 'यानिकानिच पापानि' सारखे मंत्र कमालीच्या खालच्या पट्टीत तेही तोंडातल्या तोंडात पुटपुटावेत तशा धर्तीने मग आठवे 'उपसंहार' हे प्रकरण उरते गणपतीच्या प्राणप्रतिष्ठेच्या वेळीही उत्साही घाई आणि विसर्जनाच्या वेळीही घाईचा दणक्यात उत्साह, असेच काहीसे मानवी वर्तन घडते.

ग च्या जागी गा आणि गा नंतर गि किंवा गी अशा कानामात्रा वेलांटीच्या फरकानेच जग पुढे सरकते. 'तेव्हा समाजवादी क्रांती घडवून न आणल्याबद्दल व्यक्तिशः गांधींना दोष देण्यात अर्थ नाही.' अशा भरतवाक्याने लिखित ग्रंथाचा शेवट होत असला तरी विचारांना स्वास्थ्य लाभत नाही, अशी प्रबळ अस्वस्थता निर्माण करण्याचे काम हे पुस्तक करते, ही एक मोठीच जमेची बाजू म्हणायला हवी!

शेवटी ग्रंथाली प्रकाशनाच्या या सुरेख ग्रंथाच्या मुखपृष्ठाविषयीही थोडे सांगण्यासारखे आहे. धारी घट्ट पण पोताची वीण कमालीची झिरझिरीत अशा अस्ताव्यस्त शेव तुटलेल्या खादीच्या वस्त्राचा मोठा भाग आणि त्यावर गांधीजी हाती धरीत तशी उंच काठी व कोपऱ्यातून दोन वाटचाल करणाऱ्या पावलांचे ठसे असे मोठे वेधक वेष्टन ग्रंथाची शोभा वाढविणारे आहे गांधी हे लाल अक्षरातील शीर्षक रिचर्ड अॅटनबरोच्या 'गांधी' चित्रपटामुळेच देण्याचे सुचले असावे! 'महात्माजी' किंवा 'महात्मा गांधी' असे आदरार्थी शब्दप्रयोग नव्या चिकित्सेला बाधा आणतात की काय न कळे! ! (एका 'खिळ्या'च्या बचतीने गांधीजींना कमीपणा नाही तसेच छपाईलाही मोठेपणा नाही)

—वा. भा. जोशी

**गांधी**
**लेखिका . नलिनी पंडित**
**ग्रंथाली प्रकाशन**
**पृ २४३, किंमत रु. ३५.**



# मॅडम

मॅडम प्राइम मिनिस्टर ! खरंच, आपल्या देशात हा शब्द यापुढे किती काळासाठी अंतर्धान पावला आहे, हे सांगता येणं कठीण आहे; पण मला हे सुरुवातीलाच स्पष्ट केलं पाहिजे मॅडम, की मी तुमचा चाहता होतो आणि विरोधकही. चाहता असण्याची कारणे सांगण्याची गरज नाही. तुमच्या हत्येनंतर अनेकांच्या मुखांतून आणि लेखणीतून ती पुरेशी व्यक्त झाली आहेत. विरोधक असण्याचे मुख्य कारण म्हणजे सुमारे नऊ वर्षांपूर्वी तुम्ही आमच्यावर लादलेली आणीबाणी. अर्थात त्याही काळात मॅडम, मी पहिले जवळजवळ सहा महिने तुमच्या या कारवाईचं अजाणपणानं समर्थनच करत होतो. या देशाला कोणी तरी शिस्त लावू पाहतंय, असं माझ्या भाबड्या मनाला तेव्हा वाटलं होतं; पण नंतर मॅडम, शिस्त न आणता नुसताच बडगा आणला गेला आहे, हे लक्षात आलं आणि मी तुमचा विरोधक बनलो. अर्थात माझ्यासारखा मध्यमवर्गीय, पांढरपेशा माणसाचा विरोध तो काय असणार ? चहाच्या टेबलावर बसून आरडाओरडा करण्यापलीकडे मी काहीच करू शकत नव्हतो. नाही म्हणायला १९७७ च्या त्या ऐतिहासिक निवडणुकीत तुमचा पराभव झाला मॅडम, ती रात्र मी शहरातल्या रस्त्यांवरून एकट्यानेच जल्लोष अनुभवत साजरी केली होती.

त्यानंतर अवघ्या तीनच वर्षांनी सत्तारूढ जनता पक्षाचा राजकीय मुत्सद्देगिरीच्या बळावर पार धुव्वा उडवून तुम्ही या देशाच्या पुन्हा प्राइम मिनिस्टर झालात मॅडम, आणि माझ्यासारखे सांदी–फटीतले तुमचे विरोधक या यशाचा गंभीरपणे विचार करू लागले. खरंच तुमच्यामध्ये अशी काय जादू होती, काय मोहिनी होती की, इथल्या जनतेनं तुम्हाला अल्पावधीतच या पदावर पुन्हा विराजमान करावं ? इथली जनता मूर्ख नव्हती. तुम्ही तर आपलं असामान्यत्व सिद्धच केलं होतं. तुमचा विश्वास बसणार नाही मॅडम; पण तेव्हापासून मी तुमच्याकडे जास्तच आकर्षित होऊ लागलो. त्यातून तुम्ही 'आणीबाणी पुन्हा लादणार नाही' असं एकदा निःसंदिग्धपणे जाहीर केल्यावर माझ्या विरोधाची धारही खूपच बोथट होऊन गेली. तुमच्या कार्यपद्धतीबद्दल काही वेळा मी नाराज व्हायचो; पण त्यातून तुम्ही जे साध्य करत गेलात ते पाहिल्यावर कार्यपद्धतीला एवढं महत्त्व द्यावं का असं द्वंद्वही अनेकदा माझ्या मनात निर्माण होऊ लागलं.

◻

तशी मॅडम, आपली भेट फक्त एकदाच झाली. अर्थात तुमच्या ती खिसगणतीतही नसणार; पण मला अजून तो सारा प्रसंग स्वच्छपणे दिसतो. सुमारे तीन–चार वर्षांपूर्वी सातार्‍याला वास्तव्य करून असलेल्या शंकराचार्यांच्या भेटीसाठी तुम्ही आला होतात. सातार्‍याला विमानतळ नसल्याने तुम्ही विमानाने पुण्याला आलात आणि तिथून हेलीकॉप्टरने सातार्‍याला गेलात. पुण्यात पी. एम. चा 'स्टॉपओव्हर' आहे म्हटल्यावर पत्रकारांना हेलीपॅडवर जाणं आलंच. मीही त्या जथ्यामध्ये होतो. सकाळची प्रसन्न वेळ. तुम्ही विमानातून बाहेर आलात. नमस्कारासाठी हात जोडलेले. चेहर्‍यावर सुंदर स्मित; पण देशात अनेक ठिकाणी व्हायचं तेच इथंही झालं. तुमच्या पक्षाचे असंख्य स्थानिक नेते, कार्यकर्ते हार–तुरे घेऊन बेशिस्तपणाने पुढे धावले. तुम्ही काही क्षण त्यांच्याकडे पाहिलंत आणि अचानक तुमचा मोर्चा फिरवलात. लांब अंतरावर

लष्करी जवान त्याच्या कुटुंबियासह शांतपणे तुमच्या स्वागतासाठी उभे होते. तुम्ही त्यांच्याजवळ जाऊन पोचलात आणि सारा नूरच पालटला. काही क्षणापूर्वी त्रासलेल्या तुमच्या चेहऱ्यावर पुन्हा हास्य झळकू लागलं आणि ते घेऊनच तुम्ही आमच्याजवळ आलात.

आपण सर्वचजण वर्तुळाकार उभे राहिलो. बसायला कुठे जागा नव्हतीच शिवाय, तुम्हाला लगेच हेलीकॉप्टरने सातान्याला जायचं होतं. मी तुमच्या शेजारीच उभा होतो जेमतेम फूटभराचं अतर ठेवून. तुम्ही शकराचार्यांच्या दर्शनाला गेल्यानं अंधश्रद्धेला प्रोत्साहन मिळण्याची शक्यता आहे म्हणून तुम्ही ही भेट रद्द करावी, अशा आशयाचं आवाहन त्या वेळी पुण्यातल्या काही विचारवतानी एका निवेदनाद्वारे तुम्हाला केलं होत. त्यावर तुमची प्रतिक्रिया मी विचारली. मला अजूनही स्पष्टपणे आठवतं मॅडम, मी विचारत असताना तुम्ही माझ्याकडे नजर रोखून पहात होतात. एकाग्र चित्ताने सपूर्ण म्हणण ऐकून घेतलंत आणि शकराचार्यांच्या भेटीला जाण्यामुळं अधश्रद्धा फोफावण्याचं काहीच कारण नाही, अस समजावणीच्या सुरात स्पष्ट केलंत.

इतक्या जवळून झालेली ती आपली पहिली आणि अखेरचीच भेट! त्यानतर दूरदर्शनवर तुम्हाला जवळजवळ रोज पहात आणि ऐकत होतो. कधी एखादी जाहीर सभा, कधी कोनशिलासमारभ, कधी एखाद्या चर्चासत्राचं उद्घाटन, असंख्य परदेशदौरे, तर एकदा एशियाड, एकदा अलिप्त राष्ट्राची परिषद, एकदा राष्ट्रकुलपरिषद आणि एकदा सयुक्त राष्ट्रसघातील भाषणाच्या निमित्तानही तुमच्या व्यक्तिमत्त्वामध्ये विविध गूढ धागे असल्याचं त्या प्रत्येक प्रसंगी जाणवायचं. गेल्या सोळा-सतरा वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीत तुम्ही अनेक राष्ट्रीय किंवा आतरराष्ट्रीयदृष्ट्या महत्त्वाचे निर्णय घेतलेत आणि त्या प्रत्येक वेळी सर्वांनाच काहीसं बुचकळ्यात टाकत गेलात.

¤

मला आठवत मॅडम, १९६६ साली तुम्ही पहिल्यादा या देशाच्या पतप्रधान झालात. केवळ आपल्या देशातच नव्हे तर सबध जगात एक लहर उठली. सर्वांनाच निरनिराळ्या कारणांमुळं कुतूहल वाटू लागल. आधुनिक भारताचा पाया रचणाऱ्या पडित जवाहरलाल नेहरूंची कन्या, एक महिला, 'गूंगी गुडिया' अशा विविध प्रकारे तुमची ओळख त्या वेळी करून दिली गेली. हे सर्व ऐकताना, वाचताना तुम्हाला नेमकं काय वाटत होतं मॅडम ? तुम्ही पतप्रधान झाल्यानंतर ससदेचं पहिलं अधिवेशन तीन दिवसावर येऊन ठेपल तेव्हा तुम्ही काहीशा नर्व्हस झाला होतात, असा गौप्यस्फोट तुमच्या एका जवळच्या मैत्रिणीन तुमच्याविषयी दूरदर्शनवर आठवणी सागताना नुकताच केला. तुम्हाला हा नर्व्हसनेस कशामुळ आला होता? पिताजींची परपरा आपण तेवढ्याच तोलामोलानं पुढं चालवू शकू की नाही, याची शका वाटत होती का ? की तुमच्याच पक्षातल्या काही ज्येष्ठ मडळीच्या अस्तित्वाच दडपण तुमच्यावर आल होतं ? की त्या पदावरून विरोधकाना तोड देण्याचं तंत्र अजून आत्मसात झालं नसल्यामुळं तुम्ही नर्व्हस झाला होता ? की या देशाच्या गेल्या तीस-चाळीस वर्षांच्या वाटचालीतील तुम्ही साक्षी असलेल्या असख्य आठवणींचं ओझ तुमच्या मनावर आल होतं ? त्या आठवणींमध्ये तुम्ही खोलखोल गुतत जात होतात आणि त्यामुळ समोरच्या घडामोडीवर नियत्रण ठेवण्याचं भान सुटत असल्यासारख तुम्हाला वाटत होत? की त्या वेळी तुम्ही खरच 'गूंगी गुडिया' होतात ? मॅडम, तुम्ही आमच्याशी निरनिराळ्या माध्यमातून असख्य वेळा तासन्तास बोललात; पण तुमच्या या पहिल्या आणि बहुधा अखेरच्याच, नर्व्हसनेसबद्दल तुम्ही काही सागितलच नाहीत. तुमच्या आजच्या व्यक्तिमत्त्वात कुठेही न दिसणारा हा धागा तेव्हा कसा होता, का होता आणि तुम्ही तो कसा तोडून टाकलात हे अखेरपर्यंत गुलदस्तातच राहिल.

पतप्रधानपदाची सूत्रं हाती घेतली. दोन-तीन वर्षं शातपणान गेली आणि १९६९ साली तुम्ही या देशाला पहिला धक्का दिलात. तुमची यापूर्वी केलेली वर्णनं आणि तुमच्या कारभाराविषयीचे सारे अंदाज कोलमडून पडावेत असा! सत्तारूढ काँग्रेसपक्षाचे दोन तुकडे झाले! इंडिकेट-सिंडिकेट. देशात एकच गहजब उडाला; पण तुम्ही अविचल होतात. तुमच्या पिताजींबरोबर चालत आलेल्या आणि आता वृद्ध झालेल्या नेतेगणाशी तुम्ही सरळसरळ फारकत घेतलीत; पण ते केवळ बड नव्हतं, उठावही नव्हता. इथून पुढली वाटचाल स्वत:च्या तत्रानं करण्याच्या तुमच्या निश्चयाची ती पहिली इशारत होती. ज्यांना ती मान्य झाली ते तुमच्याभोवती गोळा झाले. बाकीचे विरोधात उभे राहिले; पण कालांतराने अस्तंगतच पावले. त्या वेळी सुमारे पचाऐंशी वर्षांची प्रदीर्घ परपरा असलेल्या आपल्या पक्षाच्या वृद्ध नेतृत्वापासून अलग होण्याचा हा निर्णय तुम्ही कसा घेतलात ? का घेतलात ? लोक आरोप करतात तशी एकाधिकारशाहीची ओढ तुम्हाला तेव्हापासूनच वाटू लागली होती का ? की खरोखरच वैचारिक आणि प्रत्यक्ष कार्य करण्याच्या पातळीवरही तुमचे, साधता न येण्यासारखे मतभेद निर्माण झाले होते ? की स्वत:चं स्वतत्र अस्तित्व जाणवून देण्यासाठी तुम्ही हा मार्ग पत्करलात ? पक्षातल्या या ज्येष्ठ-श्रेष्ठांना नामोहरम करण्याचा आत्मविश्वास केवळ दोन-तीन वर्षांत तुमच्याजवळ कुठून आला ? या विभाजनामागच्या तुमच्या प्रामाणिक प्रेरणा मॅडम, तुम्ही आम्हाला कधी सागितल्याच नाहीत.

पण जय तुमचाच झाला ! १९७१ च्या सार्वत्रिक निवडणुकीत 'गरिबी हटाओ'ची घोषणा देऊन तुम्ही साऱ्या जनतेला तुमच्या जाळ्यात अक्षरश: खेचून घेतलत व त्या महापुरानं तुमचे सारे विरोधक पार धुऊन नेले. एका नव्या तेजान तुम्ही या देशाच्या पतप्रधानपदी पुन्हा आरूढ झालात. तुमची पावलं अधिकच ठाम आणि दमदार पडू लागली.

¤

निवडणुकीनतर थोड्याच काळात देशाच्या पूर्व-पश्चिम सीमावर युद्धाचे ढग जमू लागले. त्या वेळच्या पूर्वपाकिस्तानातून निर्वासिताचे लोंढे आपल्या देशात येऊ लागले. या सर्व घडामोडींवर तुमच बारकाईनं लक्ष होतं. निर्वासिताच्या लोंढ्याबद्दल चिंता व्यक्त करणारी निवेदनं तुम्ही सतत करत होता. या प्रश्नाबाबत आपल्या देशाची भूमिका स्पष्ट करण्यासाठी तुम्ही विस्तृत परदेश-दौराही केला.

तीन डिसेंबर १९७१ ! पाकिस्तानच्या हवाईदलान पश्चिम सीमेवरून भारतावर

हल्ला चढविला. आपलं लष्करही सज्ज होतच. पश्चिम सीमेवर पाकिस्तानला माग हटवत असतानाच पूर्व सीमेवर मुक्तिवाहिनीच्या आडोशानं आपले जवान पूर्वपाकिस्तानात घुसले तिथल्या पाकिस्तानी लष्कराचे मुख्य जनरल नियाझी याच्या नेतृत्वाखालील सैन्याचा काही दिवसातच पाडाव झाला. सुमारे नव्वद हजार पाकिस्तानी जवान शस्त्र खाली टाकून शरण आले. जेमतेम पधरा दिवसात पूर्वपाकिस्तानचं नव्या स्वतत्र देशात स्थित्यतरण झाल. त्यापाठोपाठ युद्धबदीही झाली.

स्वातंत्र्योत्तर काळात परकीय शत्रूशी भारतानं केलेला हा चौथा मुकाबला होता; पण निर्णायक विजय मात्र पहिलाच ! १९४८ साली काश्मिरात घुसलेले पाक टोळीवाले केवळ दारापुढून हाकलून देण्यातच आपण सतुष्टता मानली होती. १९६२ मध्ये झालेलं चीनचं आक्रमण म्हणजे एका दारुण पराभवाचा लाजिरवाणा आलेख. त्या तुलनेत १९६५ सालचं पाकिस्तानच आक्रमण आपण बऱ्यापैकी ताठ मानेनं परतवल; पण त्यातही निर्णायक घाव नव्हताच. या पार्श्वभूमीवर तुमच रणागणावरील कर्तृत्व अधिकच झळाळून उठल. देशात तर तुमच्यावर स्तुति-सुमनाचा गौरवशाली वर्षाव झालाच, पण परदेशस्थ शक्तीनीही काहीशा धास्तावलेल्या मनान या घटनेची नोद घेतली. भारत केवळ स्वतःवरील आक्रमणच परतवून लावू शकतो अस नव्हे, तर परिस्थितीचा फायदा उठवून या जगाच्या नकाशावर एका नव्या देशाला जन्म देण्याच सामर्थ्यही इथं निर्माण झाल आहे, हा अनुभव त्याना धक्कादायकच होता.

आंतरराष्ट्रीय पातळीवरील तुमच्या राजकीय मुत्सद्देगिरीची पहिली ठळक चुणुक तुम्ही या युद्धाच्या निमित्तानं दाखवून दिलीत मॅडम, पण त्या विजयाच्या प्रसगीही पश्चिम पाकिस्तानात अवाजवी आक्रमण न करण्याचा संयम तुम्ही कसा राखलात ? किमानपक्षी, या सधीचा फायदा घेऊन पाकव्याप्त काश्मिर तरी तुम्ही मुक्त करून घ्यायला हवा होता, अस त्या वेळी असंख्य भारतीयाना वाटल; पण तुम्ही हल्ल्याच लक्ष्य विकेंद्रित होऊ दिल नाही. स्व-सामर्थ्याची जाणीव करून देणं आणि मनगटाच्या बळावर जमतील ते सर्व हिशोब चुकते करण्याचा प्रयत्न करणं यातली सीमा-रेषा तुम्ही अचूक कशी काय पकडलीत मॅडम ? या युद्धाच्या निमित्तान तमाम देशवासियाना एक नवा आत्मविश्वास देत असतानाच त्याच्यामध्ये विजयाचा उन्माद येणार नाही, याची दक्षता इतक्या सहजपणे कशी घेतलीत ? लष्करी सामर्थ्याविषयी काहीशी घृणा असणारे तुमचे पिताजी आणि गरज पडल्यास लष्कराचा पुरेपूर वापर करणाऱ्या तुम्ही, हे अतर केवळ परिस्थितीमुळे निर्माण झाल का ? की एवढ्या एका बाबतीत पिताजीचा वारसा तुम्ही त्याज्य मानलात ? की दोन पिढ्यामधील फरकामुळ हा बदल घडून आला ? स्वातंत्र्योत्तर भारताच्या इतिहासातील या संस्मरणीय सुवर्णक्षणाबाबत तुम्ही मौन पाळणंच जास्तच पसत केलंत मॅडम ! ¤

यानंतर दोन-तीन वर्षं अशीच गेली आणि भारतीयाचा ऊर अभिमानाने भरून टाकणारी आणखी एक बातमी आली-राजस्थानात पोखरण येथे भारताचा यशस्वी अणुस्फोट ! सार जग हादरून गेलं. हा अणुस्फोट शाततामय कारणासाठी असल्याचं तुम्ही वारंवार जाहीर केलं तरी परकीयाच्या छातीतील धडकी अजूनही कमी झालेली नाही. पुरेशी लष्करी सामुग्री नसल्यामुळे सुमारे बारा वर्षांपूर्वी पत्करलेली नामुष्की आणि आता हा अणुस्फोट ! एक तपाची ही वाटचाल काय दर्शवते ? या वाटचालीत योजकता होती, एक स्वप्नही होत. तुम्ही ते शब्दापेक्षा कृतीतूनच व्यक्त केलत.

शास्त्रीय सशोधनातील महत्त्वाचा टप्पा गाठण एवढच उद्दिष्ट या कृतीमागं होत का ? की भारतीयाचे आणि इतर जगाचे डोळे दिपवून टाकण्याच्या काहीशा मर्यादित किंवा सकुचितही दृष्टिकोनातून हा स्फोट घडवण्यात आला ? की विकसित देशांच्या रागेत जाऊन बसण्याच्या ईर्षेतून हे घडलं ? अहिंसेचं तत्त्व तुम्ही कधीच नाकारल नाहीत मॅडम; पण दुबळेपणातून येणाऱ्या अहिंसेपेक्षा सामर्थ्याची जोड लाभलेली अहिंसा तुम्हाला आजच्या युगात जास्त अर्थवाही आणि परिणामकारक वाटत होती, हे तर या कृतिद्वारे तुम्ही सुचवत नव्हता ना ?

१९७५ साल आलं विविध स्वरूपाच्या राजकीय-सामाजिक चळवळी देशात जोर धरू लागल्या होत्या. व्यावहारिकदृष्टचा उभ्या आयुष्यात जमेची बाजू फारच थोडी असलेले; पण निष्कलक चारित्र्याच अभेद्य कवच धारण केलेले जयप्रकाश नारायण देशातील युवाशक्ती सघटित करून तुमच्यासमोर उभे ठाकले. त्यातच तुमची निवड अवैध ठरवणारा निर्णय अलाहाबादच्या उच्च न्यायालयान दिला आणि तुमच चित्त सैरभैर झाल. या प्रसगी तुम्ही शातपणे सत्तेचा त्याग करावा, असा सल्ला तुमच्या काही समर्थक-विचारवतानी दिला, पण मॅडम, तुम्ही तो साफ धुडकावून लावला ! २६ जून १९७५चा दिवस उगवला तो या देशात आणीबाणी जारी करणारा वटहुकूम घेऊनच !

या वटहुकुमाआधारे देशात शिस्त आणली जात असल्याचा आभास सुरुवातीचा काही काळ निर्माण झाला; आधुनिक भारताचे दार्शनिक विनोबा भावे यानी उच्चारलेला 'अनुशासनपर्व' हा शब्दप्रयोग महाभारताचा संदर्भ डावलून तुम्ही रूढ करू पाहिला; पण प्रत्यक्षात मात्र सत्तेच्या जबरदस्त केंद्रीकरणाला प्रारभ झाला. जयप्रकाशजीसह सर्व विरोधकाना गजाआड करून शाततामय वातावरण प्रस्थापित केल जाऊ लागल. देशातली वृत्तपत्रही थड करण्यात आली. सत्तेच्या वारूना लगाम राहिला नाही. सबध देशात अधकार पसरला !

सुमारे पावणेदोन वर्षं अशीच गेली आणि १९७७ च्या फेब्रुवारीत तुम्ही सार्वत्रिक निवडणुकीची घोषणा केली. विरोधक मुक्त झाले. निवडणुकीच वार आपल्या शिडात भरू लागले. तरीदेखील निवडणुकीमध्ये तुमचा पराभव होईल, अस कोणालाच, अगदी तुमच्या कट्टर विरोधक आणि टीकाकारानाही वाटल नव्हत, पण भारतीय जनतेनं आणीबाणीच्या कारवाईवरील आपला रोष मतपेटीद्वारे व्यक्त केला. स्वातंत्र्योत्तर काळात प्रथमच केंद्रातून काँग्रेस पक्षाला बाहेर पडाव लागल. हे सत्तातर ऐतिहासिक होत. आपण ते घडवू शकतो, हा भारतीय जनतेला त्या निमित्तानं आलेला आत्मविश्वास त्याहून महत्त्वाचा होता !

पण मॅडम, हे सार कसं घडलं ? का घडल ? अलाहाबाद न्यायालयाच्या निर्णयानंतर तुम्हाला सत्ता सोडणं एवढं कठीण का

वाटलं? असह्य का झालं? आणीबाणीच्या काळात सत्तेच योग्य नियंत्रण तुम्ही का करू शकला नाहीत? आणि नंतर निवडणूक जाहीर करणं अपरिहार्य नसूनही तुम्ही जनमताला सामोऱ्या का गेलात? जनमताचा कौल स्वीकारून सत्तेपासून शांतपणाने दूर कशा झालात? तुम्ही जाहीर कबुली दिली नसली तरी त्यामागं कुठं तरी पश्चात्तापाची आणि प्रायश्चित्ताची भूमिका होती का? आणीबाणीचं मोघम समर्थन करण्याव्यतिरिक्त तुम्ही या सर्व घडामोडीबाबत कधीही काहीच बोलला नाहीत. मॅडम तुमच्या कारकीर्दीत असा काळ येऊन जावा, हे तुमचं आणि देशाचही दुर्दैव; पण एखाद विष पचवाव त्या सहजतेनं तुम्ही हे सार स्वीकारलं, गिळलं आणि विरोधी पक्षाची भूमिका स्वीकारून त्या दिशेनं कार्य सुरू केलं.

मॅडम, तुमच्या जीवनातला सर्वांत खडतर काळ कोणता, असं कोणी विचारलं तर तुम्ही कोणत्या काळाचा निर्देश केला असता, याचा अंदाज बांधणं कठीण आहे; पण मला तरी असं वाटत को, १९७७ च्या या पराभवानंतर १९८० च्या पुनरागमनापर्यंतची तीन वर्षं त्या दृष्टीनं उल्लेखनीय ठरावीत! सत्तेची चव आयुष्यात प्रथमच चाखणारे जनतापक्षाचे काही वृद्ध कपि सूडानं बेभान झाले होते. तुमची लोकसभेवरील निवड रद्दबातल करण्यापासून तुम्हाला तुरुंगात डाबून तुमच्याविरुद्ध आयोग नेमण्यापर्यंत नाना प्रकारचे उद्योग या करंट्या नेतृत्वानं केले आणि स्वतःचीच कबर खोदली. तुम्ही मात्र तुमचे धाकटे चिरंजीव संजय यांच्या साथीनं या परिस्थितीला चिवटपणे तोंड देत होता. स्वातंत्र्योत्तर काळात तुरुंगाचा उंबरठा ओलांडण्याची पाळी तुमच्यावर प्रथमच या जनता राजवटीत आली. खरंच, त्या वेळी तुमची भावना काय होती? राजकीय तुरुंगवास हा प्रकार तुम्हाला अपरिचित नव्हता. तुमच्या घराण्याची तो परंपराच होती; पण स्वकीयांनी लादलेला तुरुंगवास स्वीकारताना तुम्ही उद्विग्न झाला नाहीत? विशेषतः राजकारणामध्ये तुमच्याहून किती तरी खुजी असणारी (पिग्मो?) माणसं सत्तेच्या दडुक्यानं तुमचा मानसिक आणि काही प्रमाणात शारीरिकही छळ करत होती, हे तुम्हाला असह्य झालं नाही? निराशा, असहायतेनं तुम्हाला ग्रासून टाकलं नाही? त्या काळात तुमच्या एका जवळच्या मैत्रिणीशी तुम्ही असं बोललात म्हणे की, अडचण किंवा संकटाच्या काळातच तुम्ही जास्त ताकदवान होता, भक्कमपणे उभ्या राहता आणि त्या संकटाचा मुकाबला करता; पण ही ताकद तुम्हाला कुठून येत असे? तो केवळ घराण्याचा वारसा होता की सत्त्वसंपन्न, सत्ताकांक्षी व्यक्तिमत्त्वाचा तो आविष्कार होता?

अर्थात तुम्हाला फार वाट पहावी लागली नाही, मॅडम! जनता पक्षाच नादान नेतृत्व पाठिंब्यासाठी तुमच्याच पायाशी लोळण घेत आलं आणि त्याच्या डोक्यावर पाय ठेवून तुम्ही पुन्हा या देशाच्या पतप्रधानपदी जाऊन बसलात! जेमतेम तीन वर्षांपूर्वी तुम्हाला दूर भिरकावून देणाऱ्या भारतीय जनतेनंच हा चमत्कार घडवून आणला आणि सर्वजण अवाक झाले राजकीय क्षेत्रात इतकं वैभवशाली पुनरागमन फार थोड्या नेत्यांच्या वाट्याला आलं असेल!

'गव्हर्न्मेंट दॅट वर्क्स' अशी घोषणा देऊन तुम्ही १९८० ची निवडणूक मारलीत आणि त्यानंतर गेल्या पाच वर्षांत तुम्ही कधी मागं वळून पाहिलंच नाही, मॅडम! निवडणुकीतल्या विजयाचा आनंद ओसरतोय न ओसरतोय तोच तुमचे धाकटे चिरंजीव संजय यांचं विमान-अपघातात निधन झालं; पण तुमच्या हृदयातल्या मातृत्वाच्या कप्प्यात ते दुःख बंद करून तुम्ही खंबीरपणानं उभ्या राहिलात, एवढंच नव्हे तर ज्येष्ठ चिरंजीव राजीव यांना राजकारणात यायला भाग पाडलंत. सिंहीण आपल्या छाव्यांना देते तसं प्रशिक्षण त्यांना दिलंत. आपला वारसदार निर्माण केलात; पण मॅडम, ही गरज तुम्हाला का वाटावी? राजकारणात यायला काहीशा अनुत्सुक असणाऱ्या राजीवना तुम्ही या पाण्यात का खेचलं? आपल्या घराण्याची परंपरा आपल्यानंतरही चालू राहिली पाहिजे, अशी ओढ तुम्हाला इतक्या तीव्रपणाने होती का? की या देशाचं भलं करण्याची कुवत किंवा अधिकार आपल्या घराण्याव्यतिरिक्त अन्य कोणालाही नाही, अशी तुमची मनोमन प्रामाणिक भूमिका होती? आपण सत्तास्थानी असाव, ही आकांक्षा स्वाभाविक आहे, समजण्यासारखी आहे; पण आपल्यानंतरही सत्तेची सूत्रं आपल्या घराण्याबाहेर जाता कामा नयेत, हा हट्ट कशासाठी? की तो तुमच्या रक्ताचाच गुन्हा होता? तुमच्या या वारसदारीबद्दल तुम्ही कधी स्पष्ट बोललाच नाहीत, मॅडम. तुम्ही फक्त पावलं टाकत गेलात आणि भोवतालचे संदर्भ त्यानुसार बदलत गेले. तुमच्या पावलाची दिशा या बदललेल्या संदर्भांमधूनच आम्हाला कळली; पण ती फार उशीरा. तुमची पावलं पूर्णपणे थांबल्यानंतर!

¤

गेल्या पाच वर्षांत राष्ट्रीय पातळीवर फार काही करून दाखवण्याचं तुमच्या मनात बहुधा नव्हतंच. तुमची नजर या देशाच्या सीमापलीकडची क्षितिजं धुंडाळत होती. तिथली आव्हानं तुम्हाला खुणावत होती, तुम्ही त्यांना प्रतिसादही देत होता. आपल्या देशात भरलेलं एशियाड, अलिप्त राष्ट्रपरिषद किंवा राष्ट्रकुलपरिषद ही त्या प्रतिसादाची काही मूर्त स्वरूपं. आपल्यासारख्या गरीब देशात अशा बाबींवर अवाढव्य खर्च करणं अयोग्य आहे, अशी कावकाव काहीजणांनी या प्रसंगी केली; पण तिकडे लक्ष न देता तुम्ही ते सारं साध्य केलं. आपण हेही करू शकतो, असा आत्मविश्वास भारतीयांना दिला साऱ्या जगाला एका निराळ्या शक्तीचं दर्शन घडवलं भारताचं नेतृत्व करण्यात आता तुम्हाला फारसा रस उरला नव्हता. ते तुमच्याकडे निर्विवादपणे चालत आलं होतं. जागतिक नेतृत्वाच्या स्पर्धेत तुम्ही आता उतरला होता भल्याभल्यांची तारांबळ उडवून देत होता. आंतरराष्ट्रीय पातळीवर स्वतःबरोबरच आपल्या देशालाही एका विशिष्ट पातळीपर्यंत नेऊन ठेवण्याचा तुमचा मनोदय त्यातून व्यक्त होत होता.

आंतरराष्ट्रीय पातळीवरील आपलं श्रेष्ठत्व तुम्ही अशा तऱ्हेनं विविध प्रकारे सिद्ध केलं; पण त्याच वेळी देशामध्ये आसाम आणि पंजाब या दोन राज्यांमधील आंदोलनं तुमच्यासमोर आव्हान देत उभी राहिली. त्यापैकी आसामचं आंदोलन तुम्ही व्यवस्थित मोडून काढलं; पण पंजाब धगधगतच होता. निरनिराळ्या मार्गांनी तेथील समस्येवर राजकीय तोडगा काढण्याचे तुमचे प्रयत्न अपयशी ठरले आणि अमृतसरच्या सुवर्णमंदिरात आश्रय घेऊन राहिलेल्या अतिरेक्यांचा बीमोड करण्यासाठी तिथं लष्कर

पाठवण्याचा निर्णय तुम्ही घेतला. हा निर्णय घेतला त्या दिवशी तुम्ही अतिशय बेचैन होता, असं तुमच्या एका निकटवर्तियाशी बोलताना तुम्ही सांगितलं. लष्कराचा स्वकीयांविरुद्ध एवढ्या मोठ्या प्रमाणावर वापर करताना अशी बेचैनी येणं स्वाभाविकही होत; तेवढंच कारण होतं का? की पंजाबच्या प्रश्नाबाबत गेल्या तीन–चार वर्षात तुम्ही घेतलेल्या निर्णयांपैकी काही आडाखे, काही निर्णय चुकल्याची बोचही त्यामागे होती? समझोत्याची संधी येऊनही पंजाबवरील राजकीय पकड न सोडण्याच्या हट्टापायी अशी संधी गमावल्याची चुटपुट तुम्हाला लागून राहिली होती? पंजाबातील अतिरेक्यांच्या कारवायांना वेळीच आवर न घालण्याचा, त्यांचे नेते भिंद्रनवाले यांना अटक करूनही नंतर सोडून देण्याचा जुगार अंगलट आल्याचं तुम्हाला त्या दिवशी जाणवलं होतं? सुवर्णमंदिरातील लष्करी कारवाईमुळं येणाऱ्या प्रतिक्रियेच्या चिंतेचं सावटही त्या दिवशी तुमच्या मनावर नव्हतं ना?

पण या सर्व बाबींची पर्वा न करता तुम्ही तुमचा निर्णय जिद्दीनं अंमलात आणला. अतिरेक्यांचा पूर्ण पाडाव झाला. या लष्करी कारवाईबद्दल काहीशी तीव्र प्रतिक्रियाही झाली; पण ती जागच्या जागीच ठेचून काढण्यात तुम्ही यशस्वी झालात. हळूहळू सुवर्णमंदिरातलं सैन्य काढून घेतलं गेलं. वातावरण निवळत असल्यासारखं वाटू लागलं आणि ३१ ऑक्टोबरचा दिवस उजाडला! नियोजित कार्यक्रमानुसार तुम्ही निवासस्थानातून बाहेर पडत असताना तुमच्याच दोन सुरक्षा सैनिकांनी तुमच्यावर गोळ्या झाडल्या! त्यापैकी पहिली गोळी लागल्यावर 'तुम ये क्या कर रहे हो?' असं तुम्ही त्या जवानाला विचारलंत देखील; पण नंतर अवधीच उरला नाही!

तुमच्या हत्येवरची ही तुमची एकमेव प्रतिक्रिया; पण त्यामध्येही भीतीचा लवलेशही नव्हता. उलट, तू काय करतो आहेस, हे तुझं तुला तरी समजतंय का, असं काही तरी तुम्हाला म्हणायचं होतं. काही क्षणातच सर्व संपलं! या अतिशय थोड्या वेळात तुमच्या मनात काय काय विचार येऊन गेले असतील? कोणाकोणाचे चेहरे तुमच्या नजरेसमोरून तरळून गेले असतील? या पद्धतीनं शेवट कदाचित तुम्हाला फार अकल्पित नसेल; पण तो असा आणि या वेळी येईल, असं तुम्हाला वाटलं होतं का? तरीदेखील, एका अर्थानं, तुम्ही तो मागून घेतलेला होता का? तो स्वीकारत असताना आपलं जीवितकार्य पूर्ण झाल्याचं समाधान तुम्हाला लाभलं होतं का?

मला माहीत आहे मॅडम, या प्रश्नांची उत्तरं मिळणं आता शक्य नाही; पण तरीही ते प्रश्न मनात आल्याशिवाय रहात नाहीत.

व्यक्तिगत जीवनात कौटुंबिक सुखाच्या बाबतीत मात्र तुम्ही तुमच्या पिताजींसारख्याच कमनशिबी ठरलात. राजकीय क्षेत्रात आंतरराष्ट्रीय पातळीवर तुम्ही दोघांनीही अनेक शिखरं पादाक्रांत केलीत; पण कौटुंबिक आघाडीवर मात्र सतत अपेशी ओढाताणच झाली. दोघांनीही आपापले वारसदार निर्माण केलेत; पण त्यांची कारकीर्द तुम्ही थोडीदेखील पाहू शकला नाहीत. तुम्हा दोघांच्याही व्यक्तिमत्त्वाचा हा क्लेशदायक भाग तुम्ही कायम अंधारातच ठेवलात. वैयक्तिक दुःखाचं गाऱ्हाणं तर सोडाच त्याची साधी जाणीवही होऊ न देता इथल्या जनसागरात स्वतःला झोकून दिलंत. त्याच्याशी एकरूप होऊन गेलात!

कोणतेही महत्त्वाचे निर्णय ऐन मध्यरात्रीच्या सुमारास जाहीर करायचे, ही तुमची आवडती कार्यपद्धत. त्यामुळे वृत्तपत्रवाल्यांना तर तुम्ही सतत टांगतं ठेवलंतच; पण इथल्या सामान्य जनतेलाही या धक्कातंत्राचे अनेक अनुभव घ्यावे लागले. आपल्या प्रदीर्घ कारकीर्दीत एकच धक्का तुम्ही भरदिवसा, किंबहुना दिवस सुरू होताहोताच दिला. तो म्हणजे, तुमच्या कारकीर्दीची अखेर झाल्याचा! यापूर्वीचे तुमचे अनेक धक्के या जनतेने पचवले; पण हा मात्र मॅडम, अतर्क्य होता, असह्य होता! या जनतेला अक्षरशः कोलमडवून टाकणारा होता!!

**–सतीश कामत**


# प्रकाशित झाले

**पहा आणि खरेदी करा**

**अब्राहम लिंकन**

**फाळणी टाळणारा महापुरुष**

• वि. ग. कानिटकर

भरपूर छायाचित्रांसह प्रकाशित झालेली पहिली डिलक्स आवृत्ती. मोठा क्राऊन आकार. पृष्ठे: ४००, किं. १५० रु.

**राजहंस ऑगस्ट ८४ योजनेत सहभागी व्हा.**

सविस्तर योजनापत्रक मागवा.

**राजहंस प्रकाशन**

१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.

**MANOOS WEEKLY** ( Licensed to post without prepayment of postage No–11 ) Regd No. PNCW–28

# शिखरावरून दृष्टिक्षेप



त्याला नेहमी वाटे की जगांतले सर्व लोक त्याच्या पेक्षा मोठेच कां? एके दिवशी त्याच्या पित्याने त्याला अनपेक्षित रीत्या आपल्या खांद्यावर उचलून घेतले व वडिलधाऱ्यांच्या विश्वाच्या भयचकित स्वरूपाची ओळख करून दिली.

एकेदिवशी तो देखील मोठा होऊन असाच स्वतःच्या पायावर उभा असेल.

त्यासाठी त्याचा दृष्टिकोण घडविणे जरूर आहे. तो कोठे हि ठेचकाळून पडणार नाही की मदती साठी कोणाकडे हात पसरणार नाही याची काळजी घेणे आवश्यक ठरते.

त्यासाठी आयुर्विम्याच्या सुनियोजित प्रयत्नांची जोड द्या. भारतीय आयुर्विमा महामंडळाच्या पॉलिसीज — खासकरून बालकांसाठी योजलेल्या – त्याच्यावर पडणाऱ्या जबाबदारीच्या व कर्तव्याच्या अपेक्षांची पूर्ण काळजी घेण्यास समर्थ आहेत. मग ते त्याचे शिक्षण असो, त्याच्या स्वतंत्र जीवनाचा ओनामा असो अथवा त्याच्या भविष्याची जडणघडण. ही सध्यातरी आपली व आमची जबाबदारी आहे. चला तर मग, त्याचा भविष्यकाल उज्ज्वल करण्यासाठी आपण कटिबद्ध होऊया.

**लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इन्डिया**

daCunha/LIC/162/84/MR